# मातृत्व

लेखिका

**शोभना कारंथ**

**मूल्य रु.150/-**

**वरदा प्रकाशन प्रा. लि.**

वरदा, सेनापती बापट मार्ग, 397/1, वेताळबाबा चौक, पुणे 411016

दूरध्वनी : 020-25655654, मो.9970169302

E-mail : varadaprakashan@gmail.com www.varadabooks.com

**मुद्रक व प्रकाशक** : वरदा प्रकाशन प्रा.लि.
397/1, 'वरदा', सेनापती बापट रोड, पुणे 411016.

**मुद्रणस्थळ** : रेप्रो इंडिया लि., 50/2, टी.टी. एम.आय.डी.सी.
इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई. फोन : 022-27782011

© **सौ.अपर्णा गौरव गौर (जानेवारी 2018)**

**मुखपृष्ठ** : संतोष धोंगडे

**अक्षरजुळणी** : अनिल साठये, सदाशिव पेठ,
पुणे-30. मो.9423528046

पहिली आवृत्ती : जानेवारी 2018.

# अर्पणपत्रिका

आपला जॉब सांभाळून कर्तव्यनिष्ठता सांभाळून सदैव हसतमुख राहणारी माझी सून नाही, तर माझी लाडकी मुलगी आहे. प्रत्येक कामात हातभार लावणारी सौ.सुनीता दास कारंथ, हिला माझ्या 'मातृत्व' या कादंबरीचे पुष्प सप्रेम भेट म्हणून अर्पण करत आहे. जास्तीत जास्त सहयोगाचा वाटा तिचा आहे. कॉम्प्युटर मधील मला तितकेसे ज्ञान नाही तरीसुद्धा जॉबवरून संध्याकाळी घरी कितीही थकून आली तरी, चिडचिड न करता ई-मेल करण्यात नेहमी मदत करत असते. सुनीता म्हणजे माझ्या लेखनशैलीच्या सहकार्याच्या लिफ्टमध्ये बसवून हिम्मत आणि उत्साह या दोन पंखानी उडण्याचे सामर्थ्य देणारी सौ.सुनिता दास कारंथ आहे... माझी लाडकी मुलगी आहे.

**– शोभना कारंथ**

# मनोगत

ऑक्टोबर, २०१६ मध्ये मायबोली प्रकाशनद्वारा अर्थात महाराष्ट्र राज्यसाहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत 'उमलत्या कळ्या' हि कादंबरी प्रकाशित झाली. सतत माझ्या मनात घोळणारे स्त्रीवर होणारे अत्याचारांविषयीचे विचार या कादंबरीत विस्तृत करण्याची संधी मला मिळाली आणि ते विचार वाचकांपर्यंत पोचवण्यात मला यशही मिळाले. या 'उमलत्या कळ्या' कादंबरीला 'अंकुर वाङ्मय' कडून पुरस्कार मिळाला आहे. ही माझ्या जीवनातील खरोखर महत्त्वपूर्ण गोष्ट आहे तसेच महत्त्वपूर्ण क्षण आहे असे मी मानते. त्याचा मला अतिशय आनंद होतो.

प्रतिदिन वर्तमानपत्रात अत्याचार, बलात्कार, खून,बालमजुरी, कुपोषण मृत्यु, लैंगिक अत्याचार, रॅगिंग यासारख्या अनेक घडलेल्या घटना प्रसिद्ध होत असतात. त्या घटनांच्या आधारेच माझ्या मनाच्या गर्भातून कथा जन्म घेतात. अशा अनेक कथा मी लिहिल्या. त्या कथा वाचकांसमोर साकार करण्याचा रंगमंच म्हणजे दिवाळी अंक मिळाला. सर्वात पहिली कथा म्हणजे 'आई' ही शहर टाईम्स दिवाळी अंकात प्रकाशित झाली. ही माझी आत्मकथा म्हणावयास हरकत नाही. तिथूनच माझ्या लेखनकलेचा उगम झाला. तिथूनच आत्मविश्वास निर्माण झाला. लेखनशैलीची वाटचाल सुरू झाली. कलामंच, विश्वभान, गीत, ललना, स्नेहदा, तुषार, गार्गी, सुखी गृहिणी यासारख्या दिवाळी अंकात माझ्या अनेक कथा व लेख प्रकाशित होत असतात. 'गार्गी' दिवाळी अंकात तसेच 'प्रतिलिपी' या ॲप्लिकेशनवर कथा स्पर्धेमध्ये 'नशीब' या कथेला वाचकांची ८५०० वोट्स मिळून मी प्रथम क्रमांकाने पारितोषिकाची मानकरी होऊन सन्मानित झाले. 'सुखी गृहिणी' मध्ये 'माझा आंतरजातीय विवाह' या लेखाला, 'ललना' मध्ये 'योगायोग' व 'अतीत' या कथांना, सूर्यवंशी क्षत्रिय

महिला समाज यांच्यातर्फे झालेल्या कथा लेखन स्पर्धेत ‘अतीत’ या कथेला वक्रतुंड प्रकाश अंकात ‘सध्याची शिक्षण पद्धती’ या लेखाला पारितोषिक मिळून सन्मानित केले गेले. अशी ही लेखनशैलीची वाटचाल चालत आहे. अशा या वाटचालीवर वर्तमानपत्रात ‘सरोगसी माता’ यावरील लेख वाचण्यात आला. लगेच मनामध्ये सरोगसी मातेच्या मातृत्वाविषयी विचार घोळू लागले. त्यांच्या व्यथा, त्यांची मानसिकता, त्यांचे विचार, त्यांची लाचारी, त्यांचे अर्थसहाय्य, त्यांची कौटुंबिक अवहेलना या सर्व गोष्टी मनाला बेचैन करू लागल्या. त्या बेचैन मन:स्थितीतूनच ‘मातृत्व’ या कंदबरीच्या कथेचा जन्म झाला.

आपले गर्भाशय भाड्याने देऊन जन्म दिलेल्या बाळाला मिळणारे मातृत्व असो किंवा स्वत:च्या गर्भाशयातून जन्म दिलेल्या बाळाला मिळणारे मातृत्व वेगवेगळ्या पद्धतीचे असले तरी त्या मातृत्वातील भावना एकच असतात. त्या गर्भात वाढणाऱ्या बाळाप्रती असणारी ओढ, त्या प्रति असणारी ममता एकच असते. त्यामुळे हे मातृत्वाचे प्रेम, ममता; आपल्या काळजाचा तुकडा यातील वात्सल्य ज्याला मिळते तो भाग्यशाली समजला जातो. परंतु हे वात्सल्य ज्याच्या नशिबी येत नाही त्याचे जीवन किती दुर्भाग्यशाली बनून जाते? हेच या कथेचे सत्य स्वरूप आहे. ही ममता अमूल्य कोटीतील आहे असे म्हणण्यास योग्यच आहे. म्हणूनच म्हटले आहे की, ‘‘स्वामी तिन्ही जगाचा। ‘आई’ विना भिकारी।।.’’ वात्सल्य म्हणजे त्या भावनेतून मिळणारे प्रेम, स्नेह, माया, ममता. या चौकटीत सारं जग सामावून जातं. मातृत्वाचं छत्र म्हणजे प्रत्येक जीवाचे संरक्षक अंग आहे. मग तो मनुष्य प्राणी असो किंवा पशु-प्राणी असो. पक्षी सुद्धा आपल्या पिलांची अंडी किती मेहनतीने घरटं बांधून सुरक्षित ठेवतात. ते मूक प्राणी असूनही त्यांना माहित असते की, ‘काही दिवसांनी माझं पिलू येणार..!’ त्या मातृत्वातूनच पक्ष्याच्या पिलाला उडण्याची योग्य दिशा मिळते. त्याचप्रमाणे मातृत्वाच्या छत्ररूपी संस्काराने बाळाची जीवन जगण्याची योग्य ती दिशा मिळून जीवन यशस्वी होते. हेच छत्र मिळाले नाही तर जीवन कष्टप्रद आणि भरकटत जाते. परंतु त्यावेळी त्या मातेशिवाय कोणीच साथ द्यायला

किंवा सावरणारं कोणीच नसतं.

लाचार परिस्थितीत पैशासाठी व्यवहार होत असला तरी मातृत्वाच्या भावनेला व्यवहार नसतो. त्या भावना चैतन्य भावना असतात. दुसऱ्याचे बीज आपल्या गर्भाशयत नऊ महिने जिवापाड सांभाळून त्याला जन्म देणं इथपर्यंत नऊ महिन्याच्या काळात त्या मातेच्या गर्भाशयातील बाळाशी असे भावनांचे नाजूक नाते जुळले जाते. बाळ आणि माता या दोघांमध्ये एक भावपूर्ण गोड संवाद सुरू होतात. हळू-हळू नऊ महिने पूर्ण होताच असह्य कळा सोसून बाळाला जन्म दिला जातो. आणि ते बाळ जड अंत:करणाने समोरील पार्टीला दिले जाते. त्याचे त्या मातेला पैसे देऊन व्यवहार पूर्ण केला जातो. त्यावेळी त्या सरोगसी मातेची मानसिकता, ममता, मातृत्व याविषयी त्याचा कोणीही विचार करत नाही. बाळ आणि माता यांमधील नऊ महिन्यात जुळलेले ममतेचे नाजूक धागे क्षणात तुटले जातात. कुटुंबाकडून झालेली अवहेलना-शारीरिक व्याधी मागे लागतात. शरीर नाजूक बनते तर कधी मृत्युही ओढवतो. तेव्हा त्या मातेच्या स्वत:च्या मुलांना बघणारं, त्यांची जबाबदारी घेणारं कोणी नसतं. ती माता दुसऱ्याची कूस भरून टाकते पण स्वत:च्या कुशीतली छोटी लहान मुलं उघड्यावर पडतात. आई बिना अनाथ होतात. या कथेत गीता एक सरोगसी माता आपल्या स्वत:च्या दोन मुलींसाठी त्यांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या पालनपोषणासाठी दोन वेळा सरोगसी करते. परंतु दुसऱ्यावेळी बाळाला जन्म देण्याआधीच मृत्यु पावते. त्याचबरोबर बाळही मृत्यु पावते. परंतु तिच्या दोन छोट्या मुलींना कोणीही न स्वीकारता उलट एका पब मालकाला विकून टाकले जाते. त्यापुढे त्यांचे जीवन काय झाले असावे? दुसरे पात्र म्हणजे राधिका अर्थात सरोगसी माता होण्यास अशी काय परिस्थिती घडली? तिच्या जीवनातले चढ-उतार, तिने सरोगसीच्या माध्यमातून दोन जुळ्या मुलांना जन्म दिला. त्या मोठ्या झालेल्या अपघातात तिची गेलेली स्मृती, तिच्या राधिकापासून अनामिकापर्यंतच्या काळातील वाटचाल... अशा स्थितीत भारती ताई म्हणजे सुप्रसिद्ध गायिका यांनी भाडोत्री गर्भाशय घेऊन अनुला कुठल्याप्रकारे भाडे देऊन व्यवहार पूर्ण केला? त्यातूनच अनुने मातृत्वाचे कर्तव्य मोठ्या ममतेने

कसे पार पाडले? हेच या कथेचे केंद्र बिंदू आहे. तिसरी आहे भारती ताई म्हणजे आपल्या पतीच्या कॉलेजमध्ये असताना झालेल्या प्रेमभंगामुळे स्त्री-जातीविषयी झालेल्या तिरस्कारामुळे तीन मुलींचा जबरदस्तीने केलेला गर्भपात. यामुळे भारती ताईंची आक्रोश करणारी ममता. अशा तीन पात्रांद्वारे मातृत्वाचे महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

या 'मातृत्व' कादंबरीचे प्रकाशन 'वरदा प्रकाशन' ने केले. त्यांचे मी प्रथम आभार मानते. कारण त्यांच्यामुळे माझे हे पुस्तक व त्यातील माझे विचार वाचकांपर्यंत पोचवण्याचे सहकार्य मिळाले. त्यानंतर सहयोगी म्हणजे माझी आवडती, लाडकी सून म्हणण्यापेक्षा मुलगी सुनीताने मला अतिशय सहकार्य केले. मी काही लिहित असले तर कधीही तिने मला व्यत्यय आणला नाही. माझी सर्व कामं स्वत: करून मला लिहिण्यासाठी वेळ दिला. तसेच माझा मुलगा श्री.मंजुनाथ व माझे पती श्री.नरसिम्हा कारंथ यांनी सुद्धा खूप सहयोग दिलेला आहेच. माझ्या कादंबरीची प्रस्तावना लिहिणारे साहित्यिक, नाट्यकलेत अग्रेसर, सामाजिक कार्यासाठी धडपडणारे 'विश्वभान' अंकाचे संपादक, वर्तक कॉलेजचे मराठी प्राध्यापक श्री.जगदीश संसारे यांनी आपल्या अमूल्य वेळेतून माझ्या कादंबरीसाठी वेळ दिला. याबद्दल मी त्यांची शतश: ऋणी आहे.

'मातृत्व' ही माझी कादंबरी वाचकांना देताना मला अतिशय आनंद होत आहे. तसेच ती तुम्हाला आवडेल अशी अपेक्षा करते.

**- शोभना न. कारंथ**

# प्रस्तावना

लहानपणीच माता-पित्याचे छत्र हरविल्यामुळे राधिका मामा-मामींची आश्रित म्हणून राहू लागली. मामा सुस्वभावी, भाचीची चिंता करणारे, तर मामी राधिका म्हणजे नुसताच 'भार' असे मानणारी, अखेरीस लहान वयातच 'दारुड्याच्या दाराचे' माप ओलांडण्याची दुर्भाग्यवश अवस्था राधिकेच्या वाट्यास येते. मामीने कमी छळले म्हणून कि काय तिची कसर राधिकाची सासू पूर्ण करते. खरे पाहता राधिकेचे लग्न फसवून केलेले असते. राधिकेची म्हणजेच अनामिकेची ही कहाणी, संघर्षकथा लेखिकेने मोठ्या कौशल्याने वाचकांसमोर ठेवली आहे. कादंबरीच्या सुरुवातीस अनामिकेच्या मुलीद्वारे (दीपा) मुंबई प्रस्थानाची हकीकत येते. मग फ्लॅशबॅक तंत्राने अनामिकेचा प्रवास, राधिका ते अनामिका व्हाया रजनी कसा झाला ते वाचकांसमोर उलगडले जाते. साध्या, सोप्या, सरळ व अनलंकृत भाषेत लेखिकेने सरोगेट मातेची व्यथा, वेदना व्यक्त करत-करत स्त्रीच्या लोभस मातृत्वभावनेची पूर्ण यशोगाथाच मांडली आहे. वर-वर पाहता सदर कादंबरी शीर्षकानुसार मातृत्वाचा लेखाजोखा मांडणारी असावी असा भास होतो. 'सरोगेट माता' हा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. पण लेखिका शोभना कारंथ यांच्या कल्पकतेचे आणि लेखणीचे कौतुक करावे तितके थोडे! सदर कादंबरी कुठेच एकांगी, एकसुरी होणार नाही याची दक्षता लेखिकेने घेतली आहे. लेखन कौशल्य दिवसेंदिवस बहरत जाईल याविषयी माझ्या मनात कोणताही किंतु नाही. मातृत्वाच्या एकाच परिघावर सुप्रसिद्ध गायक श्री.धीरज वाडकर यांनी दीपाचे पितृत्व ती केवळ मुलगी आहे म्हणून नाकारणे, दिनेशला नको इतकी सूट मिळाल्यामुळे त्याचे वाहावत जाणे, गीताच्या मुलीचे भरकटत गेलेले दिशाहीन जीवन, सदाभाऊंचे जनसेवेचे व्रत,

गीताची स्वत: खस्ता खात असताना देखील परोपकारी वृत्ती, भारतीताईंची मातृत्वासाठी होणारी संयमी कुतरओढ इत्यादी इत्यादी अनेक पैलू कादंबरीकाराने लीलया पाडले आहेत अगदी एखाद्या अस्सल जवाहिऱ्यासारखे...!

'मातृत्व'चे वाचन करीत असताना य.ग.जोशी या प्रसिद्ध लेखकाच्या लेखनाची आठवण झाली. य.ग.जोशींच्या लेखणीला असलेला योगायागाचा सोस शोभना कारंथ यांच्या 'मातृत्व' मध्ये जागोजागी दिसून येतो. जसे गीताच्या मुलीबरोबर दिनेशचे प्रेम जुळणे, राधिका ज्या मंदिरात आसरा घेते त्याच मंदिरात गीताचे दर्शन घ्यायला जाणे, मंदिराचे पुजारी सदाशिवभाऊ आणि गायक दाम्पत्यांची ओळख असणे आणि अपघातानंतर राधिकाचे सदाशिव भाऊंना भेटणे, दोन्ही एकदम खास मैत्रिणी झालेल्या रजनी (राधिका) आणि गीता दोघांनीही सरोगेट मातृत्व स्वीकारणे अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. योगायोगाच्या या श्रृंखलेमुळे वाचकांची उत्सुकता टिकवून ठेवण्यात लेखिका कमालीची यशस्वी झाली आहे.

कादंबरी वाचताना राधिका ते अनामिका व्हाया रजनी असा एका सरोगसी स्वीकारलेल्या स्त्रीचा प्रवास तिची मातृत्वयात्रा वाचकांना अखंड, सलगपणे वाचता यावी याच उद्देशाने लेखिकेने वातावरण निर्मिती टाळली आहे. अपवाद भारतीताईंच्या वाड्याचे चित्र आणि रजनीच्या अपघातानंतर तिचे हॉस्पिटलमध्ये असणे हे दोन प्रसंग. कादंबरीतले निवेदक आपली ऊर्जा अधिकाधिक राधिका (अनामिका) भोवतीच खर्च करीत असल्या तरी तृतीय पुरुषी निवेदनाचा आधार घेत समिधा (गीताची मुलगी) धीरज, दिनेश आणि विशेष म्हणजे भारतीताईंच्या मन:स्थितीवर प्रकाश टाकला आहे. पात्र चित्रण करताना देखील एकाच कुटुंबातील पात्रे वाटतील असाच प्रयास लेखिकेने केला आहे. कोणतीही व्यक्तिरेखा खटकत नाही हे शोभना कारंथ यांच्या लेखणीचे वैशिष्ट्यच मानावे लागेल.

सुरवातीला म्हटल्याप्रमाणे मातृत्वाच्या गोड भावनेवरील कादंबरी लिहिताना देखील लेखिका कुठेही अभिनिवेश दाखवत नाही. ऊसना आव आणित नाही. आपल्या भाषेची, कुवतीची आणि कल्पकतेची पुरती ओळख कारंथ यांना

आहे म्हणून अलंकारिकतेचा, म्हणीचा, वाक्प्रचारांचा मोह लेखिकेने टाळला आहे. एकूणच कादंबरीविश्वात उत्तुंग भरारी घेण्याचे सामर्थ्य कारंथ यांच्या लेखणीत आहे. आपला स्वतंत्र वाचकवर्ग त्या निर्माण करू शकतात हे या कादंबरीच्या निमित्ताने त्यांनी दाखवून दिले. त्यांनी असेच सहज सुचलेल्या भावनेने लिहावे आणि आपण वाचावे...!

**– प्रा. जगदीश संसारे**

# प्रकरण १

दीपा रीयालीटी शोच्या स्टेजवर जाणार हे माझे एकमेव स्वप्न पूर्ण होणार, ही कल्पनाच मला सुखावत होती. भारती ताईंची इच्छा पूर्ण होणार... त्यांची मुलगी दीपा मोठी गायिका बनणार... या कल्पनेने मी खूश झाले होते. दीपा तशी माझीही मुलगी, कारण मी तिला जन्म दिला, तिच्यावर चांगले संस्कार घडविले, तिला लहानाचे मोठे केले आणि आता ती मला सोडून जाणार... दीपा माझी लाडात वाढलेली मुलगी माझ्यापासून दूर जाताना मला आनंदही होत होता तर मन थोडे उदासही होत होते. दीपा जाण्याच्या तयारीत होती. घड्याळात दुपारचे बारा वाजलेले बघून मी आवाज दिला, ''दीपा, अगं लवकर तयार हो, ती लोकं तुला मुंबईला घेऊन जाण्यासाठी येतीलच...''

''अगं हो आई, मी तर तयार झालेच...'' असे म्हणून दीपा नवीन ड्रेस घालून माझ्या समोर येऊन उभी राहिली. दीपाला बघताच मनात आले की अगदी आपल्या बाबांवर गेली आहे. अगदी तोच चेहरा, तीच शरीराची ठेवण... मी लगेच डोळ्यातील काजळ बोटाने काढून तिच्या कानामागे टेकवले. माझ्या दीपाला कोणाची दृष्ट न लागो. तेवढ्यात गाडीचा हॉर्न वाजला. दीपाने आनंदाने उडी मारून लगेच दरवाजातून बाहेर बघितले आणि ओरडली, ''आई, चल आटोप लवकर. मला आता निघायला हवे. गाडी येऊन उभी राहिली आहे.'' असे म्हणून दीपा लगेच बॅग उचलून बाहेर आली. मी सुध्दा तिच्या पाठोपाठ पूजेचं ताट घेऊन बाहेर आले. सदाभाऊकाकांनी दीपाची बॅग गाडीत ठेवली आणि दीपाला ओवाळण्यासाठी पुढे सरले. मी सुद्धा तिला ओवाळून हातावर दही ठेवत 'यशस्वी भव' चा आशीर्वाद दिला. सदाभाऊकाकांनी आणि मी दोघांनी मिळून तिला जवळ घेतले. लगेच

दीपानेही आपल्या काकांना आणि मला नमस्कार करुन रुमालाने डोळ्यांत आलेले पाणी टिपले. ''आई, काका मी येते...'' असे म्हणून दीपा गाडीत जाऊन बसली. शेवटपर्यंत दीपा खिडकीतून आपला हात हलवत टाटा करत होती. ते बघून मी दाबून ठेवलेला हुंदका अनावर होऊन बाहेर पडला. दीपा माझ्यापासून कधीच दूर गेली नव्हती. गाडी वेगाने पुढे गेली. धुळीचे लोट उडवत उडवत गाडी दिसेनाशी झाली. परंतु मी मात्र त्या धुरळ्यात अडकून गेले. काही क्षण स्तब्ध होऊन त्या धुरळ्यात दीपाला शोधू लागले. तोच सदाभाऊकाकांनी मला दोन्ही खांद्यांना पकडून घरात आणले. मी लगेच बॅगेत लपवून ठेवलेला भारतीताई आणि धीरज वाडकर यांचा फोटो बाहेर काढून बघू लागले. एक एक आठवणी समुद्राच्या लाटेप्रमाणे उसळू लागल्या. आतून मन बोलत होते. ''तुमची दीपा एक मोठी गायिका होणार... तिला तुमचा आशीर्वाद हवा आहे... साहेब, तुम्ही दीपाला जवळ केली नाही, कधी तिचे तोंड बघितले नाही... का? तर... ती एक मुलगी, म्हणून तिचा तिरस्कार केलात आणि तिच्या जुळ्या भावाला म्हणजे दिनेशला जवळ केले... कां?... तर तो एक मुलगा आहे, प्रॉपर्टीचा वारस आहे, वंशाचा दिवा आहे, घराण्याची गायकी चालवणारा खानदानी गायक आहे... परंतु मी तुमच्या दीपाला जवळ केली, तळहाताच्या फोडाप्रमाणे तिला जपले, तुमच्या घराण्याच्या गायकीला खतपाणी घालून तिला फुलवले... त्या फुलांचा गंध आता दरवळणार आहे... फक्त तुमचा आशीर्वाद हवा आहे... या आठवणींच्या लाटा उसळत उसळत मनाच्या गाभाऱ्याला धडकत होत्या. त्या भूतकाळाच्या प्रवाहात मी वहात गेले.

पंचवीस वर्ष झाली असतील. मी राधिका, आई-बाबांच्या पश्चात् मामाकडेच लहानाची मोठी झाले. घरची गरिब परिस्थिती म्हणून मामीने 'मी म्हणजे एक ओझं' अशाप्रकारेच मला वागणूक दिली. मामाची दोन मुलं एक मुलगा आणि एक मुलगी आणि त्यात मी होते. मुलगी म्हणजे सर्वांत मोठी विजया. तिचे लवकरच लग्न लाऊन तिला सासरी पाठवली होती. विजया नंतरचा विनय आणि मी शाळेत शिकत होतो. मामा म्युनिसिपालटी स्कूल

मध्ये मुख्याध्यापक होते. जेम तेम मला एस्.एस्.सी. पर्यंत शिक्षण दिले. मामीचं नेहमीचंच टुमणं असायचे की ''राधिकाला शिकवून काय करायचे...? शेवटी लग्न करून चूलच फुंकायची आहे नं...?'' मामीपुढे मामाचे काही चालत नसे. विनयला व्यवस्थित शिकविले जात होते. विनय आणि मी बरोबरीच्या वयाचे होतो. विनय माझ्याबरोबरच एस्.एस्.सी. झाला आणि त्याने कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मला मात्र घरीच बसवले. त्यामुळे घरातील सर्व कामं मलाच करावी लागत असत. एक दोन वर्षांनी मामीला माझी कटकट होऊ लागली म्हणून मामीची माझ्यासाठी स्थळं बघण्याची सुरुवात झाली. खरं म्हणायचं तर मला लग्न न करता पुढे शिकायचे होते. स्वावलंबी बनायचे होते. परंतु मामीपुढे मामाचे काही चालत नव्हते तिथे माझे काय चालणार...? ''राधिका, आता तू मोठी झालीस... तुझी जबाबदारी आमच्यावर आहे. आम्ही जिवंत असेपर्यंत आमच्या डोळ्यादेखत तू तुझ्या घरी गेलीस तर आम्ही मोठ्या जबाबदारीतून सुटलो.'' मामी नेहमी ठसक्यात बोलून आपल्या प्रेमाचा दाखला देत असे. परंतु मी तिला समजून होते. लहानपणीच आई-बाबा मला सोडून गेल्याने त्यांनीच मला लहानाचे मोठे केले हेच त्यांचे मोठे उपकार होते माझ्यावर.

▲ ▲ ▲

# प्रकरण २

मामीची स्थळं बघण्याची तयारी जोरात चालू होती. त्यात चार-पाच स्थळं मामीने निवडली आणि मला दाखविली. मला एकही स्थळ पसंत नव्हते. कारण कोणी डोळ्याने चकणा होता तर कोणाची नोकरी कायम स्वरुपाची नव्हती तर कोणी शिकलेला नव्हता. मामीला काय कमी खर्चात लग्न कसे होईल या इराद्याने ती स्थळं शोधत होती. अनेक स्थळं शोधून तिने एक स्थळ पसंद केले. मुलगा जास्त शिकलेला नव्हता. त्यामुळे त्यांच्या मागण्याही तशा काही विशेष नव्हत्याच. त्याच आधारे मामीने या मुलाविषयी मामांना सांगितले. मामांनी जरा घाबरतच मामीपुढे आपला विचार मांडला, ''अगं, तिचं हे वय आहे का लग्नाचं...? तिला अजून पुढे शिकू देत. ती शिकली तर पुढे तीचं तीचं स्वावलंबी होऊन लग्नाचा खर्च उचलेल. तू का एवढी घाई करतेस...? ती शिकली तर मुलगाही शिकलेला मिळेल. विजयाच्या बाबतीत सुद्धा तू हेच केलेस. म्हणून आता ती गरिबीत दिवस काढते आहे.'' मामा रागाने बोलत होते.

''तिच्या शिक्षणासाठी तिचा बाप पैशाचं डबोलं ठेवून गेला आहे ना... पैसा आणायचा कुठून...?'' मामी मामांवर खेकसूनच म्हणाली. शेवटी मामा-मामीचे वाद-विवाद फार गंभीर स्वरूपाला जात असत. हे सर्व बघून ''मी लग्नाला तयार आहे'' असे म्हणून त्यांचे वाद-विवाद शांत करत असे. म्हणजे अजूनही समाजाच्या रूढी सूक्ष्म स्वरूपात परंपरेने चालत आलेल्या आहेत की मुलीला जास्त शिकवले तर मुलगा मिळणार नाही. तसेच मुलगी जास्त शिकली असेल तर आजही पौरुषत्वाचा अहंकार ते मान्य करत नाही. तेव्हा मुलापेक्षा मुलगी कमी शिकलेली पसंत करतात. अखेर मामीने एक

स्थळ पसंत केलं. माझ्या पसंतीचा काही प्रश्नच उरला नव्हता. मी एस्.एस्.सी. तर मुलगा चौदावी होता. त्यामुळे देण्याघेण्याच्या गोष्टी थोडक्यात मिटल्या गेल्या होत्या.

साखरपुडा साधारणपणेच पार पडला आणि लग्नाची तारीख ठरली. लग्न तर ठरले परंतु मामा उदास उदास राहात होते. आपल्या भाचीला चांगले शिकवावे ही इच्छा त्यांची पूर्ण होऊ शकली नाही. आपल्या बहिणीला दिलेले वचन ते पूर्ण करू शकले नव्हते. त्यांचे मन त्यांना आतून खात राहिले. 'मी राधिकासाठी काहीच केले नाही... आज राधिकाचे आई-बाबा असते तर ही वेळ राधिकावर आली नसती.' साखरपुड्याच्या नंतर तीन महिन्यांनी मी लग्नाच्या बोहल्यावर चढले. आई-बाबांची कमी जाणवत होती. परंतु मामा-मामी हेच माझे आई-बाबा होते. त्यांचा आशीर्वाद घेऊनच मी पुढील जीवनाचे पाऊल उचलले होते. निरोप घेतेवेळी मामांनी अगदी गहिवरून मला जवळ घेतले आणि डोक्यावर हात ठेवून म्हणाले. ''सुखी रहा, तुला या आशीर्वादाव्यतिरिक्त मी काहीच देऊ शकत नाही. तुझा मामा गरीब आहे...'' असे म्हणून मामांनी डोळ्यात आलेले अश्रू पुसले. मलाही राहवले नाही आणि दाबून ठेवलेला हुंदका अनावर होऊन बाहेर पडला.

''नाही राधिका, रडू नकोस. मी तुझ्या पाठीशी आहे. मामीने जे काही केले ते ठीक केले नाही, हे मी समजतो... कधीही तू या मामाला हाक मार, मी धावत येईन. तुझ्या मामीने तुझे किती हाल केले हे मी जाणून आहे... परंतु मी तुझ्यासाठी काहीच करू शकलो नाही...'' असे म्हणून मामा माझ्या समोरून दूर जाऊन उभे राहिले. मामी मात्र रडल्याचे नाटक करत होती. तिच्या डोळ्यांतून पाण्याचा एक थेंबही निथळला नाही. विजयाला मिठी मारून मी सर्वांचा निरोप घेतला. मामीला नमस्कार करताच मामीने मला खांद्याला पकडून उठविले आणि पाठीवरून हात फिरवत मला गाडीकडे घेऊन गेली. प्रशांत माझी वाट पाहात उभे होते. मी त्यांच्याबरोबर गाडीत जाऊन बसले. सर्वांना सोडून जाताना मन अगदी जड झाले होते. सासर कसे असेल...? तेथील माणसं कशी असतील...? आपलं त्यांच्याशी पटेल का...? असे

अनेक विचार मनात थैमान घालू लागले होते. दिवसभराचा थकवाही जाणवत होता. दोन तास कसे गेले समजलेच नाही. घर आले. सासूबाई दारातच आरतीचे ताट तयार करून आमचीच प्रतीक्षा करत होत्या. आम्ही दोघं गाडीतून बाहेर उतरल्याबरोबर बँड वाजू लागला. फटाक्यांचा आवाज, वातावरण गजबजून गेले होते. थोड्यावेळाने सासूबाईंनी आम्हाला ओवाळून मला तांदुळाचे माप पायाने कलंडायला सांगितले. मी उजव्या पायाने उंबरठ्यावरील तांदुळाचे माप ओलांडून परातीत ठेवलेल्या कुंकवाच्या पाण्यात पाय ठेवून लक्ष्मीच्या पाऊलाने प्रवेश केला. त्या वेळी क्षणात असे वाटले की, ''खरंच, लग्न म्हणजे मुलीचा दुसरा जन्म असतो. घराणं बदलतं, संबंध बदलतात, सासरच्या चाली-रीतीनुसार मुलीचे स्वभाव-संस्कारही बदलावे लागतात. आपल्या इच्छा-आकांक्षाही विसराव्या लागतात. माझेही काय झाले... शिकायची इच्छा असूनही मी ती पुरी करू शकले नाही. परंतु सासरी तरी माझी इच्छा पूर्ण होईल का...? माझे पती मला पुढे शिकायला देतील का...? मनात असंख्य विचारांचे काहूर माजले होते. नव्या परिवारात कावरी-बावरी झाले होते.

▲▲▲

# प्रकरण ३

लग्न होऊन आठ दिवस झाले होते. नव्या नवरीची नवलाई संपत आली होती. घरातील लग्नाची वऱ्हाडी मंडळी हळू हळू आपापल्या घराकडे परतत होती. घर अगदी सुनं सुनं वाटू लागले. रोजची कामं मी सराईतपणे करू लागले. रोजच्याप्रमाणे मी रात्री प्रशांतसाठी दूध घेऊन रुममध्ये गेले परंतु प्रशांत रुममध्ये नव्हते. जाताना सांगूनही गेले नाहीत. इथेच कुठेतरी गेले असणार अशी मनाची समजूत घालून मी त्यांची वाट पाहात बसले. रात्रीचे बारा वाजले, एक वाजला घड्याळाचे काटे मात्र पुढे पुढे सरकत होते, त्याचबरोबर रात्रही पुढे पुढे जात होती. माझे मन असंख्य विचारांनी पुढे पुढे धावत होते. नको त्या शंकांनी मन घेरले गेले होते. आठ दिवस तर ते व्यवस्थित होते. प्रशांत यांची वाट पाहता पाहता दिवसभराच्या थकव्याने मला कधी डोळा लागला समजलेच नाही. पहाटे चार वाजता मला अचानक जाग आली आणि बघते तर बाजूला प्रशांत अस्ताव्यस्त स्थितीत झोपलेले होते. पायांतील चप्पलही काढलेली नव्हती. त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत होता. हे बघून माझे मन चरकले. परंतु स्वत:ला सावरत मी प्रशांत यांच्या पायांतील चप्पल काढून त्यांना नीट झोपवले. अशी माझ्या वैवाहिक जीवनाची सुरुवात बघून मला माझे भविष्य दिसू लागले. सासरी येताना मी किती स्वप्नं घेऊन आले होते, त्या स्वप्नांची होणारी राखरांगोळी पदराला बांधून मी नवीन जीवनाला सुरुवात केली होती.

मी सासरी आल्यापासून मामा मानसिक दृष्टीने कमजोर होत चालले होते. हळू हळू ब्लडप्रेशरचा त्रास होऊ लागला. मामीच्या कटकटीमुळे मामा अगदी त्रस्त झाले होते. डॉक्टरांच्या तपासणीत शुगरसुद्धा वाढल्याचे

सांगितले. एवढं होऊनही मामीने मला काही कळविले नव्हते. तर लग्न झाल्यापासून साधी चौकशीसुद्धा केली नव्हती की 'तू कशी आहेस....?' विनय मला फोन करून घरची खुशाली कळवत असे. प्रशांतच्या विचित्र वागण्याने माझीही मन:स्थिती ठीक नव्हती. म्हणून मीच स्वत: मामांना भेटायला म्हणून घरी गेले. बघते तर मामांची शारीरिक स्थिती खूपच खराब झाली होती. हे बघून माझे डोळे पाण्याने भरून आले. मामांनी माझा हात हातात घेत म्हणाले ''राधिका, तू कशी आहेस...? तू एकटीच आलीस...? अगं जावईबापूंना बरोबर आणायचे होते. त्यांच्याशी थोडं बोललो असतो. आता माझा काय भरंवसा...?'' असे म्हणून त्यांनी डोळ्यांत आलेले पाणी रुमालाने पुसले. परंतु मी मात्र प्रशांतविषयी काही कळू दिले नाही. मी आनंदात आहे असेच त्यांना भासविण्याचा प्रयत्न करत होते. मामी औपचारिकपणे चौकशी करत होती. थोडा वेळ मी मामांशी बोलत बसले तेवढेच मनाला बरे वाटले. संध्याकाळचे सहा वाजले म्हणून मी जाण्यास निघाले. ''अग, जेऊन तरी जा, विजय येईल तुला सोडायला...''

''नको मामा, स्वयंपाकही बनवायचा आहे.'' मी म्हणाले.

''होऽऽहो, तू जा लवकर, नाहीतर सासूबाईंना राग येईल, एवढा उशीर केलास म्हणून...'' मामी लगेच ठसक्यात म्हणाली. मी उठले आणि मामा-मामीना नमस्कार करून बाहेर पडले.

प्रशांत घरी आले असतील ही गोष्ट जमेस नव्हतीच. परंतु सासुबाईंचे दोन शब्द ऐकून घ्यावे लागतील. या तयारीतच मी रिक्षा पकडून घरी आले. लगेच कूकर लावून घरातील आवराआवर केली. सासुबाई तशा रागातच होत्या. म्हणून लवकरात लवकर स्वयंपाक करून सासुबाईंना त्यांच्या टाईमावर जेवण दिले. प्रशांत अजून आलेले नव्हते. 'आज हे कसे येतील...?' या विचाराने छाती धड-धड करू लागायची. प्रशांतचे रोज रात्री पिऊन उशिरा येणे, शब्दाशब्दाला वाद-विवाद करणे, मारायला येणे हे बघून मी माझ्या भविष्याच्या प्रश्नचिन्हात अडकून पडले होते. घरातही सासूचे विक्षिप्तपणाचे वागणे मनाला खटकत होते. त्यांच्या मुलाचे असे वागणे

बघूनही त्यांनी माझ्याशी सहानुभूती दाखविली नाही. जस-जसे दिवस जात होते तस-तशी सत्य परिस्थिती समोर येत होती. प्रशांत यांचे हे दुसरे लग्न होते. पहिल्या बायकोने सुद्धा प्रशांत यांच्या विक्षिप्तपणाला कंटाळून घटस्फोट दिला होता. हे त्यांच्या ड्रॉवरमधील अल्बमवरून मला समजले. हे बघताच क्षणभर माझ्या पायाखालची जमीन सरकली. म्हणजे मामीने मला बिजवराच्या गळ्यात टाकले होते. परंतु मी पुन्हा माहेरीसुद्धा जाऊ शकत नव्हते. इकडे आड तिकडे विहिर अशी माझी स्थिती झाली होती. काय करावे काहीच समजत नव्हते. नशिबाला दोष देण्याव्यतिरिक्त काही करू शकत नव्हते. अशावेळी शिक्षणाचे महत्त्व कळत होते. शिकले असते तर नोकरी करुन कशीही एकटी राहिले असते. हातात पैसे नसल्याने कुठले कामही शिकू शकत नव्हते. तरी शिलाई काम शिकून घ्यावे या विचाराने मी हिम्मत करुन सासूबाईंकडे बोलले ''आई, मी काहीतरी शिकायचे म्हणते...''

''अगं, घरातील कामं काय कमी आहेत का...? एकतर प्रशांत हा असा आणि त्यात तू आम्हाला ओझं झाली आहेस... तुमच्याकडून काही सोनं नाणं मिळेल या विचाराने प्रशांतचं लग्न केलं. परंतु तुझ्या मामीने तर नारळ आणि मुलगी आमच्या पदरात टाकले. आम्ही फसलो. निदान तुझ्या मामाची शेती-वाडी-घर यामध्ये तरी तुझा हिस्सा असेल तर आम्हाला मिळेल तरी... परंतु तो मामा मरेल तेव्हा नं...'' सासूबाई फणकाऱ्यातच बोलत होत्या. त्यांच्या जिभेला काही हाड नाही म्हणायचे. मी समजून गेले की प्रॉपर्टीसाठीच प्रशांतच माझ्याबरोबर लग्न लावलं. काय सांगावं माझा हिस्सा घेऊन मला हाकलवून ही देतील... काही शिकायचं म्हटले तर सासूबाईंनी एवढं ऐकवलं म्हणजे काही त्यांना विचारायलाच नको.

▲▲▲

# प्रकरण ४

मामांची तब्येत दिवसेंदिवस नाजूक होत होती. प्रशांतविषयी मामांना माहीत झाले. त्यामुळे माझ्या दुर्दैवी जीवनाचा त्यांनी ध्यास घेतला. म्हणून एक दिवस मामांनी विनयला माझ्या घरी 'भेटून जाण्याचा' निरोप देण्यासाठी पाठविले. लगेच मी सासूबाईंना विचारून निघण्याची तयारी करू लागले. तेवढ्यात सासूबाई म्हणाल्या ''विनय बेटा, बाबांची तब्येत खूपच खराब आहे कां...? तसं असेल तर मी सुद्धा येते...'' असे म्हणून सासुबाईसुद्धा माझ्या बरोबर येण्यास निघाल्या. घरी जाताच मामी दारातच उभ्या होत्या. ''याऽऽया, तुम्हीही आलात बरं झालं....'' सासूबाईंकडे बघत मामी बोलून स्वयंपाक खोलीत गेली. मी आणि सासूबाई मामांच्या खोलीत गेलो. मामा झोपलेले होते. मी आवाज दिला... ''मामा-मामा, मी राधिका तुम्हाला भेटायला आले आहे.''

माझा आवाज ऐकून मामांनी डोळे उघडून माझ्याकडे आणि सासुबाईक़डे बघून हसले. परंतु त्यांच्या हसण्यात क्षीणता होती. डोळे खोल गेले होते. डोळ्यांभोवती काळी वर्तुळं आली होती. मी मामांच्या उशाशीच बसले होते. मामांनी माझा हात हातात घेतला. त्या त्यांच्या स्पर्शात मला प्रेम, माया जाणवत होती. त्या स्पर्शातून माझ्याशी जणू खूप काही बोलून गेले. माझा हात पकडून नुसते माझ्याकडे एकटक बघत होते. त्यांच्या डोळ्यातून पितृवात्सल्याचे अश्रू वहात होते. माझेही डोळे भरून आले. मामा म्हणजे माझा मोठा आधार होता. मामांनी उशीखालून एक पाकिट काढले आणि म्हणाले ''राधिका बेटा, हे तू ठेव. तूला हात खर्चाला उपयोगी पडतील...'' मला पैशाऐवजी मामांची जास्त गरज होती. म्हणून मी घेतच नव्हते. हे बघून सासूबाईंनी इशारा केला की ''ठेवून घे, ते प्रेमाने देत आहेत तर त्यांचे मन मोडू

नको...'' असे म्हणून मामांच्या हातातिल पाकीट घेऊन माझ्या हातात दिले. हे त्यांचे वागणे मला खटकलेच होते. म्हणजे या लोकांना माणसाऐवजी पैशाची किंमत जास्त होती. तेवढ्यात मामी चहा-पाणी घेऊन आली. मामीची नजर माझ्या हातातील पाकिटावरच होती. आम्ही एक-दीड तासाने घरी जाण्यास निघालो. विनय आम्हाला रिक्षा स्टँडपर्यंत सोडायला आला तेव्हा म्हणाला ''ताई, अशीच अधून मधून येत जा. म्हणजे बाबांना बरे वाटेल. विजयाताई सुद्धा गावी असल्याने ती नेहमी येऊ शकत नाही...'' विनय मामांच्या वळणावर गेला होता. सरळ साध्या स्वभावाचा. विनयने आम्हाला रिक्षात बसवून निघून गेला. रिक्षा घरापासून दूर गेल्यावर लगेच सासूबाई म्हणाल्या, '''आण इकडे ते पाकीट, तुला काय करायचे आहेत ते पैसे...?'' असे म्हणून पाकीट हिसकावून घेतले. मनात विचार केला होता की या पैशातून काहीतरी शिकून घेईन. परंतु ते पैसे सुद्धा हातातून निसटून गेले.

माझं वैवाहिक जीवन रोजच्याप्रमाणेच चालू होते. त्यात काही नवीनता नव्हती. दिवसभर घरातली कामं उरकायची आणि रात्र झाली की छाती धडधडू लागायची. प्रशांतनी मला कधी पत्नी या नजरेने बघितलेच नाही. जणू काही घरातली कामवाली म्हणून माझे स्थान होते. लग्नानंतर माझ्याही काही इच्छा असतील तर मनाच्या भावना असतील... त्यादृष्टीने त्यांनी माझ्याशी कधी संभाषण केले नाही किंवा कधी कुठे फिरायला घेऊन गेले नाही. रात्री कामावरून येताना पिऊन लटपटत यायचे आणि पलंगावर अंग टाकून द्यायचे. घरी आपली बायको वाट पाहात असेल, ती जेवली आहे किंवा नाही... या गोष्टीची त्यांना जाणीवच नव्हती. थोडंफार शुद्धीत असलं तर काही न् काही कारणावरुन वाद-विवाद करून मारपीट करायची... हे सगळं मला असह्य होत असे. लग्नाला वर्ष होत आलं तरी पाळणा हलला नाही म्हणून सासूबाईचे टोमणे मिळायचे. त्यांचा मुलगा कसा आहे हे माहीत असूनही त्या मलाच दोष देत असत. हे सर्व विसरण्यासाठी विरंगुळा म्हणून कुठे बाहेर जावे तरी संशयाचे भूत मानगुटीवर बसायचे. सर्व बाजूंनी माझी कुचंबणा होत होती. असेच एक दिवस मी भाजी आणायला म्हणून घराबाहेर पडले. भाजी घेऊन येत असताना मला प्रशांत दिसले. त्यांना बघून मला आनंद झाला. कारण

आजतरी पतिराज लवकर आले. परंतु थोड्याच वेळात त्यांच्याजवळ एक पंचविशीतली एक युवती आली आणि हातात हात घालून रिक्षात बसून दोघेही निघून गेली. ही गोष्ट किती क्षणभरात माझ्या डोळ्यासमोर घडली की मला त्यांना हाक मारण्याचा अवसरही मिळाला नाही. मनात आले की अजून मला काय काय बघावे लागणार आहे याची कल्पना सुद्धा करता येत नाही... घडलेल्या घटनेविषयी विचार करत करत मी घरी आले. रात्री स्वयंपाक करून त्यांची येण्याची वाट बघत बसले. नेहमीपेक्षा ते थोडे लवकरच आले होते. आमची रात्रीची जेवणं उरकली. मी रुममध्ये गेले. प्रशांत माझ्याकडे रागानेच बघत होते. मनात म्हटले 'उलटा चोर कोतवालको डाटे..' मी त्यांच्यावर रागावण्याऐवजी त्यांनीच मला फैलावर घेतले. ''काय गं, आज कुठे गेली होतीस...? कोणाला भेटायला गेली होतीस...? आणि रस्त्यात तो कोण होता... कोणाशी बोलत होतीस....? तुला काही लाज-लज्जा आहे की नाही?'' असे अनेक खोटे आरोप लावून कमरेच्या पट्ट्याने मारु लागले. त्यांचं पितळ बाहेर पडू नये म्हणून त्यांनी माझा आवाज बंद केला. रात्री रडत रडतच झोपले. परंतु झोप काही येत नव्हती. सर्व अंग दुखू लागले होते. पाठीवरचे वळ झोंबत होते. हे असं मी सहन करायला हवंच का? जाऊन जाऊन तरी कुठे जाणार? माहेरी जाऊन तरी काय होणार? मामांची तब्येत ठीक नाही त्यात मामी ही अशी... या विचाराने मी या घरातून निघून जायचे असे ठरविले. डोळे बंद केले तरी झोप येईना. या कुशीकडून त्या कुशीकडे अशी रात्रभर तळमळत होती. पहाटे पहाटे जरा डुलकी लागली आणि तेवढ्यात सासूबाईंनी आवाज दिला. उठायला होत नव्हते. अंग जड झाले होते तरीसुद्धा मी लगेच धडपडून उठले आणि तोंड धुऊन प्रशांत यांच्या डब्याची तयारी करू लागले. गुरुवार असल्याने सासूबाई सकाळी देवळात जाणार या कल्पनेने मी त्या वेळात घरातून निघून जाण्याचा विचार करत होते... ''आता बस... आता हे सहन करायचे नाही...'' असे म्हणून मी माझी सर्व तयारी करु लागले. माझे सर्व दागिने आणि कपडे बॅगेत भरून ठेवले. थोडेफार पैसे होते ते घेतले.

▲▲▲

# प्रकरण ५

सासुबाईंनी आंघोळ करून देवळात घेऊन जाण्यासाठी पूजेचे तबक मला तयार करण्यासाठी सागितले. त्याप्रमाणे मी पूजेची सर्व तयारी करुन ठेवली. माझी बॅग तयारच होती. आता जे काही होईल ते माझे नशीबच अशी मनाची तयारी केली. टेबलावर चिठ्ठी ठेवण्यासाठी कागद आणि पेन घेतले आणि एवढ्यात विनयचा फोन आला की ''ताई, बाबांची तब्येत एकदम खराब आहे तर तू लगेच निघून ये.'' मी काय करत होते आणि काय झाले. माझे नशीबही मला साथ देत नव्हते. मी लगेच तशीच बॅग ठेवून शेजारच्या काकूंकडे निरोप ठेवून मामांना बघायला निघाले. घरी बरीच गर्दी दिसत होती. म्हणजे मामांचे काही बरे-वाईट तर झाले नाही? या कल्पनेने माझे हात-पाय थर थर कापायला लागले. मी हिम्मत करून मामांजवळ गेले. जणू ते माझीच वाट पाहात होते. मी त्यांच्याजवळ बसताच मामांनी माझा हात हातात घेतला आणि प्यायला पाणी मागितले. मी लगेच हात सोडवून त्यांना घोट घोट पाणि पाजू लागले. ते नुसते माझ्याकडे बघत होते. त्यांना काहीतरी बोलायचे होते. परंतु ते बोलू शकत नव्हते. त्यांनी पाणी पिऊन पुन्हा हात हातात घेतला आणि डोळे बंद केले. ते कायमचेच बंद केले. त्यांचा हातातला हात सैल पडला. मी मामांना मिठी मारून रडू लागले. मामांचा माझ्यावर खूप जीव होता. मामा म्हणजे माझा आधार होता. मामा गेल्याने माझे धैर्य, माझी हिम्मत क्षणात संपून गेली होती. मामांचे सर्व अंत्यविधी झाले. बारा-पंधरा दिवस मला माहेरीच राहावे लागणार होते. सासूबाई आणि प्रशांत लगेच निघून गेले. विजया मात्र राहिली होती. त्या बारा दिवसांच्या कार्यातही मामीने माझा छळ करण्याचे सोडले नव्हते. माझ्या पाठीच लागली की ''तुझ्या नावाचा हिस्सा माझ्या नावावर कर...'' म्हणजे मामा स्वर्गवासी झाल्याचे दुःख राहिले

बाजूला आणि मालमत्तेच्या हिस्स्याची तिला चिंता लागली होती. बारा दिवसाचे कार्यविधी आटपले आणि मी पुन्हा सासरी जाण्यास निघाले. माझ्याबरोबर सासूबाई आणि प्रशांत होतेच. मी मामीच्या पाया पडण्यासाठी स्वयंपाक खोलीत गेले तेव्हा मामीने मला एका कागदावर सही करण्यास सांगितले. त्या कागदावर मामीनेच मजकूर लिहिला होता.

''मला मामा-मामीने लहानाचे मोठे केले. माझा सांभाळ केला. म्हणून मी मालमत्तेचा माझ्या नावावरचा हिस्सा स्वखूशीने मामीस देत आहे...''

तुमची राधिका

मजकूर वाचून मी सही केली. माझे मामाच राहिले नाही तिथे त्यांच्या पैशासाठी कशाला वाद-विवाद करावा...? मला कशातही अडकून राहायचे नव्हते. तेवढ्यात सासूबाईंनी आवाज दिला, ''अगं, काय करतेस? कशावर सही करत होतीस?'' सासूबाईंना सर्व समजले होते. परंतु त्या वेळी जास्त काही बोलल्या नाही. रिक्षामध्ये गप्पच होत्या. परंतु घरी आल्यावर सासूबाई आणि प्रशांत या दोघांनी मिळून मला फैलावर घेतले. मी समजून होते की ही लोकं मला सोडणार नाहीत. शेवटी तसेच झाले. माझे जेवण बंद करुन टाकले. जोपर्यंत तू तुझा हिस्सा परत मागून आणत नाही तोपर्यंत तू या घरात जेवायचे नाही. अशी सासुबाईंनी ताकीद दिली. मी त्यांचे न ऐकता सरळ ताट वाढून जेऊन घ्यायचे. तेव्हा प्रशांतने हळू हळू मारण्यास सुरुवात केली. तेव्हा मात्र माझी सहनशक्ती संपली. तेव्हा संधी साधून मी तयार केलेली बॅग उचलली आणि चिठ्ठी लिहून टेबलावर ठेवून घराबाहेर पडले.

▲ ▲ ▲

# प्रकरण ६

माझे नशीब घेऊन मी बाहेर पडले होते. सर्वांपासून दूर.... बाहेर पाऊल टाकले परंतु आता कुठे जाणार? करणार काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे सापडत नव्हती. विचार करत पाय स्टेशनकडे वळले. तिकीट तर काढायला हवे होते म्हणून मी रांगेत उभी राहिले. माझा नंबर आला तरी मला समजत नव्हते की कुठले तिकीट काढू. माझ्या पुढच्याने नाशिकचे तिकीट काढले. तेच ऐकून मी सुद्धा पटकन नाशिक बोलून पैसे पुढे केले. उरलेले पैसे पाकिटात ठेवत असताना माझ्या पाठी असलेली बाई मला पाठीवर हात ठेवून म्हणाली ''ताई, तुमचं तिकीट खाली पडलं बघा.'' मी त्या बाईकडे बघत बघतच तिकीट उचलले. ती बाई मात्र पुढे जाऊन प्लॅटफॉर्मवर जाऊन उभी राहिली. मी सुद्धा तिच्या बाजूला जाऊन उभी राहिली. ती बाई माझ्याकडे बघून जराशी हसली. मी सुद्धा तिच्याशी हसून तिला विचारले की नाशिक जायला ट्रेन याच प्लॅटफॉर्मवर येईल कां....?

''होऽऽ हो इथेच येणार..'' असे म्हणून टाचा उंचावून ती बाई ट्रेन आली का ते बघू लागली. ''गाडी आलीच हो'' असे म्हणून तिने साडीचा पदर खोचून गाडीत चढण्यासाठी सावरून उभी राहिली. गाडी येताच तिने माझ्या बॅगेला हात देऊन मला चढण्यास मदत केली. मनात आले की अशीही माणसं दुनियेत आहेत. मी बॅग पायाखाली सरकवून खिडकी शेजारी बसले आणि ती बाईसुद्धा माझ्या समोरच्या सीटवर बसली. गाडीला तशी विशेष गर्दी नव्हती. मी नि:श्वास सोडला. आता या मुंबईला नमस्कार असे म्हणून एक बिसलरी पाण्याची बॉटल विकत घेऊन पाणी प्यायले. जरा बरे वाटले. तेवढ्यात त्या बाईने पाणी मागितले. तिला मी पाण्याची बॉटल दिली. ती दोन-तीन घोट पाणी पिऊन बॉटल परत देत म्हणाली ''तुम्ही कुठे

उतरणार...?''

''नाशिकला'' मी म्हणाले.

''नाशिकला कुठे? नाही म्हणजे मी नाशिकची राहणारी आहे...'' ती माझ्याकडे हसत म्हणाली. तिला काय उत्तर द्यावे मला समजेना. तेवढ्यात 'भेलवालाऽऽ भेल' ओरडत भेळवाला समोर येऊन उभा राहिला. मला भूक लागलेली होती. मी लगेच 'दोन भेल' असे म्हणून त्याला भेळ बनवायला सांगितली. एक भेळ त्या बाईला देऊन मी माझी भेळ खात खात खिडकीबाहेर बघू लागली. घरचे विचार येऊ लागले. मी घराबाहेर तर पडले. परंतु सासुबाईंनी 'मी घरात नाही' हे बघून आकाश पाताळ एक केले असेल... विनयला फोन करून सांगितले असेल... जेव्हा टेबलावरची चिठ्ठी वाचेल तेव्हा तिला सत्य परिस्थिती समजेल. पोलीस कम्प्लेंट तर करणार नाही कारण त्यांनी मला मारले त्याचे अजूनही वळ आहेत.

आम्ही दोघी झोपून उठलो. मी तिला विचारले की ''नाशिक यायला अजून किती वेळ आहे...?''

''आता पाच-दहा मिनिटात येईलच...'' असं म्हणून तिने मला नाव विचारले. मी माझे खरे नाव न सांगता, माझी खरी ओळख लपवून रजनी म्हणून नाव सांगितले. लगेच मी सुद्धा तिला तिचे नाव विचारले. ''मी गीता, माझे मिस्टर तीन-चार वर्षापूर्वी निधन पावले. माझ्या दोन मुली लहान आहेत. शाळेत जातात... 'रजनीताई, तुम्हाला काय सांगू...?' असे म्हणून तिचे डोळे पाण्याने भरून आले. मला तिची कीव आली आणि एका गोष्टीचे वाईटही वाटले. कारण गीताचा नवरा नसताना सुद्धा ती गरोदर कशी काय झाली....? ''दोन मुलं शाळेत शिकतात तर हे तिसरे मूल परिस्थिती नसताना कशाला हवे....?'' परंतु हे सर्व विचारण्याएवढी आमची ओळख झालेली नव्हती म्हणून मी काहीच बोलले नाही. बसून बसून कंटाळा आला म्हणून बॅगेतून वाचायला एक पुस्तक काढले. वाचता वाचता वेळ कसा गेला समजलेच नाही. तेवढ्यात गीता जागेवरून उठली आणि म्हणाली ''रजनीताई, नाशिक आलं चला. उतरायचं आहे नं....?'' असे म्हणून आपली गळ्यातील बॅग

घेऊन दरवाज्यात उभी राहिली. तिच्या पाठोपाठ मी सुद्धा माझी बॅग घेऊन दरवाजात उभी राहिले. गाडी थांबताच गीताच्या पाठोपाठ स्टेशनवर उतरले.

स्टेशनवरून आता कुठे जायचे हा प्रश्न होता म्हणून मी जरा विचार करत उभी राहिले. तेवढ्यात ती गीता म्हणाली ''रजनीताई, अशा उभ्या का राहिलात...? घरचा पत्ता तर आहे नं...? तुम्हाला कोणी घ्यायला येणार आहे का....?''

गीता प्रश्नांवर प्रश्न विचारत होती. हिला आता काय उत्तर देऊ मला समजत नव्हते. म्हणून मी पर्समध्ये काही शोधत असल्याचे नाटक केले आणि म्हणाले की ''इथे माझी मामी राहते. परंतु मी तिच्या घरचा पत्ता घरीच विसरले....''

लगेच गीता म्हणाली ''रजनीताई, या अनोळख्या गावात तुम्ही मामीचं घर कसं शोधणार...?'' आताचे दिवस फार वाईट आहेत. तुम्ही आता माझ्यावर विश्वास असेल तर माझ्या घरी चला. तुमच्या मामीचं घर सापडेपर्यंत तुम्ही माझ्याकडे राहू शकता...'' असे म्हणून गीता माझ्या उत्तराची प्रतीक्षा करत माझ्याकडे पाहात राहिली. मी नुसतं तिच्याकडे पाहून हसले आणि बॅग उचलून गीता बरोबर चालू लागले. दहा मिनिटाच्या अंतराने गीता एका चाळीत शिरली. बहुतेक हेच तिचे घर असावे असे समजून मी राहण्याचे ठिकाण तर मिळाले असे म्हणून मी नि:श्वास टाकला. तेवढ्यात दोन मुली धावत धावत येऊन गीताला बिलगल्या. साधारण सात-आठ वर्षाच्या असतील. गीताने मला घरात येण्यासाठी सांगितले. मी संकुचित मनाने घरात शिरले आणि बॅग एका कोपऱ्यात ठेवली. तेवढ्यात गीताच्या दोघी मुलींनी मला वाकून नमस्कार केला. हे बघून मला मनातून गीताचे कौतुक वाटले. गीताने आपल्या मुलींवर चांगले संस्कार घडविले होते. ''आजपासून ही तुमची रजनीमावशी बरं कां... आणि रजनीताई ही माझी संध्या आणि समिधा.'' गीता स्वयंपाक खोलीत जात म्हणाली. हात-पाय धुऊन गीताने गॅसवर चहाचे आधण ठेवले आणि म्हणाली ''रजनीताई तुम्ही सुद्धा हात-पाय धुऊन घ्या म्हणजे बरं वाटेल. थोड्याच वेळात गीता चहा घेऊन आली. गरम

गरम चहाचे घोट घेतले तेव्हा मला दिवसभराचा क्षीण उतरल्यासारखा वाटला. गीताच्या मुली समंजस दिसत होत्या. ''आई, तू तर या रजनीमावशी विषयी कधीच काही उल्लेख केला नाही...'' संध्या माझ्याकडे बघत म्हणाली. ''अग, ही माझी लहानपणीची मैत्रिण, आत्ता येताना ट्रेनमध्ये भेट झाली. तेव्हा आमची ओळख पटली...'' गीता म्हणाली. संध्या आणि समिधा बाहेर खेळायला निघून गेल्या.

दोन दिवस असेच निघून गेले. मला आता निघायलाच हवे. किती दिवस गीताला भार म्हणून राहणार...? असा विचार करून मी गीताला म्हणाले, ''आता मी निघते, मामीचे घर मी शोधून काढीन. तुमची माझी ओळख नसताना सुद्धा तुम्ही मला निवारा दिला. आजच्या दुनियेत एवढं कोणीच कोणासाठी करणार नाही. एवढं तुम्ही माझ्यासाठी केले. खरच, मी तुमची अत्यंत आभारी आहे आणि ऋणी सुद्धा आहे. आता मला थांबवू नका.'' मी म्हणाले.

''ठीक आहे, जातेस तर जा, परंतु जेऊनच जा...'' असे म्हणून गीताने जेवणाची सुरुवात केली. मी सुद्धा तिला मदत करू लागले. मी जाणार असे समजल्यावर संध्या व समिधा मला बिलगल्या आणि म्हणू लागल्या ''रजनीमावशी जाऊ नको... तुम्ही इथेच रहा ना. आपण इथे खूप खेळूया. फिरायला जाऊ या. आम्ही तुला आमची शाळा दाखवू.'' दोघीही मला घट्ट मिठी मारून विनवत होत्या. त्यांची कशी समजूत काढावी मला समजेना.

''मी तुम्हाला भेटायला पुन्हा कधीतरी येईनच. आणि खूप खूप खाऊ सुद्धा घेऊन येईन. तुम्हाला काय काय आवडतं? कॅडबरी की आईस्क्रीम?''

''आम्हाला श्रीखंड आवडतं.''

''ठीक आहे, मी तुमच्यासाठी श्रीखंड आणीन.'' असे म्हणून कशी बशी त्यांची समजूत काढली. निघताना दोघींच्या हातावर खाऊसाठी पैसे ठेऊन मी बॅग उचलली. इतक्यात गीताने माझा हात हातात घेऊन म्हणाली ''रजनीताई, कधीही तुला माझी गरज वाटली तर मला हाक मार, नि:संकोचपणे मदत माग. मी तुझ्या हाकेला जरुर येईन.''

मी घराबाहेर पडल्यावर पुन्हा कुठे जायचे काहीच समजत नव्हते. आता रात्र कुठे काढायची असा विचार करत करत पावलं उचलत होते. तेवढ्यात एक राममंदिर दिसले. मंदिरात जाऊन यावे म्हणजे काहीतरी मार्ग सापडेल. म्हणून मी मंदिरात शिरले. देवाला नमस्कार करून तिथेच आवारात बसून राहिले. मनाला शांत वाटत होते. गीताची आठवण झाली. दोन दिवसांत तिने सख्या बहिणीपेक्षाही मला जास्त मदत केली. दोन प्रेमाचे शब्द दिले. परंतु जे आपले आपले म्हणणाऱ्यांनी माझ्यापासून तोंड फिरवले. त्यांच्या नजरेत पैशाव्यतिरिक्त कशालाच किंमत नव्हती. तेवढ्यात मंदिराचे पुजारी माझ्या समोर आले आणि म्हणाले की आता मंदिर बंद करण्याची वेळ झाली. तुम्हाला आता मंदिराच्या आवारात बेंचवर बसता येईल. मुकाट्याने माझी बॅग घेऊन मंदिराच्या गेटबाहेर आले. पुजारी यांनी गेट बंद केले आणि ते निघून गेले. मी आवारात बेंचवर बसून राहिले.

बसल्या बसल्या कधी डोळा लागला समजलेच नाही. संध्याकाळ होऊन गेली होती. जसजशी रात्र होऊ लागली तस तशी मंदिराची गर्दी ओसरू जाऊ लागली. रात्रीची आरती सुद्धा होऊन गेली. पुजारी प्रसाद वाटता वाटता माझ्याकडे आले आणि म्हणाले ''तुम्हाला कुठे जायचे आहे? मी तुम्हाला दुपारपासून बघतो आहे.'' ते मला प्रश्नांवर प्रश्न विचारत होते परंतु मी काहीच उत्तर देऊ शकत नव्हते. तरी मला काही ना काही बोलायला हवे होते. म्हणून मी त्यांना विनंती केली की ''मंदिरात मला एक रात्र निवारा द्या. मी सकाळी निघून जाईन.'' पुजारी यांना माझी दया आली आणि त्यांनी मला एक रात्र मंदिरात राहण्याची परवानगी दिली. तसेच रात्रीचे जेवणही दिले. जेऊन मी देवाच्या चरणी एक रात्र काढली. जशी पहाट झाली तसे पुजारीने मंदिराचे गेट उघडले. आणि माझ्याजवळ येऊन म्हणाले ''तुझे नाव काय?''

मी रजनी म्हणून सांगितले. ''रजनी, आता तू ऊठ. नाहीतर लोकांचा माझ्याविषयी काही गैरसमज व्हायला नको. मंदिराच्या नळावर हात-पाय धुऊन घे... तोपर्यंत मी चहा आणतो.'' मी लगेच उठून हात-पाय धुऊन देवाला नमस्कार केला. पुजारी सुद्धा चहा घेऊन लगेच आले. मला चहा देऊन

त्यांनी पूजा-पाठ सुरू केला. हळू हळू भाविक सुद्धा काकड आरतीसाठी येऊ लागले. मंदिरातील प्रसन्न वातावरणाने मनाला शांती मिळत होती. तेवढ्यात माझ्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला आणि दचकून मी पाठी वळून पाहिले तर गीता समोर उभी होती. ''रजनीताई तुम्ही? तुम्ही इकडे कशा?''

तेव्हा मी गीताला एका बाजूला घेऊन सांगितले की नंतर सांगते. काकड आरती झाली. पुजारी प्रसाद वाटत वाटत माझ्याबरोबर गीताला बघून आमच्याजवळ आले आणि म्हणाले की ''गीताताई, तुम्ही यांना ओळखता कां?''

''होऽऽहो, ओळखते.''

तेव्हा पुजारी यांनी सर्व हकिकत गीताला सांगितली. तेव्हा गीता मला एवढी रागावली की जणू माझी मोठी बहीणच. तिने काही न ऐकता मला जबरदस्तीने हात पकडून आपल्या घरी घेऊन गेली. माझे डोळे पाण्याने भरून आले. घरी गेल्यावर संध्या व समिधा मला बघून आनंदाने बिलगून गेल्या. 'मावशी आली मावशी आली' म्हणून नाचू लागल्या. त्यांचे प्रेम बघून असे वाटले की 'खरच् आपण मोठी चूक केली. हा परिवार सोडून आपण जायला नको होते. रात्रभर आपण बाहेर राहिलो, काही कमी-जास्त झाले असते तर?'

''पुजारी मला देवासारखे भेटले. तेवढ्यात गीताने आलं घातलेला चहा आणला. ''आता इथून कुठे जायचे नाही. आपलं घर समजून इथेच रहा.'' गीता म्हणाली आणि स्वयंपाकाला लागली.

दुसऱ्या दिवशी संध्या आणि समिधा शाळेत निघून गेल्यावर गीताने मला माझ्याविषयी विचारले. मी तिला सर्व काही सत्य परिस्थिती सांगितली. माझी कहाणी ऐकून गीताचे डोळे पाणावले. त्या भरल्या डोळ्याने तिने मला मिठी मारली. आणि तिच्या डोळ्यांतील अश्रू माझ्या पाठीवर टप् टप् घरंगळत होते.

''रजनीताई, मी सुद्धा एके काळी तुमच्यासारखीच एकटी पडले होते. नवरा दारू पिऊन पिऊन मेला. कमावणारं कोणी नाही म्हणून दोन मुलींना घेऊन माहेरी गेले. परंतु माहेरीसुद्धा भावजयने हाकलून लावले. कोणाचाच

आधार नव्हता. गळ्यात या दोन मुली. काय करायचे? या दोन मुलींना लहानाचे मोठे करून त्यांच्या शिक्षणाचा खर्च कसा काढायचा हा मोठा प्रश्न होता. आपल्याला कोण मदत करणार? सुरुवातीला मी घरकाम करून घर चालवत होते. परंतु घरकाम करून किती कमावणार? म्हणून एका कंपनीत पॅकिंगचे काम मिळाले. ते काम वर्षभर केले. त्या ठिकाणी ओव्हर टाईम करून जेम-तेम तीन साडेतीन हजार रुपये हाती पडायचे. परंतु माझ्या मुलींची फार आबाळ होऊ लागली. दिवसभर मुली एकट्या पडू लागल्या. आजचे दिवसही फार वाईट आहेत. मुलींना असं एकट सोडून जाणं धोक्याचंच आहे. त्यामुळे माझे कामावरही लक्ष लागत नसे. मुलींची फार काळजी वाटायची. मुली सुद्धा घरात कोणी नसल्याने इकडे तिकडे भटकत राहू लागल्या. त्यांचं अभ्यासावरचं लक्षही उडू लागलं. त्यामुळे अभ्यासातही मागे पडू लागल्या. कसं काय करायचे काहीच मार्ग दिसत नव्हता. एक दिवस अचानक एक माणूस आमच्या घरी आला आणि त्याने विचारले कि 'तुम्हीच गीता देशपांडे का?' 'होऽऽ हो, पण कां?' मी त्याला विचारले. 'हे बघा, तुमच्या घरात कोणी कमावणारं नाही. तुमच्या दोन मुलींचं शिक्षण. त्या शिक्षणाचा खर्च, घरचा खर्च या सर्व गोष्टींचा विचार केला तर तुम्हाला पैशाची जास्त गरज आहे. मी तुम्हाला एक मार्ग दाखवतो. त्यात तुमच्या सर्व अडचणी सुटून जातील. सुरुवातीला मला जरा वेगळचं वाटलं. परंतु त्याने सर्व माहिति दिल्यावर समजले की तो एक दलाल आहे. सरोगसीसाठी तो अशा गरीब बायकांना सर्व माहिती देऊन त्यांना डॉक्टरकडे घेऊन जातो. या व्यवहारात काही कमिशन मिळते. तसेच या गरजू बायकांना पैसा मिळतो.''

मी ऐकतच राहिले. मी उत्सुकतेने गीताला विचारले की ''सरोगसी म्हणजे काय?''

''रजनीताई, ज्या स्त्रियांना मूल होत नाही किंवा ज्या पैसेवाल्या बायका आपली फिगर बिघडू नये म्हणूनही सरोगसीने मूल घेतात. काही बायका शरीराने सक्षम नसतात अशा बायका सुद्धा सरोगसीने मूल घेतात. तर काहींना दोष असल्याकारणानेही हा मार्ग पत्करतात. दुसऱ्या बाईचे गर्भाशय भाड्याने

विकत घेऊन म्हणजे आपले मूल त्या दुसऱ्या बाईच्या गर्भाशयात वाढवतात. मूल जन्माला आले की त्याचे तिला तीन-साडेतीन लाख भाडे म्हणून देतात आणि ते बाळ घरी घेऊन येतात. इथेच त्यांचा व्यवहार संपून जातो. परंतु यावेळी जो औषधांचा खर्च, पौष्टिक आहाराचा खर्च त्या पार्टीकडून केला जातो.''

''गीता, म्हणजे का निव्वळ व्यवहारच म्हणायचा नं? त्या गर्भाला सरोगसी माता नऊ महिने आपल्या पोटात सांभाळते आणि प्रसूती झाल्यावर त्या पार्टीला देऊन टाकायचे म्हणजे त्या वेळी त्या मातेला काहीच वाटत नसेल कां?'' मी विचारले.

''ताई, मनाला खूप यातना होतात. नऊ महिने आपल्या जीवापेक्षा आपण त्या बाळाला जपत असतो. आपले मनाचे आंतरिक धागे त्या बाळाशी जुळले जातात. आंतरिक भावना हळू हळू फूलू लागतात. त्यातूनच बाळ आणि माता मधील बंधन बांधले जाऊ लागते. हे बंधन झटक्यात तोडून त्या बाळाला जन्मदात्या मातेपासून दूर केले जाते. ताई, मनाला खूप यातना होतात. परंतु त्या यातना सांगणार कोणाला? आपला प्रपंच चालवण्यासाठी तर माझ्यासारख्या गरजू स्त्रिया अशी सरोगसी करून आपल्या कुटुंबाचा भार उचलत असतात. परंतु कधीकधी स्वत:च्याच कुटूंबाकडून त्या स्त्रीची मानहानी होते. ती सुद्धा सहन करावी लागते.''

गीता बोलत होती आणि मी हे सर्व ऐकून सुन्नच झाले. तेव्हा मला गीता गरोदर असल्याचं कोडं उलगडलं. 'खरंच स्त्री आपल्या कुटुंबासाठी काय काय करते? आणि त्याच स्त्रीची समाजाकडून किती विटंबना होत असते. तिच्यावर अत्याचारासारखे निर्घृण घातपात होत असतात.' मी गीताकडे बघतच राहिले. गीताचे डोळे पाण्याने भरलेले होते.

दुपारी संध्या आणि समिधा शाळेतून आल्या.  आल्या आल्या मला बिलगल्या आणि बोलू लागल्या ''मावशी मावशी तुम्ही आता इथेच रहा. संध्या-समिधाची माझ्याशी चांगलीच गट्टी जमू लागली. मी त्यांचा अभ्यास घेऊ लागले. अभ्यासात तशा त्या हुशारही होत्या. शाळेत त्यांना सोडणं,

शाळेतून त्यांना आणणेही मी करू लागले. त्यांना संध्याकाळी बागेत तर कधी राम मंदिरात घेऊन जाऊ लागले. गीतासुद्धा अवघडलेली होती म्हणून तिला तिच्या कामात मदत करू लागले. त्यामुळे माझाही वेळ जाऊ लागला. गीता फक्त सातवीपर्यंत शिकलेली होती. म्हणून आपल्या मुलींनी तरी शिकावे या हेतूने तिने दोघींना चांगल्या इंग्लीश स्कूलमध्ये टाकले होते. त्यांच्या शिक्षणाचा खर्च निभावण्यासाठी ती सरोगसी करून पैसे कमवत होती. त्यात मी येऊन गीताला भार बनत होते. मला माझा खर्च तरी गीताला द्यायला हवा या विचाराने मी अस्वस्थ होत असे. गीताची तब्येत अधून मधून नाजूक बनत होती. सरोगसीचा दलाल येऊन औषध पाण्याचा खर्च घरी येऊन देत होता. गीता दर महिन्याला तपासणी करून येत होती. स्वत:च्या जीवाला त्रास घेऊन गीता आपल्या मुलींना सांभाळत होती. हे बघून मला तिचे कौतुक वाटत होते. आज ती कोणापुढेही पैशासाठी हात पसरत नव्हती. मला सुद्धा कुठेतरी काम बघायला हवे या विचाराने रोज संध्याकाळी संध्या व समिधाला घेऊन बाहेर पडत असे. राम मंदिराचे पुजारी म्हणजे सदाभाऊकाका यांनाच मी ओळखत होते. त्यांच्याकडून तरी काही काम मिळेल या विचाराने मी मंदिरात जाऊन बसत असे. अधून मधून मंदिरात भजन होत असे. मनाला शांती मिळत होती. महिना होऊन गेला तरी काम मिळत नव्हते.

असेच एक दिवस नेहमीप्रमाणे संध्या व समिधाला घेऊन मंदिरात गेले होते त्याचबरोबर येताना भाजी घेऊन आले. घरात पाऊल ठेवताच गीता म्हणाली ''रजनीताई, आता दोन माणसे येऊन कोणी राधिका नावाची बाई इथे राहते का? म्हणून विचारत होते. मी तर इथे राधिका नावाची बाई कोणीही राहात नाही असे म्हणून मी लगेच दार लाऊन घेतले. घराकडे अगदी निरखून निरखून पाहात होते. गीताने राधिका नाव घेताच मी एकदम दचकले.

''प्रशांत आणि सासूबाईचेच हे काम असणार. त्यांनीच माझ्या प्रॉपर्टीच्या पैशासाठी माझ्या पाठलागी माणसं पाठवली असणार.... ती माणसं कोणी गुंडलोक असतील तर मला धोका आहे...'' गीता मला खोदून खोदून विचारू लागली. तेव्हा मीच तिला सांगितले की ''ती राधिका मीच आहे.''

गीता हे ऐकून लगेच म्हणाली ''रजनीताई, तुम्ही इथे राहिलात तर ती माणसं तुम्हाला पकडून घेऊन जातील. आता तुम्हाला इथे राहण्यात धोका आहे. मी तुमची सदाभाऊकाकांच्या अनाथाश्रमात व्यवस्था करते.'' असे म्हणून गीता सदाभाऊकाकांकडे गेली आणि माझ्याविषयी सर्व सांगून त्यांच्याकडून अनाथाश्रमामध्ये राहण्यास परवानगी चिठ्ठी लिहून घेतली. मी दुसऱ्या दिवशीच पहाटे तिथून निघाले. गीता मला एस.टी.स्टँडवर सोडायला आली होती. गीताला सोडून जाताना माझ्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. गीताने मला खूप मदत केली होती. ना ती जातीची ना पातीची. परंतु तिने मला आधार दिला होता. खरं म्हणजे आज तिला माझी गरज होती. तिच्या बाळंतपणात तिच्या दोन लहान मुलींना सांभाळण्यासाठी कोणी एकाची गरज होती. परंतु माझाही नाईलाज होता. गीताने लवकर उठून माझ्यासाठी पोळी-भाजीचा डबा तयार केला होता. हे तिचे उपकार न फिटण्यासारखे होते. पूणे एस.टी.लागली. मी लगेच बॅग उचलून एस.टी.मध्ये खिडकीजवळच ड्रायव्हरच्या पाठीच बसले. म्हणजे उतरायला बरं पडेल. आम्ही दोघी खूप बोलत राहिलो. एकमेकाला सोडून जायला जड झाले होते. संध्या व समिधा झोपलेल्या होत्या म्हणून बरे झाले नाहीतर त्या दोघींनी मला जाऊच दिले नसते. एस.टी.सुटायची वेळ झाली तशी मी पर्स काढून मुलींसाठी म्हणून पाचशे रुपये गीताच्या हातात कोंबले. कारण मला माहीत होते कि गीता माझ्याकडून पैसे घेणार नाही. बेल वाजली आणि एस.टी. चालू झाली. गीता मला शेवटपर्यंत हात करत होती. हळू हळू गीता दिसेनाशी झाली. मी सीटवर सावरून बसले. कंडक्टर समोर येताच मी पुण्याचे तिकिट काढले आणि डोळे बंद करून डोकं सीटवर पाठच्या बाजूला टेकवले. पहाटेच्या थंडगार वाऱ्याने झोप लागून गेली.

नाष्टा करण्यासाठी एस.टी.थांबली तशी मी जागी झाली. बरेचजण खाली उतरलेले होते. मी मात्र गीताने दिलेली पोळी-भाजी सीटवरच बसून खाल्ली. पाणी पिऊन निवांत बसून राहिले. परंतु मन काही निवांत बसू देत नव्हते. मनात असंख्य विचार मधमाश्यांप्रमाणे घोंगावू लागले. गीताने याआधी सुद्धा सरोगसी केली होती. त्याच पैशाने तिने संध्या-समिधाचे

आतापर्यंतचे पालन-पोषण केले होते आणि आता त्यांच्या शिक्षणासाठी ही दुसरी सरोगसी करत होती. पहिल्या खेपेला तिला दोन जुळे मुलगे झाले होते. परंतु तिला एकाच मुलाचे पैसे मिळाले. म्हणजे ही बाजारपेठ सरोगसी मातांच्या रक्ताचे किती शोषण करते? मधल्या मधे हे दलाल हप्ते वाढवून किती पैसे खातात. परंतु या मातांना काय मिळते? जे पैसे मिळणारे असतात त्यातून औषध-पाण्याचा तसेच पौष्टिक खुराक खाण्याचा खर्च त्यातूनच कापला जातो आणि बाळंतपणानंतर शरीरावर झालेले साईड इफेक्टस् वेगळेच म्हणजे अशक्तपणा, मानसिक स्वास्थ्य, निराशा, अशाप्रकारची लक्षणं डोकं वर काढतात. अशा शारीरिक, मानसिक तक्रारींच्या फेऱ्यात सरोगेट माता अडकते तेव्हा तिच्याकडे पाहायला डॉक्टर नसतो ना हाती पैसा उरतो. तरीसुद्धा आर्थिक परिस्थितीच्या कारणाने नव्याने सरोगसी करण्यास पुन: त्या तयारही होतात. हे गीताचं प्रत्यक्ष उदाहरण माझ्या डोळ्यासमोर होतं. विचार करता करता कधी झोप लागली समजलच नाही आणि अचानक धडाम्धड... धडाम्धड असा आवाज आला. काय झाले समजण्याआधीच माझे डोकं ड्रायव्हरच्या बाजूच्या रॉडवर आपटले आणि मी बाहेर फेकले गेले. त्यानंतर काय झाले मला काहीच समजले नाही.

मी डोळे उघडले तेव्हा मी एका हॉस्पिटलमध्ये होते. बेडवरून उठायचा प्रयत्न केला. परंतु डोक्यात जोराची कळ आली. माझ्या डोक्याला जबरदस्त मार लागला होता. त्यामुळे डोक्याला बँडेज बांधलेले होते. माझ्या जवळच एक ३५-४० वयोगटातील एक जोडपं बसलेले होते. मी डोळे उघडून कावऱ्या बावऱ्या नजरेने इकडे तिकडे बघू लागले. मी स्वत:लाच विचारू लागले 'मी इकडे कुठे व कशी आले?' तेवढ्यात त्या जोडप्याने सांगितले.

''तुम्ही आता आराम करा. स्वत:ला त्रास देऊ नका.'' त्या बाईने माझ्या अंगावरची चादर नीट करून म्हणाली ''तुम्हाला पाणी वगैरे काही हवं आहे कां?'' मी काही उत्तर न देता त्या जोडप्याकडे बघत राहिले. या दोघांना मी ओळखत नाही तरी हे माझी एवढी काळजी का घेत आहेत? असे उलटे सुलटे प्रश्न मला उभे राहिले. तेवढ्यात डॉक्टर आणि एक नर्स माझ्या

बेडजवळ आले. त्यांना बघून मी उठून बसण्याचा प्रयत्न करू लागले. परंतु अंग फार दुखत होते. तसेच हातापायालाही काही काही ठिकाणी खरचटलेले होते. ''नाही, नाही. तुम्ही आता उठू नका. तुम्हाला विश्रांतीची गरज आहे. या दोघांनी तुम्हाला लगेच हॉस्पिटलमध्ये भरती केले म्हणून तुम्ही वाचलात. तुमच्या एस.टी.ला एका ट्रकने धडक दिली. त्यामध्ये तुम्ही जोरात बाहेर फेकले गेल्या'' असे सांगून डॉक्टर निघून गेले. परंतु या अपघाताविषयी मला काहीच आठवत नव्हते. एकदम मला रडू आले. लगेच त्या बाईने मला जवळ घेऊन धीर दिला. थोड्यावेळाने त्या बाईने पिशवीतून जेवणाचा डबा काढला आणि माझ्यापुढे ठेवला. मी चूपचापपणे जेऊन घेतले. अर्ध्याएक तासाने सिस्टरने येऊन गोळ्या दिल्या. त्या गोळीच्या गुंगीने मला कधी झोप लागली समजले नाही.

डोळे उघडले तर संध्याकाळचे पाच वाजले होते. पेशंटना भेटण्यासाठी नातेवाईकांची गर्दी वाढत होती. थोड्या वेळात ते जोडपंही आलं. बरीचशी फळं, बिस्किटं आणि थर्मासमध्ये दूध घेऊन आले. ते माझी एवढी का काळजी करतात? या गोष्टीचं मला राहून राहून आश्चर्य वाटत होते. मला त्यांनी अलगदपणे उठवून बसवले. फळं कापून आपल्या हाताने भरविली. ग्लासभरून दूध प्यायला दिले. नंतर सहजरीत्या ते माझी चौकशी करु लागले.

''तुझे नाव काय? तू पुणे एस.टी.ने कोणाकडे जात होतीस?''

परंतु त्यांच्या प्रश्नांचे एकही उत्तर माझ्याकडे नव्हते. ''मॅडम, मला काहीच आठवत नाही. मी कोण, कुठली, कुठे जाणार? याविषयी मला काहीच आठवत नाही.''

माझी ही स्थिती मलाच केविलवाणी वाटू लागली. पुन्हा माझे डोळे भरुन आले. म्हणून त्या बाईने माझ्या डोळ्यातील पाणी पुसून मला जवळ घेत म्हणाली की ''तू काळजी करू नकोस.... मी तुला मोठ्या बहिणीसारखी आहे. मी गायिका भारती आणि हे माझे मिस्टर प्रसिद्ध गायक धीरज वाडकर.'' जेव्हा तुझा अपघात झाला तेव्हा आम्ही आमचा रेकॉर्डिंग कार्यक्रम आटोपून आमच्या गाडीने पुण्याला येत होतो. तेव्हा बहुतेक यात्री

एस.टी.खाली चेपून जाऊन मृत्युमुखी पडले. मात्र तू एस.टी.च्या दरवाजातून बाहेर फेकली गेलीस म्हणून वाचली. त्याचवेळी आम्ही तेथून जात होतो. बेशुद्ध अवस्थेत, डोक्याच्या जखमेतून बरच रक्त वहात होते, म्हणून आम्ही लगेच तुला आमच्या गाडीत घेऊन इथे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले.''

▲ ▲ ▲

# प्रकरण ७

मी हॉस्पिटलमध्ये पंधरा-वीस दिवस होते. डिस्चार्ज नंतर कुठे जायचे? काय करायचे? काहीच समजत नव्हते. माझे काही सामानही दिसत नव्हते. अंगावर हॉस्पिटलचेच कपडे होते. भारतीताई माझी खूप सेवा करीत होत्या. त्यांचे उपकार परतफेड करण्याइतपत क्षुल्लक नव्हते. तेवढ्यात डॉक्टर आले आणि म्हणाले ''अभिनंदन, उद्या तुम्ही घरी जाऊ शकता.''

''परंतु डॉक्टर, मला माझे काहीच आठवत नाही तर आता मी कुठे जाणार?''

''मॅडम, तुमची स्मृती येणार. तुम्ही काळजी करू नका. डोक्याला ताण देऊ नका कारण तुमच्या डोक्याला खूप मार लागला आहे. डॉक्टर हातातील पॅडवर औषध लिहीत म्हणाले. तेवढ्यात भारतीताई समोर आल्या आणि म्हणाल्या ''डॉक्टर, तिची जबाबदारी मी घेते. जोपर्यंत ही पूर्णपणे बरी होत नाही तोपर्यंत माझ्याच घरी राहील.''

''गुड,'' म्हणून हसत हसत डॉक्टर निघून गेले. भारतीताईंनी आणलेला उपमा मला प्लेटमध्ये काढून दिला आणि म्हणाल्या, ''उद्या मी कपडे घेऊन येते ते घालून तू माझ्या घरी चल.''

भारतीताई आणि त्यांचे मिस्टर असे दोघेही मला घरी नेण्यास सकाळी दहा वाजता आले. मी तयारीनेच बसले होते. ताईच्या मिस्टरांनी हॉस्पिटलचे बील चुकते केले. डॉक्टरांनी सर्व औषधं लिहून दिली. आम्ही तिघेही त्यांच्या गाडीने त्यांच्या बंगल्यासमोर आलो. वॉचमनने गेट उघडून साहेबांना सलाम केला. मी गाडीतून खाली उतरले. बंगला अगदी टुमदार दिसत होता. दुतर्फा फुलांची झाडंच झाड होती. हिरवीगार हिरवळ पसरली होती. भारतीताईंच्या पाठोपाठ मी चालत होते. दरवाजात दोन मोठे इंग्लीश कुत्रे भू-भू करीत होते.

भारतीताई कुत्र्यांच्या जवळ येताच लाडाने ते त्यांच्या अंगलट येऊ लागले. तसे भारतीताई त्याने प्रेमाने गोंजारू लागल्या. पुन्हा माझ्याकडे बघून भुंकायला लागले. तसे भारतीताई म्हणाल्या, ''नाही राजा, ही तर आपली नवी पाहुणी आहे. तिला शेखहँड कर बघू.'' लगेच राजाने आपला पुढचा एक पाय पुढे केला आणि जीभ चाटू लागला. मी सुद्धा त्याचा पुढे केलेला पाय हातात धरून 'शेखहँड राजा' असे म्हणून त्याच्या डोक्यावर हात कुरवाळला. लगेच भारतीताई घरात शिरल्या. त्यांच्या पाठोपाठ मी सुद्धा गेले. एक मोठा हॉल होता. हॉलमध्ये शिरताच एक मोठे डायनिंग टेबल होते. समोरच भिंतीवर बालगंधर्व यांचा फोटो होता. मधोमध वरती एक आकर्षक सुंदर झुंबर लटकत होते. एका साईडला मोठा फिशटँक रूमची शोभा आणखीनच वाढवत होता. शोकेसमध्ये पुरस्कारांची स्मृतिचिन्हं होती. घर अगदी नीटनीटके आणि आकर्षक होते. भारतीताई सोफ्यावर बसल्या लगेच नोकराने एसी चालू केला आणि आत जाऊन चहा-पाण्याचा ट्रे घेऊन आला. भारतीताईंनी ट्रे मधील पाण्याचा ग्लास घेऊन प्रथम मला दिला. पाणी पिऊन आम्ही चहा पिऊ लागलो तेवढ्यात साहेब घरात शिरले. काही न बोलताच ते आपल्या रूममध्ये गेले. पाठोपाठ नोकरही चहा-पाण्याचा ट्रे घेऊन त्यांच्या रूममध्ये गेला. मला साहेबांचा स्वभाव जरा विचित्रच वाटला. चहा पिता पिता ''रामूऽऽ ए रामूऽ'' म्हणून भारतीताईंनी हाक दिली. त्याबरोबर रामू लगेच येऊन उभा राहिला.

''हे बघ, आजपासून या आपल्या पाहुणी आहेत. आत्ताच त्यांना हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाला आहे. त्या आता इथेच राहतील आपल्याकडेच. त्यांना काय हवं नको ते तू बघ. आणि हो, त्यांना त्यांची रूम दाखव. मी आता जरा आराम करते.'' असे म्हणून त्या आपल्या रूममध्ये गेल्या. रामूने माझी बॅग उचलून मला माझ्या रूमकडे घेऊन गेला. रूममध्ये शिरताच मला एकदम प्रसन्न वाटले. दोन समोरासमोर भव्य खिडक्या सुंदर पडद्यांनी सजलेल्या होत्या. अलिशान बेड मखमली चादरीने आकर्षक दिसत होता. भिंती निसर्गाच्या चित्रांनी सुशोभित दिसत होत्या. असे वाटले की मी कोणी महाराणीच्या महालात तर आले नाही....? रामू कधी निघून गेला मला

समजलेच नाही. लगेच मी रुमचा दरवाजा बंद करून बाथरुममध्ये गेले. हात-पाय धुऊन मी फ्रेश होऊन बाहेर आले. थकवा झाल्यासारखे वाटत होते म्हणून जरा बेडवर आडवी झाले. तेवढ्यात दारावर टक. टक झाली. मी दार उघडले. समोर रामू जेवणाचे ताट घेऊन उभा होता.

''अरे तू? मी बाहेर आले असते नं.'' रामू चूपचापपणे ताट टेबलवर ठेवून निघून गेला. मी लगेच जेऊन घेतले. थोड्या वेळाने रामू परत आला. जेवलेले ताट उचलत म्हणाला, ''मॅडमनी तुम्हाला औषध घेऊन आराम करायला सांगितले आहे.''

भारतीताई माझी खूप काळजी घेत होत्या. हळूहळू माझ्या डोक्याची जखमही भरून आली होती. मी हिंडू फिरू लागले. बसून बसून कंटाळा येऊ लागला की किचनमध्ये जाऊन रामूला स्वयंपाकात मदत करू लागले. परंतु रामू नेहमी म्हणायचा ''ताई, तुम्ही कशाला त्रास घेता.'' मॅडमनं बघितलं तर मला रागावतील.''

''काही नाही रे. मी त्यांना सांगेन. तू त्याची काही काळजी करु नकोस. रामू, मला एक सांग की यांना काही मूलबाळ नाही का?''

''काय सांगायचं ताई, मॅडम खूप चांगल्या आहेत. त्यांना तीन वेळा दिवस गेले परंतु त्यांची मूलं जगतच नाही. एवढी सारी प्रॉपर्टी आहे परंतु त्याला कोणी वारस नाही. त्यामुळे दोघही दु:खी आहेत.'' रामू कणीक मळत मळत बोलत होता. मलाही भारतीताईंविषयी ऐकून वाईट वाटले.

'ईश्वराचा पण काय खेळ आहे? जिथे पैसा आहे तिथे वारस नाही, जिथे वारस आहे तिथे पैसा नाही.' या गोष्टीचाच मी विचार करू लागले. तेवढ्यात रामू म्हणाला ''ताई, तुम्ही कुठल्या गावच्या? तुमचा अपघात झाला हे समजले मला, मॅडमनीच सांगितले. पुण्याला कुठे जात होत्या तुम्ही?''

रामूच्या या प्रश्नांनी मी गंभीर झाले. कारण माझी मी ओळख विसरून गेले होते. आज भारतीताईंनी मला आधार दिला म्हणून मी आहे. नाहीतर मी कुठे गेले असते? मी काय केले असते? अपघातात माझे सामानही गेले. परंतु

भारतीताईंनी मला कपड्यापासून डोक्यावरच्या छपरापर्यंत मला मदत करत आहेत. त्यांचे उपकार मी कसे फेडू? सात जन्म घेतले तरी मी त्यांचे उपकार फेडू शकत नाही. हळू हळू माझी तब्येत सुधारत होती. अचानक एक दिवस रामू माझ्या रुममध्ये येऊन म्हणाला ''ताई, तुम्हाला मॅडमनी बोलावले आहे. मी लगेच साडी नीट करून त्यांच्या रुममध्ये गेले. मला बघताच ''ये, ये, बस. आता कशी आहे तब्येत? उद्या आपल्याला हॉस्पिटलला जायचे आहे. डोक्याचे बँडेज सोडायचे आहे. औषधं बरोबर घेतेस ना? तुला इथे काही त्रास नाही नं? काही हवं नको ते बोलत जा. संकोच करू नको.'' भारतीताई माझ्या पाठीवरून हात फिरवत बोलत होत्या.

अशी दुसऱ्यावर किती दिवस अवलंबून राहणार? या विचाराने मी म्हणाले, ''ताई, मला इथे काहीच त्रास नाही. माझी तुम्ही किती काळजी घेता. आजच्या काळात कोण कोणासाठी एवढं करतं? तुमचे माझ्यावर खूप उपकार आहेत. परंतु ताई, मला असं बसून राहायला आवडत नाही. मला काहीतरी काम हवं आहे.''

''हे बघ, तू आधी पूर्णपणे बरी हो. नंतर आपण बघू काय करायचे ते. तोपर्यंत तू स्वत:ची काळजी घे.'' असे म्हणून त्यांनी माझ्या डोक्यावर हात फिरवला. खरोखर ताई माझ्यावर अगदी बहिणीप्रमाणे प्रेम करत होत्या.

▲▲▲

# प्रकरण ८

सात-आठ महिने कसे निघून गेले काहीच समजले नाही. मी भारतीताईंच्या घरात अगदी रुळून गेले होते. मी पूर्णपणे बरी झाले होते. ताईंनी मला माझी नवी ओळख दिली होती. मी अनामिका या नावाने ओळखू लागले. ताई मला 'अनू' म्हणूनच हाक मारत असत. माझं नवीन नावाने एक नवीन जीवन सुरू झाले होते. माझ्या पूर्व आयुष्यातील जुन्या आठवणी, जुने संबंध, जुना प्रपंच सर्व काही पुसून गेले होते. परंतु या विस्मृतीने मन कधी कधी अस्वस्थ होत होते. ना मी भूतकाळाकडे वळून पाहू शकत होते, ना मी भविष्याच्या वाटचालीवर चालू शकत होते. परंतु वर्तमानाचा स्वीकार करणं मला भागच होते. विरंगुळा म्हणून मी रामूला घरकामात मदत करू लागले. एक दिवस भारतीताईंच्या रुममध्ये रामू साफसफाई करत होता. ते बघून मी रामूला म्हटले ''रामू तू जा आणि स्वयंपाकाची तयारी कर. मी ताईंची रुम साफ करते. म्हणजे माझाही वेळ जाईल'' असे म्हणून मी रामूला किचनमध्ये पाठविले. मी टेबलवरची अस्ताव्यस्त पुस्तकं नीट लावू लागले. तेव्हा त्यात एक सुंदर डायरी हाती आली. माझी नजर त्या डायरीवर खिळून राहिली. कारण त्यावरील मुखपृष्ठ एवढे सुंदर होते की कोणाचीही नजर त्यावर खिळून राहिल्याशिवाय राहिली नसती. सहजपणे मी ती डायरी चाळू लागले. वर वर नजर फिरू लागली. ताईंची ती खाजगी डायरी होती. मनात आले की कोणाचीही खासगी डायरी वाचू नये. म्हणून मी परत ती डायरी जागेवर नीट लाऊन ठेवली. रुम साफ करून गार्डनमध्ये माळी गणुकाकांना झाडाला पाणी घालायला मदत करू लागले. गणुकाका फार प्रेमळ वयस्कर गृहस्थ होते. कोणाशी जास्त काही बोलणे नाही. चूपचाप आपल्या कामात व्यस्त असत. झाडांची निगराणी अगदी मन लावून प्रेमाने करत असत. बोलता बोलता ते

एकदा म्हणाले की ''मॅडम खूप चांगल्या आहेत. साहेब जास्त कोणाशी बोलत नाही त्यामुळे त्यांच्याविषयी काही सांगता येत नाही. त्यांना सगळेच घाबरतात. ते कोणाशीही कामापुरतंच बोलतात. म्हणून त्यांचा सर्वांना धाक वाटतो.'' गणुकाकांचं हे बोलणं मला मात्र पटत होतं. कारण मी इथे आल्यापासून त्यांची माझी भेट झाली नव्हती. शिवाय बोलणंही झालं नव्हतं. हॉस्पिटलमध्ये सुरुवातीला आले होते ते तेवढेच त्यांची माझी नजरभेट झाली होती. परंतु बोलणं मात्र झालं नाही. सकाळी लवकर जाणार आणि उशिरा येणार. त्यामुळे त्यांच्या स्वभावाचे मोठे गूढ वाटायचे. त्यांना कधी असे मोकळेपणाने बोलताना किंवा हसताना बघितले नव्हते. भारतीताईंचे आणि त्यांचे आपापसातील सबंध कसे असतील याविषयी शंका वाटत होती. वर-वर तर ते चांगले वाटत होते. परंतु भारतीताई त्यांच्या धाकात असल्यासारख्या वाटत होत्या. कारण साहेब घरी असले की भारतीताई आपल्या रुममध्ये कधी गाणी ऐकत बसायच्या तर कधी रियाज करत असत. एकदा तब्येत बरी नसल्याने साहेब लवकर घरी आले. त्याचवेळी भारतीताई यांच्यात वादविवाद सुरू झाला. कारण तसे क्षुल्लक हाते. चहा देण्यास रामूला विलंब झाला आणि रामूचा राग त्यांनी भारतीताईंवर काढला. म्हणजे छोट्या छोट्या गोष्टींवरून ते चीड-चीड करत असत.

दिवसा मागून दिवस जात होते. मी इथे किती दिवस राहणार? आपल्याला काहीतरी हालचाल करायला हवी. आता मी पूर्णपणे बरी झाली आहे. 'एक दिवस भारतीताईंशी बोलून आपण इथून निघूया' असा विचार करून मी भारतीताईंच्या रुममध्ये गेले तेव्हा बघते तर भारतीताईंचे डोळे लाल आणि सुजल्यासारखे दिसत होते. जणू काही त्या रात्रभर खूप रडल्या असाव्यात. तेव्हा मी म्हणाले ''ताई, तुमची तब्येत ठीक नाही का?''

''नाही गं. माझी तब्येत ठीक आहे.''

''तू बोल, कशासाठी आली होतीस? काही हवं होतं का?'' ताईंनी मला प्रेमळपणे विचारले.

''ताई, मी आता पूर्णपणे बरी झाले आहे. आता आणखीन मी तुम्हाला

त्रास देऊ इच्छित नाही. तुम्ही मला आधार दिलात हेच तुमचे उपकार माझ्यावर आहेत.'' मी संकोची होऊन बोलत होते.

''अनू, तू तर मला लहान बहिणीसारखी आहेस. त्यात उपकार कसले? आणि तू इथून जाणार कुठे? तुला तर तुझी ओळखही आठवत नाही. तू कुठे राहणारी? पुण्याला कोणाकडे तू जात होतीस? काहीच तुला आठवत नाही. त्यातूनही तुला इथे अजून राहण्यास संकोच वाटत असेल तर माझे एक काम कर. तुझे माझ्यावर उपकार होतील.''

'''असं कोणतं काम आहे? सांगा ताई मला. जेणेकरून मी तुमच्या उपकाराची परतफेड करू शकेन.'' तेव्हा भारतीताई थोडावेळ शून्यातच बघत राहिल्या. बोलू की नको या अविर्भावात माझ्याकडे बघू लागल्या. 'असं कोणतं काम माझ्याकडून करवून घेणार आहेत?' या प्रश्नाने मी थोडावेळ संभ्रमात पडले. तेवढ्यात गाडीच्या हॉर्नचा आवाज आला.

''लवकर आले वाटतं?'' असे म्हणत भारतीताई ताडकन उठून उभ्या राहिल्या. मला माझ्या रुममध्ये जायला सांगून साहेबांसाठी चहा सांगण्यास रामूकडे गेल्या. गाडी पार्क करून साहेब घरात आले. त्यांच्या सोबत त्यांचे कोणी मित्रही होते. ते दोघं साहेबांच्या रूममध्ये गेल्यावर लगेच रामू चहा-पाणी घेऊन साहेबांच्या रुममध्ये गेला. अर्धा एक तासाने साहेब आणि त्यांचे मित्र बाहेर जात असल्याचे जाणवले. तेवढ्यात भारतीताईंनी मला आवाज दिला. मी लगेच रुममधून हॉलमध्ये आले. सर्वजण माझी प्रतीक्षाच करत होते. भारतीताईंनी साहेबांच्या मित्राची ओळख करून दिली. ''अनू, हे डॉ.जोशी आहेत. साहेबांचे फार जुने मित्र.'' मी लगेच दोन हात जोडून त्यांना नमस्कार केला. साहेबांनीही ''ही आमची अनू'' असे म्हणून माझी त्यांना ओळख करून दिली. आणि म्हणाले, ''अपघात झाला होता तो हिचाच. डोक्याला खूप मार लागला होता. त्यातच तिची स्मृती गेली. ती कोण कुठली. तिचे नाव-गाव तिला काहीच आठवत नाही.''

''अनू, घाबरू नकोस. तुझी स्मृती परत येईल परंतु जरा वेळ लागेल.'' असे म्हणून साहेब आणि डॉ.जोशी बाहेर निघून गेले. त्यांच्या पाठोपाठ

भारतीताई सुद्धा गेल्या. मी लांबूनच त्यांना बघत होते. ते तिघेही आपापसात काही चर्चा करत होते. जवळ जवळ पंचवीस ते तीस मिनिटे ते बोलत होते. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटले. कारण मला बोलावून माझी ओळख करून देणं आणि त्यानंतर अर्धा तास बाहेर उभे राहून चर्चा करणं हे माझ्या मनाला पटण्यासारखे नव्हते. तरी मी मनाचे समाधान करत होते. कदाचित माझ्या गेलेल्या स्मृतिविषयी बोलत असतील असा विचार करुन मी माझ्या रूममध्ये गेले.

▲▲▲

# प्रकरण ९

सकाळी सकाळी खिडकीतून पहाटेच्या थंडगार वाऱ्याच्या झुळकीने डोळे उघडले गेले. त्या वेळी असे वाटले कि रामूकडून मस्तपैकी आलं घालून उकळलेला कपभर चहा मिळावा आणि गार्डनमध्ये चक्कर मारत मारत त्या चहाचा आस्वाद घ्यावा. म्हणून मी उठून स्वयंपाक खोलीत गेले. चहाचा वास येत होता. रामू चहा बनवत होता. ''काय रे, तुला कसं कळलं की मला चहा हवा आहे?''

''ताई आज जरा थंड थंड हवा सुटली आहे, तर म्हटलं ताई आज लवकर उठतील, ताईंचाही चहा बनवू या.'' असे म्हणून रामू हसू लागला. तेवढ्यात गार्डनमध्ये झाडांना पाणी घालायला म्हणून गणुकाका सुद्धा आले. ''रामू पाणी सोडतोस नं?'' असे म्हणून पायरीवर बसले. रामूने गणुकाकांना चहा दिला. आणि तो पाणी सोडायला गेला. मी सुद्धा चहाचा कप घेऊन गणुकाकांबरोबर गार्डनमध्ये चक्कर मारायला गेले. फिरता फिरता पाय दुखले म्हणून आंब्याच्या झाडाखाली एक मोठा दगड होता. त्या दगडावर जाऊन बसले. तेवढ्यात गणूकाका मला ओरडले.

''अनू बेटा, तिथे बसू नकोस. मॅडम किंवा साहेबांनी बघितले तर आकाश पाताळ एक करतिल.''

''पण कां? तिथे असे काय आहे?''

''बेटा, ती जागा चांगली नाही. तिथे कुणालाच जायला परवानगी नाही.'' गणुकाकांचे हे शब्द ऐकून मला आणखीनच उत्सुकता वाढली.

'हळू हळू मला भारतीताईंच्या आणि साहेबांच्या वागण्यात एक वेगळेपणा जाणवू लागला. दोघं कितीही चांगले दिसत असले तरी त्यांच्यात काही वाद-विवाद आहेत. म्हणूनच साहेब कधीही चूपचाप गंभीर असत.

भारतीताई सुद्धा आतून दु:खी होत्या. परंतु त्यांच्या दु:खाचे कारण काही समजत नव्हते. एक तर स्पष्ट दिसत होते कि त्यांच्याकडे अफाट पैसा आहे पण कोणी मूलबाळ नव्हते. प्रॉपर्टीला वारस नव्हता. हे कारण सुद्धा त्यांच्या दु:खाचं होऊ शकत होतं. या मोठ्या लोकांचं काही सांगता येत नाही. त्यातूनही भारतीताईंनी माझ्यासाठी खूप काही केलं. त्यांनी मला आसरा दिला हेच त्यांचे मोठे उपकार आहेत. नाहीतर मी कुठे गेले असते?'

गणुकाकांच्या आवाजाने मी विचाराच्या गर्तेतून बाहेर आले. आणि त्या दगडावरून उठून दुसऱ्या जागी जाऊन बसले. परंतु त्या जागेविषयी माझ्या मनात कुतूहल राहून गेले. गणुकाका झाडांना पाणी घालत घालत कधी पुढे निघून गेले समजलेच नाही. एकदम गाडीच्या हॉर्नचा आवाज आला. साहेबांना बघून मी ताडकन उठून उभी राहिले आणि बंगल्याकडे जाऊ लागले. तोपर्यंत साहेबांची गाडी गेटमधून निघून गेली होती. भारतीताई निघण्याच्या तयारीतच होत्या. त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले. त्यांनी मला बोलावून घेतले. ''अनू, आज लवकर उठलीस? रात्री झोप तर नीट आली नं? की कसला विचार करत बसली होतीस? चल मी आता निघते, मला उशीर झाला तर जेवून घे.'' असे म्हणून त्या गाडीकडे वळल्या. ताई रोज साहेबांबरोबरच निघतात. परंतु आज ताई पाठीमागून गेल्या. याचं मला जरा विचित्रच वाटले.

मनात त्या जागेचं कुतूहल मला स्थिर बसू देत नव्हते. म्हणून म्हटलं रामूला विश्वासात घेऊन त्याला विचारून पाहावे. परंतु रामूकडूनही काही उत्तर मिळाले नाही. रामूलाही याविषयी काही माहीत नव्हते. अचानक मला भारतीताईंच्या डायरीची आठवण झाली. मनात असलेल्या कुतूहलाने मी हिम्मत करून भारतीताईंच्या रुममध्ये गेले आणि टेबलवर असलेल्या पुस्तकांच्या खाली ती डायरी मिळाली. ती डायरी घेऊन मी माझ्या रुममध्ये गेले. दरवाजा बंद करून मी डायरी उघडली आणि वर-वर नजर फिरवली. लग्नापूर्वीपासून ते लग्नानंतरच्या सर्व आठवणी डायरीच्या पानांच्या कप्प्यात मोकळ्या केलेल्या होत्या. एकंदरीत त्यांचे लग्न साहेबांशी एक तडजोड म्हणून झालेले होते. साहेबांचे लग्नाआधी कॉलेजमध्ये असताना एका मुलीबरोबर प्रेम

होते. परंतु काही कारणाने त्या मुलीबरोबर त्यांचे लग्न होऊ शकले नाही. तिने आपल्याला फसविले असा मनोग्रह करून त्यांच्या मनात मुलींविषयी एक अढी निर्माण झाली. तेव्हापासून ते स्त्री जातीचा द्वेष करू लागले. त्यांनी लग्न न करण्याची जणू शपथच घेतली. त्यांच्या आईने आग्रह करूनही त्यांनी आईचे मानले नाही. दोन-तीन वर्षे अशीच निघून गेली. मुलगा लग्न करत नाही म्हणून आईची तब्येतही दिवसेंदिवस बिघडू लागली. डॉक्टरांच्या तपासणीत त्यांना ब्लड कॅन्सर निघाला. आपण थोड्या दिवसाचे मेहमान असे समजून त्यांनी साहेबांना गळच घातली की, ''मी जिवंत आहे तोपर्यंत तू लग्न करुन घे म्हणजे मी सुखाने डोळे मिटेन.'' कँसरग्रस्त आईची अंतिम इच्छा पूर्ण करण्यासाठी साहेबांनी भारतीताईंशी लग्न केले. त्याच वेळेला मला समजले की ते कधी मोकळेपणाने कोणाशी बोलत नाही किंवा हसताना दिसत नाही. तेवढ्यात रामूने मला हाक मारली. ''होऽऽ हो आलेच...'' असे म्हणून हातातील डायरी लपवत लपवत भारतीताईंच्या रुममध्ये जाऊन ठेवून आले. उद्या ही डायरी पुन्हा वाचायला हवी असा विचार करून मी किचनकडे वळले. रामूने माझ्यासाठी जेवणाचे ताट डायनिंग टेबलवर आणून ठेवले होते. मी हात धुऊन जेऊन घेतले. औषधाच्या गोळ्या घेऊन रूमकडे झोपायला गेले.

▲ ▲ ▲

# प्रकरण १०

संध्याकाळचे पाच वाजले होते. गणुकाका झाडांना पाणी घालत होते. तर रामू रात्रीच्या जेवणाची तयारी करत होता. मी एकटीच टी.व्ही. लावून बसले होते. मनाला विरंगुळा म्हणून गाणी ऐकत बसले होते. तेवढ्यात भारतीताईंची गाडी आलीच. त्यांच्या गाडीचा विशिष्ट हॉर्नचा आवाज कानावर पडताच मी टि.व्ही बंद करून माझ्या रूममध्ये गेले. रामूने त्यांच्यासाठी कांदे पोहे आणि चहा आणला. अर्ध्या-एक तासाने रामू येऊन सांगून गेला की ''ताई, तुम्हाला मॅडमनी बोलावले आहे.'' 'त्यांनी आता कशाला बोलावले असेल?' या विचारातच मी हॉलमध्ये आले.

''अनू, बस नं. अशी उभी का.?''

आपली बॅग बाजूला सारून भारतीताईंनी मला सोफ्यावर बसायला जागा करून दिली. ''अनू, आज मला तुझ्याशी महत्त्वाचे बोलायचे आहे. परंतु कसे बोलू, काय बोलू ते मला समजत नाही. दोन तीन वेळेला मी बोलण्याचा प्रयत्न केला तरी बोलण्याची हिम्मत झाली नाही. मी जे काही बोलेन त्याविषयी वाईट वाटून घेऊ नकोस किंवा माझ्याविषयी मनामध्ये गैरसमज करून घेऊ नकोस. तुला पटत असेल तर हो म्हण नाहीतर नाही म्हणून म्हणण्यास तू मोकळी आहेस.'' असं म्हणून त्या क्षणभर शून्य नजरेत कुठून सुरुवात करावी याचा विचार करू लागल्या. माझा हात हातात घेत म्हणाल्या, ''अनू, तू आमच्याकडे राहतेस. तुझी स्मृतीही अजून आलेली नाही.''

''हो ताई, तुमचे माझ्यावर खूप उपकार आहेत. ते कसे फेडू मला समजत नाही.'' मी मध्येच म्हणाले.

‘‘अनू, मी तुला लहान बहिणीसारखी मानते. तुला माहीत आहे की आमची एवढी प्रॉपर्टी आहे. परंतु त्याला कोणी वारस नाही. म्हणून आम्हाला एक मुलगा हवा आहे. मला तीन मुली झाल्या परंतु एकही जगली नाही. आता जर मुलाचा विचार केला तर माझ्या जिवाला धोका आहे असे डॉक्टर म्हणाले. कधी कधी विचार येतो की धोका पत्करून या प्रॉपर्टीला वारस आणावा.’’ भारतीताई डोळ्यांत पाणी आणून बोलत होत्या.

‘‘नाही ताई, तुमचं हे बोलणं ऐकवत सुद्धा नाही. असे असेल तर तुम्ही कोणा मुलाला दत्तक का नाही घेत?’’ मी त्यांच बोलणं मध्येच थांबवून बोलून गेले.

‘‘अनू, दत्तक म्हटलं म्हणजे कितीही झालं तरी ते मूल दुसऱ्याचेच नं? ते मूल पुढे कसे निघेल या गोष्टीची कल्पना करू शकत नाही गं. शेवटी आपलं स्वत:चं ते स्वत:चंच.’’

‘‘मग काय करणार तुम्ही?’’ मी म्हणाले.

‘‘तसा विचार केला तर बरेच उपाय आहेत.’’

‘‘कोणता उपाय?’’ मी म्हणाले.

‘‘अनू, चांगला एक उपाय म्हणजे सरोगसी.’’

‘‘म्हणजे? मी समजले नाही?’’

‘‘अनू सरोगसी म्हणजे चांगल्या स्त्रीचे गर्भाशय भाड्याने घ्यायचे. त्यात तिचा जो औषधांचा, पौष्टीक खाण्यापिण्याचा खर्च आपण करायचा. तिची शारीरिक काळजी आपण घ्यायची आणि मूल झाल्यावर ते मूल आपले. त्या स्त्रीला तिच्या गर्भाशयाचे भाडे देऊन आपण त्या व्यवहारातून मोकळं व्हायचं.’’

‘‘किती कठोर व्यवहार आहे नं? सरोगसी माता ज्या गर्भाला आपल्या पोटात नऊ महिने सांभाळते, नऊ महिने पूर्ण होताच जे बाळ जन्माला येईल, त्या बाळाला समोरच्या पार्टीला देऊन टाकते. म्हणजे हा मातृत्वाचा व्यवहारच म्हणायचा. त्यावेळेची त्या मातेची मानसिक अवस्था काय होत असेल? या गोष्टीची कल्पना करू शकत नाही. अशावेळी तिच्या ममतेचा,

तिच्या मातृत्वाचा आक्रोश तिच्याशिवाय कोणालाच ऐकू येत नसावा. खरोखर ती सरोगसी माता पैशासाठी सर्व काही करत असेल, परंतु ती सुद्धा त्या बाळाची माताच ठरली नं? आपल्या काळजाच्या तुकड्याला दूर करताना तिच्या मनाची किती उलाघाल होत असेल? नऊ महिन्याच्या सहवासातून जुळलेले ममतेचे नाजूक धागे क्षणात तोडले जातात. माता आणि बाळाला वेगळं केलं जातं.''

मी माझ्या व्यक्त केलेल्या भावना ऐकून भारतीताई क्षणभर सुन्न झाल्या. ''अनू, तू जे बोलतेस ते खरं आहे. परंतु गरिबी अशी आहे की माणसाला काय काय करायला लावते. याच पैशासाठी या सरोगसी माता एका सरोगसीमधून बाहेर पडल्या की स्वत:हून सरोगसीसाठी पुन्हा डॉक्टरसमोर उभ्या राहतात.''

''ताई, मग तुम्ही काय ठरविले आहे?'' मी म्हणाले.

''अनू, त्याचसाठी मी तुला इथे बोलावून घेतले. हे बघ, मी काय सांगते त्याचा नीट विचार कर आणि विचारपूर्वक निर्णय घे.'' भारतीताईंना काय म्हणायचे आहे त्याची मला कल्पना आली. मनातून मी थोडीफार दचकलेच. परंतु त्यांचे माझ्यावर एवढे उपकार होते की मला निर्णय घेणं फार कठीण होतं.

''अनू, घाबरून जाऊ नकोस. मी तुला स्पष्टच विचारते की सरोगसी करून आम्हाला एक पुत्ररत्न देशील का?'' थोडावेळ मी काहीच बोलले नाही. पटकन निर्णय घेणे हे सुद्धा चुकीचे होते. म्हणून 'मी विचार करून सांगते' असे म्हणून गप्प बसले.

''अनू, तुझा सर्व खर्च आम्ही करू. यामध्ये माझी तुझ्यावर कोणतीच जबरदस्ती नाही. तुझा निर्णय घेण्यासाठी तू कितीही वेळ घेऊ शकतेस. सर्व व्यवहार करारपत्रानेच होईल'' भारतीताई म्हणाल्या. सरोगसीविषयी मी विचार करू लागले. सरोगसी म्हटल्यावर मला कोणीतरी आठवत असल्यासारखे वाटू लागले. कुठेतरी या गोष्टीचा माझ्याशी संबंध आहे असे सारखे सारखे मनाला

वाटत होते. परंतु कोणता संबंध असेल हे काहीच आठवत नव्हते. सरोगसीचा माझ्या जीवनाशी काय संबंध असेल? तरीपण भारतीताईंना काय उत्तर द्यायचे या गोष्टीचा मी विचार करू लागले. 'मला माझ्याविषयी काहीच आठवत नाही. माझे लग्न झाले आहे का? माझ्यावर कोणतीही जबाबदारी आहे का? या सरोगसीमुळे माझ्या जीवनात काही अडचणी निर्माण तर होणार नाही?' असे अनेक प्रश्न उभे राहिले. नाही म्हणावे तरी भारतीताईंनी मला दिलेले जीवदान डोळ्यासमोर येत होते आणि हो म्हणावे तरी मनाला ते पटत नव्हते. मनाची चलबिचल होत होती. परंतु काहीतरी उत्तर हे द्यायलाच लागणार होते. देवा, ही केवढी मोठी परीक्षा माझ्या समोर आली. मला मिळालेल्या जीवदानाची केवढी मोठी परतफेड करायला लावणार होता. आता तूच मला मार्ग दाखव. असे म्हणून मी देवाला नमस्कार केला. तेवढ्यात रामू आला. ''ताई, तुम्हाला मॅडम बोलवत आहेत.'' असे म्हणून निघून गेला. मी भारतीताईंच्या रुममध्ये गेले.

''ये अनू बस'' असे म्हणून त्यांनी खुर्ची पुढे केली. मला खूप दडपण आल्यासारखे झाले होते. थोडावेळ आमच्यात स्तब्धताच होती. बोलायला कुठून सुरुवात करावी या विचारात आम्ही दोघीही अडकलो होतो. मी काही वेळ पदराशी चाळा करत राहिले. ''अनू, मग तू काय निर्णय घेतलास?'' त्यावर मी काहीच बोलू शकत नव्हते. ''अनू, तूझा निर्णय तू स्वतंत्रपणे घेऊ शकतेस, असे समजू नको की तू नाही म्हटले तर मी तुला इथून घालवून देईन. नाही, तू तूझी स्मृती येईपर्यंत इथे राहू शकतेस. या गोष्टीचा तुझ्या राहण्याशी काहीही संबंध नाही. तू जर तयार असशील तर डॉ.जोशी यांच्याकडे जायला हवे. पुढची ट्रीटमेंट त्यांच्याकडून घ्यायला हवी. त्यांची आपण अपॉईंटमेंट घेऊ या. मी काहीच बोलत नसल्याने भारतीताई माझ्या उत्तराला होकारार्थी समजत होत्या. माझ्या तोंडातून 'हो' निघत नव्हते किंवा 'मी तयार नाही' असे बोलायची हिम्मत होत नव्हती. माझ्या न बोलण्यात भारतीताईंनी होकार समजून लगेच मोबाईल उचलून डॉ.जोशींना फोन लावून अपॉईंटमेंटची तारीख घेतली. दोन दिवसानंतरची तारीख ठरली होती. एकंदरित मोबाईलवर

डॉ.जोशींबरोबर केलेल्या संभाषणात असे दिसून येत होते की या लोकांचा आधीच प्लॅन ठरलेला होता. भारतीताईंनी माझ्यावर केलेल्या उपकाराची मला मोठी किंमत चुकवावी लागत होती. परंतु माझी स्मृती येत नाही तोपर्यंत मी काहीच करू शकत नव्हते.

▲▲▲

# प्रकरण ११

दोन दिवसांनी माझ्या सर्व टेस्ट केल्या गेल्या. सरोगसीची ट्रीटमेंट चालू झाली होती. भारतीताई माझी विशेष काळजी घेत होत्या. साहेब सुद्धा माझ्याशी न बोलणारे ते सुद्धा रोज माझ्या तब्येतीविषयी विचारपूस करत होते. मला काही काम करू देत नव्हते. रोज केशरचं दूध प्यायला मिळत होते. खाण्या-पिण्याची विशेष काळजी घेतली जात होती. एकंदरीत मला प्रसन्न ठेवण्याची दोघांची धडपड चालू होती. परंतु मी मात्र जे करते ते योग्य आहे की अयोग्य आहे या द्वंद्वामध्ये फसले होते. एक दिवस भारतीताई आणि साहेब दोघेही गाण्याच्या रेकॉर्डिंगला गेले होते. मी एकटीच बसले होते. अचानक मला भारतीताईंच्या डायरीची आठवण झाली आणि मी त्यांच्या रूममध्ये जाऊन टेबलवर बघितले. त्यांची डायरी त्या जागी दिसत नव्हती. खूप शोधले तेव्हा ती डायरी त्यांच्या उशीखाली सापडली. लगेच मी अर्धवट राहिलेली पाने उलटू लागले. तसतसे माझे मन धड धड करू लागले. एक-एक पान वाचता वाचता भारतीताईंविषयी सहानुभूती वाटू लागली. मात्र साहेबांचे सत्य स्वरूप समोर आले होते. त्यांच्याविषयी एक घृणा निर्माण झाली. ते डॉ.जोशींना त्यांच्या पापकर्मात साथ देत असतील असे वाटत नव्हते. मी पुढे पुढे डायरीची पानं उलटत गेले. परंतु पुढे वाचण्याचे धाडस होईना. एकंदरीत डॉ.जोशी गुप्तपणे गर्भनिदान करून ज्यांची मुलगी नको अशांचे गर्भ पाडून त्या स्त्रियांना मोकळे करत असत. अशा या पापकर्मावर पैसा कमवत होते आणि या कामात साहेबही सामील होते. त्यांना स्त्री जातिविषयी घृणा होतीच. परंतु त्या तिरस्काराने हे पाप करणे मला बिलकूल पटत नव्हते. मी आणखीन पुढे पुढे डायरीची पाने चाळू लागले. त्यात भारतीताईंनी आपल्या स्वत:बद्दल

लिहिले होते. ''मुलाची वाट बघता बघता माझ्या तीन मुलींचा गर्भ पाडला गेला. माझी कूस उजाड केली. आज जर त्या मुली मोठ्या झाल्या असत्या तर मला 'आई' म्हणून त्यांनी हाक दिली असती. साहेबांच्या स्त्रीविषयीच्या तिरस्कारात माझ्या तीन मुली बळी पडल्या. माझे मातृत्व हिरावून घेतले. त्या मातृत्वासाठी माझे मन आसुसलेले आहे. 'आई' शब्द ऐकण्यासाठी हे कान आतुरले आहेत. मला आई व्हायचे आहे. जोपर्यंत 'आई' म्हणून हाक मारणारं नाही तोपर्यंत ही सारी धनदौलत, हे मोठं वैभव सारं सारं शून्य आहे. आता तर पुढेही मी आई होऊ शकणार नाही. आधी माता होऊनही मला मातृत्व मिळाले नाही. आता मातृत्वासाठी मला माझा जीव धोक्यात घालावा लागेल. जीव गेला तर त्या मातृत्वाची काय किंमत राहणार? हीच माझ्या जीवनाची सर्वांत मोठी दुःखान्तिका आहे. साहेबांच्या इच्छेविरोधाने लावलेल्या लग्नाची शिक्षा मी भोगत आहे. माझ्या मातृत्वाच्या झोळीत एक तरी बाळ असतं तर मी मला भाग्यवान समजले असते. माझ्या तीन मुलींचे गर्भ मला आईऽ आई म्हणून आक्रोश करताना ऐकू येत आहेत. माझ्याकडून न्याय मागत आहेत. आमच्यासारख्या निष्पाप गर्भाला तुझ्या कुशीत का जन्म घेऊ दिला नाही.? आम्ही मुली म्हणून? एका स्त्रीच्या चुकीने साऱ्या स्त्री जातीला कलंक? हा कुठला न्याय आहे?''

''मी माझ्या मुलींना काय उत्तर देऊ?'' डायरी वाचता वाचता माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. भारतीताई मनातून किती दुःखी होत्या. किती एकाकी पडल्या होत्या. मला त्यांना साथ द्यायलाच हवी. डायरी वाचल्यावर मी घेतलेला निर्णय योग्य आहे हे लक्षात आले. डायरी बंद करून उशी खाली जशीच्या तशी ठेवून मी रुममधून बाहेर पडले.

▲ ▲ ▲

# प्रकरण १२

मला तीन महिने होत आले होते. म्हणजे सहा एक महिने बाकी होते. दर महिन्याला मी चेकअपसाठी जात होते. यावेळी सुद्धा भारतीताईंनी आठवण करून दिली. ''अनू, उद्या आपल्याला डॉ.जोशींची अपॉईंमेंट आहे. तर सकाळी नऊ वाजता तयार हो.'' मी 'हो' म्हटले. परंतु मनाशी निर्धार केला ''जर डॉ.जोशींनी गर्भ निदान केले तरी हा गर्भ पाडू द्यायचा नाही. या गर्भाला या दुनियेत येऊ द्यायचे. भारतीताईंची कूस भरून काढायची.'' या निर्णयावर मी दुसऱ्या दिवशी नऊ वाजता तयार होऊन बसले. तेवढ्यात रामू बोलवायला आलाच. ''ताई, मॅडमनी निघायला सांगितले आहे.''

मी लगेच चप्पल घालून गाडीजवळ जाऊन उभे राहिले. भारतीताई आणि साहेब आधीच जाऊन माझी वाट पाहात होते. ताईंनी दरवाजा उघडून मला गाडीत बसायला सांगितले. हॉस्पिटल येताच ड्राईव्हरने गाडी पार्क केली आणि आम्ही तिघेही डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेलो. तिथून मला एका रुममध्ये घेऊन गेले. त्या रूममधील सर्व मशिन्स बघून मी समजून गेले की, आता माझी गर्भचाचणी होणार आहे. थोड्या वेळाने माझी गर्भ-निदान चाचणी झाल्यावर मी बाहेर आले. केबिनमध्ये साहेब आणि ताई बसलेल्याच होत्या. मला एकदम बाहेर बसायला सांगितले. एक तासभर त्यांची चर्चा चालू होती. नंतर ताई व साहेब केबिनबाहेर आले. ताईंनी मला निघण्याचा इशारा दिला तशी मी उठून त्यांच्या पाठोपाठ चालू लागले. समोरच ड्रायव्हरने गाडी आणली. रस्त्यात कोण कोणाशी बोलत नव्हते. परंतु मला मात्र उत्सुकता लागून होती की मुलगा आहे की मुलगी? घरी येऊन दुपारची जेवणंही झाली. तरी भारतीताई काहीच बोलल्या नाहीत. मी माझ्या रुममध्ये जाऊन जरा

आडवी झाले. लगेच मला डोळा लागला. रामूने मला आवाज दिला तेव्हा डोळे उघडून बघते तर घड्याळात संध्याकाळचे पाच वाजले होते. मी दरवाजा उघडला. ''मॅडमने तुम्हाला बोलावले आहे'' असे म्हणून निघून गेला. मी केस नीट करून हॉलमध्ये गेले. परंतु मॅडम तिथे नव्हत्या म्हणून मी त्यांच्या रुममध्ये गेले. भारतीताई कानाला इयरफोन लाऊन गाणी ऐकत खिडकीतून संध्याकाळचा सूर्यास्त बघत उभ्या होत्या. मी दारावर टक-टक केले तरी त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले नाही. म्हणजे त्या खूप खुशीत दिसत होत्या. आतापर्यंत त्यांना कधी गाणं ऐकत तल्लीन झालेलं बघितलं नव्हतं. मी पुन्हा दारावर जोरात टक-टक केले तेव्हा आपल्या कानातील इयरफोन काढत माझ्याकडे वळून बघत म्हणाल्या ''अनू, तू? सॉरी हं. ये. ये बस, मी रामूला विचारले तर तो म्हणाला अनुताई झोपलेल्या आहेत. मला वाटले तब्येत तर ठीक आहे नं? या विचाराने मी तुला बोलावून घेतले. हे बघ, सकाळी डॉ.जोशींनी गर्भनिदान चाचणी केली त्यात एक मुलगा आणि एक मुलगी आहे. आमच्या साहेबांना मुलींविषयी तिरस्कार आहे. ही गोष्ट तुला माहीत नाही परंतु आता मी तुला सांगते.'' मला लगेच त्या डायरीची आठवण झाली. भारतीताईंच्या तोंडातून हळू हळू मनातील व्यथा बाहेर पडू लागल्या आणि त्यांचा गळा भरून आला. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. तरी डोळ्यातील पाणी पुसून त्यांनी स्वत:ला सावरून घेतले आणि पुढे बोलू लागल्या.

''अनू, या मुलाबरोबर मुलीचा गर्भ आहे. त्यामुळे तिला जन्म द्यायलाच हवा. परंतु साहेब त्या मुलीला कशी वागणूक देतील याची शंका वाटते.'' मी काहीच माहीत नसल्यासारखे करून विचारले की ''साहेबांना मुलींविषयी एवढा तिरस्कार का?''

''ते त्यांच्या जीवनाचे रहस्य आहे. कधीतरी मी सांगेन.'' असे म्हणून त्या खिडकीतून बाहेर शून्य नजरेने बघत राहिल्या.

''अनू, मी असा विचार करते की या मुलीचा सांभाळ तू करावा. तिला मोठी करून माझ्यासारखी एक मोठी गायिका बनावी हे माझे स्वप्न आहे.

तिच्या खर्चासाठी मी तुला पैसे पाठवत जाईन. मी माझ्या तीन मुलींच्या गर्भाचा बळी चढवला तसा या गर्भाचा मला बळी द्यायचा नाही. अनू, बघ तू विचार कर. आज साहेबांच्या डोळ्यावर पापकर्माच्या खोट्या पैशाची पट्टी बांधली गेली आहे. म्हणूनच कायद्यान्वये स्त्री गर्भपाताला बंदी असूनही गुप्तपणे स्त्रीभ्रूण हत्या करून रात्रीच्या अंधारात ते गर्भ आपल्या वाडीतील आंब्याच्या झाडाच्या पुढ्यात खड्डा करून बुजवले जातात. हे कटूसत्य एक माता आपल्या मनात कसं आणि किती दिवस दडवून ठेवत असेल? या गोष्टीची कल्पना एक माताच करू शकते. तिच्या यातना एक माताच समजू शकते. आजही मला माझ्या तीन मुलींचे आर्त स्वर कानात घुमत आहेत.'' भारतीताई बोलत होत्या आणि वर्षानुवर्षे दाबून ठेवलेल्या दु:खाला आपल्या डोळ्यांतील अश्रूंच्या प्रवाहात वाहून देत होत्या. त्यांचे मन हलके होत होते. मी लगेच भारतीताईंच्या खांद्यावर हात ठेवून एक विश्वासाचा आधार दिला.

एकाकी जीवनात माझी साथ असल्याचा स्पर्श मी त्यांना दिला. माझ्या हाताच्या ओंजळीत स्फुंदुन स्फुंदुन रडत त्यांच्या दु:खाचा उद्रेक बाहेर पडत होता. काय करावे मला काहीच समजेना. माझेही डोळे भरुन आले होते. काही वेळाने त्या शांत झाल्या तसे मी म्हणाले ''ताई, तुम्ही काहीही काळजी करू नका. मी वचन देते की तुमच्या या मुलीचा सांभाळ करून तिला एक मोठी गायिका बनवीन.''

▲ ▲ ▲

# प्रकरण १३

बघता बघता मला सातवा महिना लागला. भारतीताई आणि साहेब खूश होते. एक पुत्ररत्न जन्माला येणार, वंशाचा दीपक, मालमत्तेचा वारस, म्हणून साहेब जास्तच खूश होते. माझे अगदी कोडकौतुक होत होते. त्या कौतुकातच माझी वाडी भरण्याचा कार्यक्रम भारतीताईंनी निश्चित केला. साहेबांनीसुद्धा त्यात भाग घेऊन कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यास सुरुवात केली. भारतीताई सुद्धा खूप आनंदात दिसत होत्या. किती वर्षांनी घरात पाळणा हलणार होता म्हणून त्यांनी माझ्यासाठी फुलांचे दागिने बनवले. हौशिने तीन-चार भारी भारी साड्या खरेदी केल्या. बंगला पूर्ण लाईटिंगने प्रकाशित केला होता. जणू काही बाळाचे बारसंच होते. घरात नुसती धूमधाम भासू लागली. पाहुण्यांची रीघ लागली होती. मोठ-मोठे निर्माते, गायक-गायिका, ॲक्टर्स, फिल्म इंडस्ट्रीजवाल्यांनीच घर भरले होते. नानाविध प्रकाराची पंचपक्वान्न बनविण्यासाठी आचारी बोलावले होते. रामू सर्व व्यवस्था चोखपणे पाहात होता. गणुकाकांचाही हातभार होताच. सनईच्या मंजूळ आवाजाने वातावरण आणखीनच मंगलमय झाले होते. माझा मेकअप केला गेला. हा सर्व देखावा बघून वाटले की पुत्ररत्नाचे स्वागत किती धूमधामने होत आहे. परंतु या पुत्ररत्नापाठी तीन मुलींच्या गर्भाचा बळी चढवला गेला या गोष्टीची कोणाला कल्पना सुद्धा नाही. फुलांचा मुकूट, फुलांची वाळी, फुलांचा कमरपट्टा, फुलांचे कंगन हे सर्व चढवून मला हॉलमध्ये आणले. विधी सुरू झाले. सर्व बायकांनी माझी ओटी भरून कार्यक्रम संपन्न केला. सर्वजण खाऊन पिऊन समाधानाने आपापल्या घरी निघून गेले. परंतु काही स्त्रिया आपापसात कुजबूज करताना त्यांचे शब्द माझ्या कानावर पडले होते. ते ऐकल्याने मी जरा नाराजच

झाले होते. काही स्त्रिया माझी निंदा करत होत्या. निंदा करायला तो एक विषयच बनून गेला होता. ''ही सरोगेट माता आहे. ही सरांची पत्नी नाही. ही तर स्मृतिभ्रंश झालेली अनाथ स्त्री आहे. सरोगसी करून घेण्यासाठीच या दोघांनी तिला आश्रय दिला असणार. आज-काल स्वार्थाखेरिज कोणी कोणाला थारा देत नाही'' हे शब्द कानाला झोंबत होते. त्यात दिवसभराच्या कार्यक्रमाने अंग अगदी मोडून गेले होते. आराम करण्यासाठी मी माझ्या रूममध्ये आले आणि सर्व मेकअप उतरवून जरा आडवी झाले. तेवढ्यात भारतीताई रूममध्ये आल्या आणि म्हणाल्या, ''अनू, आज खूप थकली असशील नं? झोप जरा म्हणजे बरं वाटेल.'' त्यांनी माझ्या पाठीवरुन हात फिरवला. पुन्हा त्या माझी स्तुती करू लागल्या. ''अनू, आज तू किती सुंदर दिसत होतीस गं. सगळे तुझं खूप कौतुक करत होते. गर्भारपणाचे किती तेज आले आहे.'' तेवढ्यात मी मध्ये बोलून त्यांचे बोलणं थांबवले.

''आणि आजूबाजूच्या बायका माझी किती निंदा करत होत्या'' असे मी मध्येच बोलून गेले.

''ते सोडून दे गं. त्यांची ती विचारशक्ती कोत्या मनाची आहे. त्यांचे तू मनावर घेऊ नकोस. हा समाज आहे नं तो दोन्हीकडून बोलत असतो. तुला दूध वगैरे काही हवं का? तशी तू आज नीटपणे जेवलीसुद्धा नाही. मी रामूला सांगून दूध पाठवून देते.'' असे म्हणून भारतीताई किचनकडे वळल्या.

▲ ▲ ▲

# प्रकरण १४

नऊ महिने भरले होते. अचानक माझ्या पोटात दुखू लागले म्हणून भारतीताईंना मी बोलवून घेतले. त्या माझ्या चेहऱ्याकडे बघून समजून गेल्या. ''अनू, पोटात दुखत आहे कां? थोडं सहन कर. आपल्याला आता हॉस्पिटलला जायला हवे'' असे म्हणून ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली. आणि मला सावरायला हात देऊन मला गाडीत बसविले. पोटातील कळा सहन होत नव्हत्या. ओठावर ओठ दाबून कळा सहन करत होते. हॉस्पिटलमध्ये लगेच मला ॲडमिट करुन ट्रीटमेंट चालू केली. डिलीव्हरी नॉर्मल झाली. एक मुलगा आणि एका मुलीला मी जन्म दिला. साहेब आणि भारतीताई खूप खूश झाले. आनंदाने सगळ्यांना पेढे वाटले. परंतु आपल्या मुलीबद्दल साहेबांची काहीच प्रतिक्रिया नव्हती. फक्त मुलगा झाला यातच त्यांची भावना व्यक्त होत होती. मुलीमध्ये त्यांना, बाप म्हणून जो एक जिव्हाळा असतो तो दिसत नव्हता. त्यांनी तिचे तोंडही बघितले नाही किंवा तिला प्रेमाने उचलूनही घेतले नाही. भारतीताई मात्र दोघांना सारखं प्रेम देत होत्या. पाच दिवसांनी मी हॉस्पिटलमधून घरी आले. बारा दिवसांनी बारशाची तयारी सुरू झाली. साहेबांनी आपल्या सुपुत्राचे नाव दिनेश ठरविले आणि मुलीचे नाव दीपिका म्हणून भारतीताईंनी ठेवले. बारसं अगदी मोठ्या हॉलमध्ये थाटामाटात झाले. सर्व फिल्म परिवार इंडस्ट्रीजने हॉल भरून गेला होता. माझ्या दोन्ही मुलांना सगळ्यांकडून खूप गिफ्टस् मिळाली होती. तो सारा फिल्म परिवार बघून वाटले की भारतीताई आणि साहेब यांना किती मान आहे. एवढ्या प्रसिद्ध गायिका परंतु भारतीताईंना अजिबात अहंकार नव्हता. दिवस जात होते तसे तसे दिनेश व दीपिका मोठे होत होते. भारतीताई मात्र

दीपावर खूप प्रेम करायच्या. त्यांना तिची काळजी वाटायची कारण साहेबांनी दीपाकडे कधीही वळून सुद्धा बघितले नाही. दीपाला आपली मुलगी म्हणून कधीच स्वीकारले नव्हते. दिनेशला खेळवायचे, गाडीतून फिरायला घेऊन जायचे. कधी रडला की गाणं म्हणून त्याला शांत करत असत. आपल्या कुशीत त्याला झोपवत असत. हे बघून भारतीताई मला म्हणाल्या की ''अनू, दीपा आता दीड वर्षाची झाली. तिची आता मला काळजी वाटते. आता ती लहान आहे म्हणून तिला काही समजत नाही. परंतु ती उद्या मोठी होईल तेव्हा आपल्या वडिलांचा होणारा तिरस्कार ती सहन करू शकणार नाही. तिच्या मानसिकतेवर त्याचा परिणाम होईल. म्हणून या गोष्टीपासून तिला दूर ठेवायला हवे. तिला खूप प्रेम मिळायला हवे. ती मोठी होऊन एक मोठी गायिका व्हायला हवी. साहेबांना मी दाखवून देईन की सर्वच मुली एकसारख्या नसतात. आज मुली सर्व क्षेत्रात मुलांच्या बरोबरीने पुढे आहेत मग मुलीला मुलगी म्हणून जगण्याचा अधिकार का नसावा? तिची मुलगी म्हणून अवहेलना का व्हावी? अनू, माझी एक मानलेली बहीण आहे. ती इथे पुण्यातच राहते. तिच्याकडे मी तुझी व्यवस्था करते. ती सुद्धा गायिका आहे आणि एकटीच राहते. तिच्याबरोबर तू आणि दीपा राहू शकता. तेवढीच तिलाही सोबत होईल. मी दर महिन्याला तुला पैसे पाठवत जाईन.'' असे म्हणून भारतीताईंनी फार मोठी जबाबदारी माझ्या अंगावर टाकली होती.

मी कोण आहे? कुठे राहणारी? माझे नाव काय? अजून मला काहीच आठवत नव्हते. तरी मी जीवनाच्या प्रवाहात वहात वहात जात होते. किनारा कधी मिळणार काहीच समजत नव्हते. मला मिळालेल्या जीवदानाची खूप मोठी किंमत चुकवावी लागत होती. दीपाला मी जन्म दिला होता. माझी ममता तिच्यापासून दूर जाऊ शकत नव्हती. दीपाचे मला भवितव्य घडवायचे होते. दिनेशला सुद्धा मी जन्म दिला. दोघांची सरोगसी आई म्हणून काय झाले? मी त्यांची आई होती. दिनेशपासून मला व दीपाला दूर जायला लागत होते या गोष्टीचे मला फार वाईट वाटत होते.

▲ ▲ ▲

# प्रकरण १५

मी भारतीताईंच्या मानलेल्या बहिणीकडे म्हणजे उषाताईंकडे राहू लागले. दीपा मोठी होत होती. तिचा सर्व खर्च भारतीताईच करत होत्या. दीपा गायिका होणार याची चिन्हे लवकरच दिसू लागली. झोपताना तिला गाणं ऐकवूनच झोपवावे लागत होते. टि.व्ही.वर गाणी लावली की दीपा हसत हसत गाणी ऐकत असे. रडायला लागली की गाणं लावल्यावर लगेच चूप होत असे. म्हणजे गायिकी तिच्या रक्तातूनच आली होती. दीपा थोडी मोठी झाल्यावर शाळेत जाऊ लागली. उषाताई तिला गाणी गाऊन तिच्यात गायनाची आवड निर्माण करत असत. हळू हळू तिला सा रे ग म प च्या सप्तसुरांची ओळख करून देऊ लागल्या. तिच्या समोर हार्मोनियम वाजवून तर कधी सितार वाजवून त्या संगीत वाद्याची ओळख करून देऊ लागल्या. शाळेत दीपा वार्षिक स्नेहसंमेलनात गायनाचे कार्यक्रम करून सर्व शिक्षकांची आवडती विद्यार्थिनी म्हणून प्रसिद्ध होऊ लागली. अनेक पारितोषिकं पटकावून तिला 'सिंगर' म्हणून प्रसिद्धी मिळू लागली. एवढ्या छोट्या वयात तिने आपले स्थान बनविण्यास सुरुवात केली होती. कधी-कधी उषाताई आपल्या कार्यक्रमाला दीपालासुद्धा घेऊन जात असत. दीपा अभ्यासातही हुशार होती. उषाताईंच्याकडे दीपाला गाण्याची तालीम मिळत होती. परंतु उषाताईना दम्याचा त्रास होऊ लागल्याने त्या तिला जास्त तालीम देऊ शकत नव्हत्या म्हणून त्या म्हणाल्या. ''अनू, माझे भाऊ सदाशिव हे चांगले गातात. ते त्यांच्या भजनी मंडळात भजनं गातात. त्यांनी सुद्धा गायकीचे धडे घेतले आहेत. त्यांच्याकडे दीपाला पाठवायला हवे. म्हणजे थोडा थोडा रियाज होत राहील. पेटी, सितार वाजवायला शिकेल.'' परंतु त्यांचं हे बोलणं वरच्यावरच

होऊन थांबले होते. एक दिवस उषाताईंचा दमा फारच बळावला तेव्हा त्यांनी सदाशिवभाऊ यांचा उल्लेख केला. मला त्यांचा फोन नंबर देऊन त्यांना बोलावून घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी फोन करून सदाशिवभाऊंना बोलावून घेतले. 'लगेच संध्याकाळच्या गाडीने येतो' म्हणून ते म्हणाले. मी सुद्धा भारतीताईंना फोन करून बोलावून घेतले. भारतीताई दिनेशला न आणताच आलेल्या होत्या. हे बघून मी जरा नाराज झाले. कारण बरेच महिने झाले होते. ''ताई, दिनेशला आणले नाही?'' मी म्हणाले. ''अग, उषाताईंची तब्येत बरोबर नाही तर या गोंधळात त्याला कसे आणू? पुन्हा कधी येईन तेव्हा त्यालाही घेऊन येईन. मी समजले. माझेही मन दीपाला पाहायला आसुसलेले असते'' भारतीताई दीपाच्या डोक्यावरून हात कुरवाळत म्हणाल्या.

''आता दिनेशला कोण सांभाळतं...?''

''आहे, एक बाई ठेवली आहे. तीच सर्व दिनेशचे बघते.'' आम्ही दोघी गप्पा मारत असतानाच दाराची बेल वाजली. उषाताईंनी दरवाजाकडे बघितले आणि लगेच त्यांच्या चेहऱ्यावर आंनदाची रेषा उमटली. मी जाऊन दरवाजा उघडला तर समोर एक धोतर नेसलेले, डोक्यावर काळी टोपी, कपाळावर चंदनाचा टिळा आणि डोक्यावर चष्मा असे गृहस्थ बघून मनात म्हटले हेच उषाताईंचे सदाभाऊ तर नसतील? असा विचार करत असतानाच ते स्वत: माझ्याकडे बघून म्हणाले, ''रजनी, तू इथे कुठे?''

मला काय बोलावे काहीच समजेना. 'ही कोण रजनी?' अशा प्रश्नचिन्हाने मी त्यांच्याकडे बघतच राहिले. तेवढ्यात उषाताईच म्हणाल्या ''हिचं नाव रजनी नाही तर अनामिका आहे. आम्ही तिला अनू म्हणतो.''

''नाही, माझी खात्री आहे की ही रजनीच आहे. माझे डोळे मला धोका देऊ शकत नाही.'' ते गृहस्थ म्हणाले.

''सदाभाऊ, तुम्ही आत्ता आलात जरा निवांत बसून हातपाय धुऊन आधी चहा घ्या. मग आपण बोलूच.'' असे म्हणून भारतीताईंनी विषय बदलला.

सदाभाऊंनी सुद्धा लगेच हातपाय धुऊन एक ग्लास थंड पाणी पिऊन उषाताईंजवळ बसले. त्यांच्या तब्येतीची विचारपूस करू लागले. ‘‘उषा, एवढी तब्येत कशी खराब झाली? डॉक्टरांची औषधं तर बरोबर घेतेस नं? तुला किती वेळा सांगितले की आता वय झाले आहे तर माझ्याकडे येऊन रहा. पण ऐकशील तर नं? आता भारतीताई आलेल्या आहेत म्हणून बरं झालं, आता इथे एकटी न राहता माझ्याबरोबर चल.’’ सदाभाऊ म्हणाले. तेवढ्यात भारतीताईंनी त्यांच्यासाठी चहा बनवून आणला. चहा घेत घेत ते भारतीताईंकडे बघत म्हणाले, ‘‘भारती, माझं बरोबर आहे नं? उषाला मी नाशिकला घेऊन जातो.’’

‘‘हो... हो, तेवढीच हवा पालट होईल आणि तब्येतही सुधारेल. हो खरचं, त्यांना घेऊन जा.’’ भारतीताई मंद हसत म्हणाल्या.

‘‘अरे सद्या, आता तू आलास ना? आता मला काही होणार नाही. हवामानाने हा दमा त्रास देणारच.’’ असे म्हणून उषाताईंनी सदाभाऊंचे समाधान केले. सदाभाऊ उषाताईंच्या उशाशी दिवसभर बसून होते. भारतीताई दीपाशी खेळत होत्या. त्या दीपाला एक सेकंद सुद्धा दूर करत नव्हत्या. कितीही झालं तरी त्या दीपाची खरी आई होत्या. मी रात्रीचा स्वयंपाक केला. गप्पा मारत मारत जेवणं उरकली. रात्री झोपताना भारतीताईंनी दीपाला आपल्या जवळच झोपवलं. त्यामुळे मला झोप येत नव्हती. मनात खूप साऱ्या विचारांचे काहूर माजत होते. ‘सदाभाऊ जे काही बोलले ते खरे असेल का? मी अनू नसून रजनी आहे का? म्हणजे त्यांना माझी ओळख असावी. मलाही उत्सुकता लागून राहिली की मी कोण आहे? माझे नाव काय? मी कुठली राहणारी? माझा परिवार कोण आहे? त्यांनी माझा शोध का नाही केला?’ साऱ्या प्रश्नांची उत्तरे सदाभाऊंकडे निश्चितच मिळतील. मला कधी एकदा सकाळ होते असे झाले होते. तेवढ्यात दीपाचा रडल्याचा आवाज आला. दीपाला माझी सवय झाली असल्याने मी बाजूला नाही हे बघून दीपा रडू लागली होती. भारतीताईंनी तिला चूप करण्यासाठी खूप प्रयत्न केले परंतु ती रडायची काही थांबली नव्हती. जेव्हा मी जवळ घेतले तेव्हा ती शांत झाली.

हे बघून भारतीताईंचा चेहरा लगेच उतरला. आपली मुलगी असूनही आपल्याकडे राहत नाही हे बघून त्यांचे मातृत्व दुखावले गेले. मला सुद्धा दीपा माझ्या कुशित आल्यावर डोळा लागला.

▲▲▲

# प्रकरण १६

उषाताईंची तब्येत दिवसेंदिवस नाजूक होत होती. त्यांना जेवणही जाईनासे झाले. सकाळपासून त्यांची तब्येत जास्तच खराब झाली होती. सदाभाऊंनी डॉक्टरांना बोलावून आणले. डॉक्टरांनी हॉस्पिटलमध्ये भरती करण्यास सांगितले. लगेच भारतीताईंनी आपल्या गाडीने तातडीने घाई करून त्यांना हॉस्पिटलमध्ये भरती केले. डॉक्टर आपापल्यापरीने प्रयत्न करीत होते. जेव्हा ऑक्सिजन चालू केला तेव्हा उषाताई शांत झाल्या. त्यांना श्वास घेण्यासाठी फारच त्रास होत होता. त्या अगदी तळमळत होत्या. आठ दिवस हॉस्पिटलमध्ये राहून उषाताईंची तब्येत सुधारत होती. म्हणून डॉक्टरांनी त्यांना डिस्चार्ज दिला आणि त्या घरी आल्या. परंतु त्या फारच अशक्त झाल्या होत्या. तेव्हा मीच त्यांचे बाथ देण्यापासून जेवण भरवण्यापर्यंत सर्व काही बघत होते. अशा परिस्थितीत त्यांनी एक महिना काढला. आणि अचानक हाय बी.पी.मुळे अ‍ॅटॅक येऊन उषाताई आम्हाला सोडून गेल्या. भारतीताईंचा सर्वांत मोठा आधार गेला. कारण भारतीताई आपलं सर्व दुःख त्यांच्याकडे मोकळे करत असत. उषाताईसुद्धा प्रसिद्ध गायिका होत्या. भारतीताईंची आणि त्यांची एका स्टुडिओमधील ओळख होती. त्यांची दोस्ती म्हणजे आपापसात झालेलं बहिणीचं नातं होतं. उषाताई स्वर्गवासी झाल्या परंतु भारतीताई तुटून गेल्या. कारण साहेबांच्या विक्षिप्तपणाच्या वागण्याने त्या एकट्या पडल्या होत्या. अशावेळी त्यांना उषाताईंचाच मानसिक आधार होता. परंतु उषाताईंच्या अंत्यविधीप्रसंगी साहेब मात्र अचानक आले काय आणि गेले काय काही समजलेच नाही. या गोष्टीचे मला आश्चर्य वाटले. उषाताईंचे दिवस कार्य आटोपल्यावर सदाभाऊंनी पुन्हा मला प्रश्न केला. ‘‘रजनी, तू इथे कशी

आलीस?''

''नाही भाऊ, मी कोण आहे? कुठून आले? माझे मलाच काही आठवत नाही.''

तेव्हा भारतीताईंनी माझी सर्व कहाणी सांगितली आणि तत्पूर्वीची कहाणी सदाभाऊंनी भारतीताईंना सांगितली.

''म्हणजे ही रजनी आहे तर!'' भारतीताई म्हणाल्या.

''भारती, ही रजनी कुठली काय याविषयी मी सुद्धा जाणत नाही. ही जेव्हा आमच्या मंदिरात आली होती तेव्हा ही एकटीच होती. एक रात्र हिने मंदिरात काढली. कोणी अनाथ समजून मी हिला आपल्या आश्रमाचा पत्ता देऊन पुण्याला पाठविली. त्यानंतर हिचा पत्ताच नाही. बरेच दिवस झाले तरी हिच्याविषयी काहीच माहिती मिळाली नाही. मी सुद्धा हिला ओळखत नव्हतो.'' सदाभाऊ भारतीताईंना सांगत होते आणि मी माझीच ओळख उत्सुकतेने ऐकत होते.

''परंतु कसा हा योगायोग? पुन्हा रजनी तुमच्या समोर आली आहे.'' तेवढ्यात दीपा रडायला लागली म्हणून भारतीताई दीपाला घेऊन बाहेर गेल्या.

''म्हणजे तू दीपाची सरोगसी आई आहेस तर?''

''हो, हो, अपघातात माझी स्मृती गेली तेव्हा या भारतीताईंनीच मला आधार दिला. मला एक ओळख दिली. मी अनामिका या नावाने ओळखू लागले. माझा हा दुसरा जन्म आहे. पहिले सारे मी विसरून गेले.'' मी गहिवरून बोलत होते.

''आता तू इथेच रहा. हा बंगला आमचाच आहे. तुलाही एक आधार मिळेल.'' सदाभाऊ प्रेमळपणे बोलत होते.

सदाभाऊ अनाथाश्रमाची व्यवस्था बघण्यासाठी थोडे दिवस पुण्याला तर मंदिराची देखभाल करण्यासाठी नाशिकला असे जाऊन येऊन होते. दीपा हळूहळू मोठी होत होती तसतसे उषाताईंच्या रूममधील वीणा तर कधी हार्मोनियम वाजवायचा प्रयत्न करत असे. तिचे हे वागणे बघून सदाभाऊ स्वत: तिला जवळ घेऊन गाणं गात असत. दीपा आता तीन वर्षाची झाली होती.

दीपाला शाळेत टाकायला हवे होते. भारतीताई तिचा सर्व खर्च उचलत होत्या. मी सदाभाऊंना घेऊन दीपाचे शाळेत ॲडमिशन केले. माझा पूर्ण दिवस दीपाच्या पाठी जात होता. तिची शाळेची तयारी करणं, तिचा अभ्यास घेणं यामध्येच दिवस कसा जात असे समजत नव्हते परंतु रात्र झाली की अनेक प्रश्न उभे राहत होते. कधी वाटायचे भारतीताईंनी माझ्यावर खूप उपकार केलेले आहेत. तर कधी वाटायचे की त्यांनी मला वाचवून, मला आधार देऊन आपला स्वार्थ साधला होता. त्यांनी पुत्रप्राप्तीसाठी माझा उपयोग करून घेतला. परंतु त्यांनी मला आधार दिला नसता तर माझे काय झाले असते? हा सुद्धा मोठा प्रश्न होता. परंतु आता माझी मुलगी दीपा माझे सर्वस्व झाले आहे. माझी ममता दीपाकडे वळत होती. ती माझी मुलगी आहे, या विचाराने कधी कधी झोप लागत नसे. मोठी झाल्यावर दीपाला भारतीताई माझ्यापासून दूर तर नाही करणार? आपला हक्क तर नाही दाखवणार? अशा विचारांचे काहूर माजत असे. तरीसुद्धा मला भारतीताईंचे स्वप्न पूर्ण करायचे होते. दीपाला हळू हळू जसे समजू लागले तस तसे तिची आई मीच झाले होते. परंतु भारतीताई दीपाला भेटायला येत असत तेव्हा त्यांचीही ममता 'आई' म्हणून हाक ऐकायला आतूर होत असे. भारतीताई कधी कधी दिनेशला बरोबर घेऊन येत असत. तेव्हा दीपा आणि दिनेश खूश होत असत. दोघंही जुळी भावंड होती परंतु दीपा दिसायला आपल्या वडिलांवर तर दिनेश भारतीताईंवर गेला होता. साहेबही खूश होते. दिनेशचा प्रत्येक वाढदिवस दरवर्षी थाटामाटात साजरा करत असत. परंतु दीपाला कधीच बोलवत नसत. मात्र भारतीताई दीपासाठी जीव टाकत होत्या. हळूहळू दिवस पुढे जात होते तसे दीपा व दिनेश मोठे होत होते. सर्व काही सुरळीत चालू होते.

▲ ▲ ▲

# प्रकरण १७

एक दिवस अचानक सकाळी-सकाळी दारावरची बेल वाजली. 'एवढ्या सकाळी कोण असणार?' असा विचार करुन मी दार उघडले तर दारात गणुकाका उभे होते. ''गणुकाका तुम्ही....? सर्व काही ठीक आहे नं?'' मी थरथरत्या आवाजातच गणुकाकांना प्रश्नावर प्रश्न विचारत होते. परंतु गणुकाका काही न बोलता खालच्या मानेने आत आले.

डोळ्यावरचा चष्मा काढून त्यांनी आपले डोळे टिपत म्हणाले ''अनू, काल भारतीताई रेकॉर्डिंग करून घरी येत असताना त्यांच्या गाडीला एक ट्रकने धडक दिली आणि... आणि''

''आणि काय?'' मी घाबरून जोरात ओरडले, ''भारतीताई तर ठीक आहेत नं?'' परंतु गणुकाका काहीच बोलू शकले नाही आणि मी सुद्धा एकदम डोळ्यासमोर काळोख येऊन चक्कर आल्याने खाली पडले. त्यानंतर काय झाले ते मला काहीच समजले नाही. मी डोळे उघडले तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये होते. माझ्या डोक्याला बँडेज बांधलेले होते. मी चक्कर येऊन पडल्याने माझ्या डोक्याला मार लागलेला होता. माझ्यासमोर गणूकाका, सदाभाऊ, डॉक्टर व नर्स उभे होते. मला माझ्या पहिल्या अपघाताची स्मृती हळू हळू येऊ लागली. मी ओरडू लागले ''माझी पर्स कुठे आहे? मला पुण्याला जायचे आहे. गीता कुठे आहे? माझे सामान कुठे आहे?'' अशी मी बडबड करून माझ्या डोक्यात कळ आल्यासारखे झाले. मी डोक्याला घट्ट पकडून ठेवले. डॉक्टरांनी लगेच मला इंजेक्शन दिले. त्याने माझ्या डोळ्यावर झापड आली. एक तासाने पुन्हा मी जागी झाले. मला जरा फ्रेश वाटत होते. मी सदाभाऊंना बघून ओळखले की हेच सदाभाऊकाका आहेत. डॉक्टरांनी येऊन मला हातात हात मिळवून

म्हणाले ''अभिनंदन, तुमची गेलेली स्मृती परत आली आहे.'' मलाही सर्व आठवू लागले. परंतु गीताला भेटलेली रजनी इथपर्यंतच मला आठवत होते. तेव्हा डॉक्टरही म्हणाले की ''पाच वर्षापूर्वीचे आठवणार नाही. या पाच वर्षांत जे घडले ते सर्व आठवेल. डोक्याला ताण देऊ नका.'' असे म्हणून डॉक्टर निघून गेले. सदाभाऊकाकांनी माझ्या खांद्यावर हात ठेवून मला धीर दिला. त्यांच्या तोंडावर आनंद दिसत होता कारण माझी स्मृती परत आली होती. मी इकडे तिकडे बघितले, माझी दीपा मला दिसत नव्हती. माझी कावरी बावरी नजर बघून सदाभाऊ म्हणाले ''दीपा सुखरूप आहे, तिला मी शाळेत सोडून आलो. तू इथे होतीस तर दीपा रडत होती. ''आई कुठे? आई कुठे?'' म्हणून हैराण केलं. गणुकाकांनीच तिला सांभाळली म्हणून बरे झाले. आता तेच तिला शाळेतून घेऊन येतील. या पाच वर्षातील माझ्या जीवनातील सर्व घटना मला आठवू लागल्या होत्या. दोन दिवसांत मला डिस्चार्ज मिळाला. घरी गेल्या गेल्या मी दीपाला कुशित घेतले. तिला गोंजारू लागले. हे बघून सदाभाऊ आणि गणुकाकांच्या डोळ्यात पाणी आले. मी चक्कर येऊन पडले हे मला आठवले. परंतु का मी पडले? चक्कर का आली? हॉस्पिटलला मला कोण घेऊन गेले हे मला नीटसे आठवत नव्हते. परंतु गीता मला आठवली म्हणून मी सदाभाऊंना विचारले, ''गीता कशी आहे?''

ही आत्ताच विस्मृतीमधून बाहेर आली आहे असा विचार करून सदाभाऊ म्हणाले ''अनू, तू आताच हॉस्पिटलमधून आली आहेस. आंघोळ वगैरे करून जेऊन घे. मी खिचडी बनवतो. मग तुझी औषधं घेऊन आराम कर. नंतर आपण गीताविषयी बोलू या.'' असं म्हणून सदाभाऊंनी विषय टाळला.

हळू हळू माझ्या डोक्याची जखम भरत होती. पंधरा पंधरा दिवसांनी डोक्याचे बँडेज बदलण्यासाठी हॉस्पिटलला जावे लागत होते. म्हणून सदाभाऊ दोन महिन्यांपासून इथेच पुण्यात होते. दीपाचे सर्व काही तेच बघत होते. अचानक मनात विचार आला की मला चक्कर येण्याचे कारण काय होते? मी हळू हळू आठवण्याचा प्रयत्न करू लागले. त्या दिवशी गणुकाका सकाळी

सकाळी घरी आले होते. त्यांनी मला कोणाच्यातरी अपघाताविषयी सांगितले. कोणाचा अपघात झाला होता? मी एवढी हॉस्पिटलला ॲडमिट असूनही मला भारतीताई बघायला कां आल्या नाहीत? त्या येणार नाही असे होऊच शकणार नाही. मग भारतीताईंना तर अपघात झाला नसावा? बरेच दिवस होऊनही त्या दीपालाही बघायला आल्या नाही. किंवा दीपासाठी पैसेही पाठविले नाहीत.''

मी लगेच उठून सदाभाऊंच्या रूममध्ये गेले तर सदाभाऊ झोपले होते. आता ते उठल्यावर त्यांना गीता आणि भारतीताईंविषयी विचारावे असा विचार करून मी स्वयंपाकाला तयारीसाठी भाजी कापायला गेले. पोळ्यांसाठी कणीक भिजवली. तांदूळ निवडून डाळ-भाताचा कूकर चढवला. मला आगीसमोर जायचे नाही म्हणून सदाभाऊच जेवण बनवायचे. मी मात्र तयारी करून द्यायचे. पंधरा-वीस मिनिटांनी सदाभाऊ उठले आणि जेवण बनवायला सुरुवात केली. ''अगं अनू, मला उठवायचं होतं ना? उगाच जेवणाला उशीर होतो नं? तुला टाईमावर जेवण, टाईमावर औषधं घ्यायला हवीत.''

''दीपा कुठे गेली?'' सदाभाऊ आम्हा दोघींची खूप काळजी करत असत. आमची दुपारची जेवणं झाली. दुपारची वामकुक्षी झाली. दीपा हॉलमध्ये खेळत होती. सदाभाऊ आरामखुर्चीत बसून विचार करत असल्यासारखे वाटत होते. मी त्यांच्याजवळ जाऊन प्रथम गीताविषयी विचारले. ''हो... हो सांगतो, बस इथे.'' मी त्यांच्या बाजूला बसले.

''अनू, गीताची फार दुर्दैवी कहाणी आहे. तुला माहीतच आहे, ती गरोदर होती. ती बाळाला जन्म देतेवेळी खूप आजारी पडली. त्यात ती खूप अशक्त झाली होती. जन्म दिलेले बाळ ही कमी वजनाने मरून गेले. त्यानंतर दोन दिवसांनी आपल्या दोन मुलींना सोडून स्वर्गवासी झाली. त्या वेळी तिच्याजवळ कोणी नव्हते. आजूबाजूच्या लोकांनीच तिचे सर्व अंत्यविधी केले. तिचा दहावा बारावा करायलाही कोणी नव्हते. तेव्हा ज्या पार्टीचे बाळ होते ती पार्टी एजंटकडे पैशासाठी वाद घालू लागली. आम्ही केलेला एवढा खर्च फुकट गेला. आम्हाला आमचे पैसे तरी द्या नाहीतर बाळ द्या. तेव्हा एजंटने त्या पार्टीला गीताच्या मुलींना दत्तक घेण्यास सांगितले. परंतु मुलगी

आहे म्हणून त्यांनी त्या दोन्ही मुलींना नाकारले. ‘मुलगा असता तर आम्ही दत्तक म्हणून घेतले असते’ तेव्हा एजंटने त्या दोघींना मी आश्रमामध्ये ठेवतो असे म्हणून तो दोघींना घेऊन गेला. जेव्हा बरेच दिवस गीता मंदिरात आली नाही किंवा दर गुरुवारी ती फळांचा भोग द्यायची तो पण आला नाही. म्हणून मी चौकशी केली तर ही गीताचरी दुर्दैवी कहाणी समजली. त्या दोन मुलींना आपल्या पुण्याच्या आश्रमात ठेवावे या विचाराने तिच्या घरी गेलो तर दाराला कुलूप होते. म्हणून आजूबाजूला विचारून चौकशी केली तर त्या मुलींना अनाथाश्रमात ठेवले आहे असे समजले. म्हणून बरेचसे आश्रम बघितले परंतु त्या मुली कुठेच मिळाल्या नाही.’’

सदाभाऊंनी चष्मा काढून डोळे पुसले. मला तर गदगदून आले. संध्या व समिधा या चिमुकल्या मुली माझ्या डोळ्यासमोर दिसू लागल्या. ‘आता त्या कुठे असतील? कुठल्या स्थितीत असतील? या विचाराने मला रडू आले. माझ्या कठीण परिस्थितीला गीतानेच मला आधार दिला होता. एका बहिणीसारखी माझी काळजी घेतली होती. परंतु तिला जेव्हा आधाराची गरज होती तेव्हा मी तिच्या उपयोगी पडले नाही. माझेच मन मला खाऊ लागले होते. गीताच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी मी संध्या व समिधाचा शोध घेईन. गीताने सरोगसी करून दुसऱ्याची कूस उजवली होती. आणि दुसऱ्या खेपेला स्वत:च्याच कुशीतील मुलींना उजाड केले होते, निराधार केले होते.’

▲ ▲ ▲

# प्रकरण १८

एक दिवस उषाताईंची रूम झाडायला गेले तेव्हा बघतेतर हार्मोनियम, वीणा, त्यांच्या गाण्याच्या रेकॉर्डस् यांच्या कव्हरवर धूळ जमा झाली होती. सदाभाऊ बघतील तर काय म्हणतील? असा विचार करून मी लगेच झाडू घेऊन साफसफाईला लागले. सर्व धूळ झाडून त्यांचे कपाट उघडले. कपाटात मात्र त्यांच्या सर्व वस्तू, कपडे वगैरे व्यवस्थित लावून ठेवले होते. मी एकेक वस्तू काढून बघू लागले. तेव्हा मला एक फोटोचा अल्बम मिळाला. उत्सुकतेने उघडून बघितला तर पहिलाच फोटो उषाताईंचा होता. तरुणपणी उषाताई किती सुंदर दिसत होत्या. माझी नजर त्यांच्यावर खिळूनच राहिली. मी तो फोटो उलटून पुढचा बघितला तर उषाताईंच्या फॅमिलीचा होता. त्यात सदाभाऊ सुद्धा दिसत होते. पुढे पुढे त्यांच्या गाण्याच्या प्रोग्रामचे फोटो तर बरेचसे त्यांना मिळालेल्या पुरस्काराचे फोटो होते. तो अल्बम बघून मी दुसरा अल्बम उचलून बघायला सुरुवात केली. पहिलाच फोटो त्यांचा आणि त्यांच्या पतीचा असावा. पुढे पुढे बघत गेले तर त्यांच्या विवाहाचे फोटो होते. म्हणजे उषाताई विवाहित होत्या. तिसरा अल्बम बघितला तर कॉलेज लाईफ मधील मित्र-मैत्रिणींचा असावा. हा फोटो उलटत उलटत गेले आणि एक फोटो बघून मला धक्काच बसला. दीपाच्या पप्पांनी उषाताईंच्या गळ्यात हात घालून फोटो काढला होता. दीपाचे पप्पा म्हणजे भारतीताईंचे पती म्हणजे आमचे साहेब, यांचा उषाताईंशी काय संबंध? अचानक मला भारतीताईंची स्मृती आली. भारतीताईंचा फोटो बघून एक एक प्रसंग आठवू लागले. माझ्या चक्करचे कारण होते भारतीताईंचा झालेला अपघात. परंतु नंतर काय झाले याविषयी कोणीच काही मला सांगितले नव्हते. माझ्यापासून लपवले होते.

सदाभाऊंनीसुद्धा मला काही सांगितले नाही. मला माझा वर्तमानकाळ स्पष्टपणे आठवू लागला. हळू हळू त्या आठवणीतून मी बाहेर आले. अल्बमच्या शेवटी एक चिठ्ठी होती ती उघडून मी वाचू लागले.

प्रिय राज,

आपण कॉलेजपासूनचे दोस्त आहोत. आपण एकमेकांवर खूप प्रेम करतो. दोघांनी लग्न करण्याच्या शपथा घेतलेल्या आहेत. परंतु राज, आपले लग्न होणार नाही. तू मला समजून घे. तू गरीब आहेस हीच आमच्या प्रेमामधली मोठी तटबंदी आहे. तू कसाही असो, तू मला हवा आहेस.... परंतु माझ्या पप्पांना हे लग्न मान्य नाही. त्यांनी मला अट घातली आहे की, मी तुझ्याशी लग्न केले तर माझी तिरडी निघेल या घरातून..... पप्पांची एवढी मोठी अट, आता तूच सांग मी काय करू? मला क्षमा कर... राज, तुला माझ्यापेक्षा दुसरी चांगली मुलगी मिळेल. मला माफ कर.

तुझी उषा

चिठ्ठी वाचून माझे मन भरून आले. मी लगेच दुसरी चिठ्ठी वाचायला घेतली. उघडली तर ती राजची होती.

प्रिय उषा,

तुझे माझ्यावर खरे प्रेम असेल तर तू माझ्याकडे ये. परंतु तुझ्या पप्पांना समजावून ये. तू आली नाहीस तर माझ्या मनात स्त्री जातीवर तिरस्कार निर्माण होईल हे सुद्धा तितकेच खरे आहे. मला तू हवी आहे. तुझ्या विना मी अधूरा आहे. उषा, मी तूझी वाट पाहीन.''

फक्त तुझाच,

राज

उषाताईच्या जीवनाविषयी मला खूप वाईट वाटले. साहेबांच्या स्त्री विषयीच्या तिरस्काराचे खरे कारण आज मला समजत होते. परंतु भारतीताईंचे जीवन किती दु:खी झाले. मला त्यांना भेटायलाच हवे. तेवढ्यात अनाथआश्रमातून सदाभाऊ आले. हात-पाय धुऊन त्यांनी टि.व्ही. लावला आणि दीपाला आपल्या मांडीवर बसवून गाणी ऐकत बसले. मी उषाताईंची

रुम नीट करून स्वयंपाकासाठी किचनकडे वळले. दुपारची जेवणं झाली. दीपा झोपून गेल्यावर मी सदाभाऊंच्या बाजूला जाऊन बसले. आणि हलकेच त्यांच्याकडे भारतीताईंचा विषय काढला. माझ्या तोंडून भारतीताईंचे नाव काढताच ते माझ्याकडे आवाक् होऊन पाहात राहिले. ''कां.... काय झाले? तुम्ही एवढे दचकलात का?'' मी म्हणाले.

''नाही, तसं काही नाही... पण तुला त्यांची अशी अचानक आठवण कशी झाली?'' सदाभाऊ गंभीरपणे म्हणाले.

''मला वाटते की बरेच महिने झाले, त्या दीपाला बघायला कशा आल्या नाहीत? तसेच दीपासाठी पैसे पाठवले नाहीत.'' मी म्हणाले. परंतु त्यावर सदाभाऊ काहीच बोलले नाही. ते विचार करू लागले की हिला भारतीताईंच्या अपघात आणि मृत्युविषयी कसे सांगावे? पुन्हा हिच्या डोक्यावर काही परिणाम झाला तर? या विचाराने ते चूपच होते. परंतु हे सत्य कधी ना कधी उघड होणारच होते. म्हणून सदाभाऊंनी हिम्मत करून मला सर्व काही सांगितले. ते ऐकून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. मी रडू लागले. मला त्यांचे शेवटचे दर्शनही घेता आले नाही. या गोष्टीची मनाला रुखरुख वाटू लागली. परंतु मी स्वत:ला सावरून घेतले आणि एक दिवस साहेबांना भेटायला गेले. त्या वेळी ते खूप गंभीर दिसत होते. ते अजूनही भारतीताईंच्या मृत्यूच्या दु:खातून बाहेर आलेले नव्हते.

'मी दिनेशला सांभाळते' असे म्हणूनही त्यांनी दिनेशला माझ्याकडे दिले नाही. उलट ते म्हणाले की, ''दिनेशही माझ्याजवळ राहिला नाही तर मी एकटा कसा राहू शकेन? हे एकटेपण मला खायला उठेल. भारती होती तेव्हा मी तिचे प्रेम समजू शकलो नाही.'' साहेबांचे डोळे पाण्याने भरले होते. त्यांचा स्वभाव थोडा नरम पडला होता.

भारतीताईंच्या मृत्युनंतर दिनेश एकटा पडला होता. म्हणून रामूच्या बायकोला म्हणजे लक्ष्मीला दिनेशची देखभाल करण्यासाठी ठेवून घेतले होते. दिनेश मोठा होत होता. साहेब त्याला कधी कधी आपल्याबरोबर रेकॉर्डींगसाठी घेऊन जात असत. जोपर्यंत लहान होता तोपर्यंत तो साहेबांच्या

नजरेत होता. स्कूलमध्ये जाऊ लागला तस-तसे त्याच्या स्वभावात फरक पडू लागला. जिद्दीपणा वाढू लागला. मस्तीही करू लागला. त्याचे बोलणे सुद्धा उद्धटपणाचे झाले. उलट उत्तरे देऊ लागला. त्याच्यावर संस्कार घडवणारे कोणीच नव्हते. साहेब नेहमीच त्याला गाण्याच्या रेकॉर्डींगसाठी घेऊन जाऊ शकत नव्हते. त्यामुळे तो घरात एकटा पडू लागला. आईच्या ममतेपासून दुरावला गेला. म्हणतात नं की 'आई विना भिकारी' तशी गत दिनेशची झाली होती. अशा स्थितीत दिनेशला बघून माझा जीव तुटत होता. मी त्याला जन्म दिला. मी त्याची सरोगसी आई असले तरी माझ्या मातृत्वाच्या भावना जागृत होत्या. परंतु साहेबांपुढे माझे काही चालण्यासारखे नव्हते. दिनेश जसा जसा मोठा होऊ लागला तस-तसे त्याच्या वागण्यात वाह्यातपणा दिसू लागला. अभ्यास करण्याऐवजी दिवसभर मोबाईल आणि टि.व्ही. याशिवाय त्याला काहीच दिसत नव्हते. त्यामुळे स्कुलमध्ये सुद्धा मागे पडत चालला. साहेबांच्या नजरेला सुद्धा तो घाबरत नव्हता. साहेब त्याला संगिताकडे वळविण्याचा प्रयत्न करत होते. परंतु संगितविषय त्याच्या जीवनाच्या शब्दकोशातच नव्हता. बाहेर टपोरी मुलांच्या संगतीत राहून त्याच्या जीवनाची दिशा दुसऱ्याच मार्गाला जात होती. शालेय जीवनातून तो कॉलेजमध्ये आला. कॉलेजसाठी पॉकेटमनी मागून व्यसनाच्या अधीन जाऊ लागला. साहेबांना दिनेशची चिंता वाटू लागली. म्हणून त्याला बोर्डिंगमध्ये ठेवण्याचा विचार केला. परंतु दिनेशने स्पष्टच सांगून टाकले की ''मी बोर्डिंगला राहणार नाही. पप्पा, मी नको असेन तर तसं सांगा मी या घरातून निघून जाईन.'' दिनेशच्या अशा बोलण्याने साहेब काहीच करू शकले नव्हते. त्यामुळे ते आणखीनच चिंताग्रस्त झाले. हळू हळू त्यांना समजून येऊ लागले की आपल्या अहंकाराने मी दिनेशचे आयुष्य खराब केले. परंतु वेळ निघून गेली होती. कळूनही वळण्यासारखे नव्हते. त्यांना पश्चात्ताप होऊ लागला की दिनेशला लहान असतानाच अनूकडे ठेवले असते तर आज त्याची अशी गत झाली नसती. त्याची वागणूक एवढ्या थराला गेली होती की त्याला परत पाठी फिरवणे फार मुश्कील होते. घरी मित्र-मैत्रिणींना आणून नाच-गाणी-पार्टी यामध्येच तो

गुंतून गेला होता. मुलींशी अनैतिक संबंध ठेवू लागला. हळूहळू वेश्यालयात जाऊन रात्र रात्र बाहेर काढू लागला. ही दिनेशची करतुते मला रामूकडून समजत होती. आज भारतीताई असत्या तर दिनेशची ही हालत झाली नसती. चांगला मुलगा हाताबाहेर गेला नसता. मला हे सारे बघवत नव्हते. परंतु अहंकारी साहेबांना समजावणार कोण? रामू, गणुकाका यांनीसुद्धा त्यांच्यापुढे हार मानली होती.

▲▲▲

# प्रकरण १९

दीपासुद्धा मोठी होऊन समजदार झाली होती. नियमितपणे ती तिचे कॉलेज सांभाळून गायनाच्या क्लासेसला जात होती. सदाभाऊ म्हणजे तिचे काका रोज सकाळी उठून तिचा रियाज घेत होते. केशवाचार्य म्हणजे उषाताईंचे मानलेले भाऊ यांच्याकडे दीपाचे गायनाचे क्लासेस सदाभाऊंनीच चालू केले होते. त्यामुळे ते दीपाची फी कमी घेत होते. तरीपण ती फी भरायला जड जात होते. साहेब काहीच मदत करत नव्हते. दीपाला त्यांनी आपली मुलगी म्हणून कधीच मानले नाही. त्यामुळे सावकारांकडून आश्रमाला आलेल्या देणगीतूनच घराचा खर्च काढत होते. तसेच नाशिकच्या मंदिराची तसेच पूजेच्या दक्षिणेतून दीपाची फी भरत होते. खर्चाची खूपच ओढाताण होत होती. म्हणून 'मी कामाला जाते' म्हणाले तर सदाभाऊ मला रागवायचे आणि म्हणायचे की ''कामाला जायची काही गरज नाही. मी अजून जिवंत आहे.'' मग माझे काही चालायचे नाही. परंतु जेव्हा खर्चाची अधिकच चणचण भासू लागली तेव्हा सदाभाऊंनी बंगल्याचा वरचा मजला भाड्याने दिला. तेव्हा जरा स्थिरता आली. कसे बसे दिवस जात होते. परंतु भारतीताईंची इच्छा मला पूर्ण करायची होती. दीपाला मोठी गायिका बनविण्याचे त्यांचे स्वप्न मला प्रत्यक्षात आणायचे होते. मनात असंख्य विचार येत होते. विचारात गुंग झाले होते तोच सदाभाऊंनी आवाज दिला. ''अनू, जेवण तयार आहे कां.?''

''हो, हो. मी आलेच.'' असे म्हणून मी किचनमध्ये जाऊन त्यांच्यासाठी जेवणाचे ताट वाढून आणले आणि डायनिंग टेबलवर ठेवले. सदाभाऊ जेवायला बसले. तेवढ्यात फोनची बेल वाजली. आणि मी धावतच

जाऊन फोन उचलला. फोन रामूचा होता. ''हं बोल रामू, या दुपारच्यावेळी फोन कसा केला? साहेबांची तब्येत ठीक आहे नं? दिनेश ठीक आहे नं?'' मी घाबरून प्रश्नांवर प्रश्न करत होते.

''ताई, दोन दिवस झाले तरी दिनेश घरी आला नाही'' रामू कावरा-बावरा होऊन बोलत होता.

''कां... कुठे गेला? आणि तू मला आज फोन करतोस? त्याचे आणि साहेबांचे काही भांडण झाले होते कां?'' मी विचारले.

''नाही ताई, त्यांचे भांडण वगैरे असे काही झाले नव्हते. पोलीस स्टेशनवरून फोन आला होता की दिनेशला पोलिसांनी पकडले आहे.'' रामू म्हणाला.

''कां? काय केले त्याने?'' मी विचारले.

''त्याने काय केले नाही, असे विचारा ताई.'' रामू हळू आवाजात बोलत होता.

''ताई, एका पबवर पोलिसांची धाड पडली तेव्हा तो पकडला गेला.''

''अरे बापरे, काय बोलायचे या मुलाला?'' मी कपाळाला हातच लावला.

''ताई, तो जामिनवर सुटेल परंतु साहेब तयार नाहीत.''

''त्याला सडू देत जेलमध्ये म्हणजे त्याची अक्कल ठिकाणावर येईल, असं ते म्हणत होते. असं कसं म्हणून चालेल? आपल्या मुलाला आपण जामीन नाही राहणार तर कोण बाहेरचे राहणार?''

''ठीक आहे, पुढे काय करायचे ते मी बघते'' असं म्हणून मी फोन ठेवला.

''काय गं, कोणाचा फोन होता? एवढा वेळ कोणाशी बोलत होतीस? काही प्रॉब्लेम आहे का?'' सदाभाऊंनी विचारले. तेव्हा मी दिनेशविषयी सर्व काही त्यांना सांगितले.

''हे बघ अनू, एवढं सगळे होऊनही दिनेशच्या पप्पांनी आपल्याला काही कळवलं का? नाही नं? मग तू त्यामध्ये का पडतेस?'' सदाभाऊ

गंभीरपणे म्हणाले.

''दिनेश माझ्याजवळ नसला म्हणून काय झाले...? परंतु त्यालाही जन्म मीच दिला आहे नं? मी त्याची खरी आई नसले तरी त्याला नऊ महिने पोटात ठेवून त्या गर्भबीजाची जपणूक केली आहे. त्याचा पहिला संबंध माझ्याशी जुळला गेला आहे. त्याची स्पंदने मी ऐकली आहेत. मातृत्वाची हितगुज केवळ माझ्या स्पर्शातून अनुभवली आहे. मी सरोगेट माता असले तरी माझी ममता कमी कशी होईल? त्याच्यासाठी माझा जीव तुटणारच नं? समोरच्या पार्टीला तो व्यवहार असेल. पैशाने गर्भाशय विकत घेतले. बाळ मिळाले की पैसे देऊन टाकले म्हणजे व्यवहार संपला त्यांचा. परंतु त्या मातेला तो गर्भ नऊ महिने सांभाळण्यासाठी किती यातना सहन कराव्या लागल्या असतील? किती अडचणींना तोंड द्यावे लागले असेल? नऊ महिन्यांत जोडलेले गेलेले ममतेचे पाश सहजासहजी तुटत असतील का? ते बाळ पार्टीला देताना तिचे ममतेचे नाजूक पाश तीळ तीळ तुटताना त्या मातेची मानसिक अवस्था काय होत असेल, हे सरोगेट माता शिवाय कोणीही सांगू शकणार नाही.'' मी डोळ्यांतील पाणी पुसत पुसत बोलत होते.

''ठीक आहे, मग तू पुढे काय करायचे ठरवले आहेस?'' सदाभाऊंनी विचारले.

''बघते मी, काहीतरी करायला तर हवेच.'' मी शांतपणे बोलले. तेवढ्यात दीपाही कॉलेजमधून आली आम्ही लगेच विषय बंद केला.

''काय आई, मी आल्यावर तुम्ही एकदम चूप का झालात?''

''नाही गं, तुझं आपले काहीतरीच दीपा'' मी दीपाचे समाधान केले. विषय बदलण्यासाठी उगीचच बोलायचे म्हणून बोलले.

''दीपा, आज तू लवकर आलीस? चल, हातपाय धुवून घे मी तुला जेवायला वाढते.''

सदाभाऊ टि.व्ही. लावून आरामखुर्चीत विचार करत बसले. जेवता जेवता दीपा कॉलेजच्या गोष्टी सांगत होती. ''आई, पंधरा दिवसापूर्वी सिंगिंग कॉम्पिटिशन झाली होती नं? त्यात मला पहिले पारितोषिक मिळाले.''

मी आनंदाने तिच्या पाठीवर थाप मारून म्हणाले ''शाब्बास दीपा. आईचं नाव काढशील.'' मला लगेच भारतीताईंची आठवण झाली. परंतु दीपाला मी अजूनपर्यंत कळू दिले नव्हते की तू भारतीताईंची मुलगी आहेस. कारण दीपाला मी दूर करू शकत नव्हते. आणि ती माझ्यापासून दूर होईल या भीतीने तशी तिला जाणीवही होऊ देत नव्हते. दीपा हळू हळू संगितामध्ये भारतीताईंच्या पावलावर पाऊल ठेवत होती. तिचे संपूर्ण कपाट संगितामध्ये मिळालेल्या अॅवार्डस्‌नेच भरून गेले होते. दीपाचे जेवण झाले आणि ती आपल्या रुममध्ये गेली.

▲▲▲

# प्रकरण २०

मी विचार करत होते, दिनेशला कसे सोडवावे? उद्या दीपा कॉलेजला गेल्यावर पोलीस स्टेशनला जाऊन दिनेशला भेटून यावे. या विचारातच होते. दुसऱ्या बाजूने साहेबांची भीतीही वाटत होती. काही उलट–सुलट बोलले तर? एक मन म्हणत होते की असेल त्यांचा मुलगा, परंतु त्याला जन्म मी दिला. मी सरोगेट आई होते. आज भारतीताई नसल्याने माझ्या मनाला दिनेशविषयी भावना असणारच नं? आज तरुण मुलाचे आयुष्य फुकट जात आहे आणि ते मी उघड्या डोळ्याने नुसती बघत बसू? नाही... मला जायलाच हवे... सकाळचे दहा वाजले. दीपाही कॉलेजला निघून गेली होती. सदाभाऊ अनाथाश्रमात गेले होते. मी लगेच तयारी करून पोलीस स्टेशनला गेले. इन्स्पेक्टरला भेटले. एकंदरित दिनेश पबमधील एका मंदिरा नावाच्या डांस करणाऱ्या मुलीच्या प्रेमात पडला होता. जेव्हा पोलिसांची धाड पडली तेव्हा बरीच तरुण मुले–मुली तर काही वयस्करही पकडले गेले होते. इन्स्पेक्टरने मला सर्व खुलासा केला आणि विचारले की ''तुम्ही कोण?''

''मी दिनेश या मुलाची आई आहे. त्याला आता सोडून द्या साहेब.'' मी त्यांना विनवणी करत होते.

''मॅडम, असं कसं सोडून देणार? त्याला कोणी जामीन राहायला लागेल'' इन्स्पेक्टर जरा तिरसटपणेच बोलत होता.

''किती पैसे भरायला लागतील'' मी विचारले.

''पंचवीस हजार रुपये भरा आणि दिनेशला घेऊन जा..'' एवढं बोलून इन्स्पेक्टर टेबलवर ठेवलेल्या चहाचे भुरके मारू लागला. मला मोठा प्रश्न पडला. पंचवीस हजार आणायचे कुठून? भारतीताई असत्या तर लगेच पैसे काढून दिले असते. सदाभाऊंना तरी कोणत्या तोंडाने सांगू? एकतर माझा

आणि दीपाचा सर्व खर्च तेच बघतात.'' शेवटी मला भारतीताईंनी दीपाला दिलेली सोन्याची चेन मोडून पैसे उभे करणं भाग होतं. रात्रभर मला झोप आली नाही. उद्या सकाळी सहा वाजता सदाभाऊ दोन दिवसांसाठी मंदिराची देखभाल करण्यासाठी ते नाशिकला जायचे होते म्हणून सकाळी लवकर उठून त्यांना सकाळचा नाश्ता दिला. बरोबर पोळी-भाजीचा डबाही तयार केला. दीपासुद्धा लवकरच कॉलेजला निघून गेली. तिने रियाज सुद्धा केला नाही. नाहीतर एक दिवससुद्धा ती रियाज चुकवत नाही. म्हणूनच ती संगितामध्ये पुढे पुढे येत होती. मी नाश्ता करून पोलीस स्टेशनला जायची तयारी करू लागले. दीपाची चेन घेऊन सोनाराच्या दुकानात गेले. सोनाराने चेनचे वजन करून पंचवीस हजार रुपये माझ्या हातात ठेवले. गहाण ठेवल्याची पावती घेऊन मी पोलीस स्टेशनला गेले. पैसे भरून मी दिनेशला सोडवले. भारतीताई गेल्यापासून मी एकदाच साहेबांना भेटायला गेले होते. त्यानंतर मी गेलेच नव्हते त्यामुळे दिनेश आणि माझे संबंध दुरावलेलेच होते. म्हणून दिनेश माझ्याशी कसा व्यवहार करेल या गोष्टीचा मला अंदाज नव्हता. तेवढ्यात इन्स्पेक्टर ओरडला ''दिनेश लडकेको छोड दो.''

लगेच एका पोलिसाने तुरुंगाचे कुलूप काढून दिनेशला बाहेर काढले. दिनेशने बाहेर येताच माझ्याकडे एक नजर टाकली आणि थँक्स् म्हणून बाहेर निघून गेला. मी त्याच्या पाठी धावणार इतक्यात कोणीतरी ''रजनी मावशी'' म्हणून कोणी हाक मारल्याचा मला भास झाला. मी पाठी वळून बघितले तर दोन मुली तुरुंगाच्या ग्रीलमधून हात बाहेर काढून मला बोलवत होत्या. रजनी मावशी म्हटल्या बरोबर मला गीताची आठवण झाली. गीताच्याच मुली संध्या आणि समिधा मला रजनी मावशी म्हणून हाक मारायच्या. माझ्या छातीत एकदम धस्स् झाले. 'गीताच्या मुली इकडे कशा. या पबच्या मुलींमधे कशा?' मी लगेच आवाजाच्या दिशेने वळून बघितले. संध्या आणि समिधा मला पाहाताच हसल्या. परंतु त्यांच्यात खूपच फरक पडलेला होता. त्यांना बघूनही ओळखता येण्यासारख्या नव्हत्या. केवळ रजनी मावशी म्हणून हाक दिल्याने मी त्यांना ओळखू शकले. त्यांचा तो चेहऱ्यावरचा मेकअप, त्यांची केसाची

ठेवण, त्यांचे आखूड आणि तंग कपडे हे सर्व बघून मी थक्कच झाले. त्या गीताच्या मुली कुठे आणि या पबमध्ये काम करणाऱ्या डान्सर कुठे. शाळेमध्ये पहिल्या नंबरने पास होणाऱ्या हुशार मुलींची काय अवस्था झाली आहे. त्या दोघींच्या चेहऱ्यावर या विटंबित जीवनाचा काहीच परिणाम दिसत नव्हता. त्या जीवनाचा त्यांना सराव झाला होता. लगेच मी भानावर येऊन संध्या व समिधाच्या पुढे येऊन उभे राहिले. परंतु काय बोलावे काहीच समजत नव्हते.

तेवढ्यात संध्या म्हणाली ''रजनी मावशी, तू आम्हाला सोडून कुठे गेली होतीस? आम्ही तुझी खूप वाट बघितली. आई खूप आजारी झाली. तिच्या पोटातले बाळ पोटातच मरून गेले. आणि आईसुद्धा आम्हाला सोडून गेली. आम्ही एकट्या पडलो म्हणून एजंट मामाने तुम्हाला आश्रमात सोडतो असे सांगून शेवंताबाईला विकून टाकले. आम्ही तिथून पळून जायचा खूप प्रयत्न केला परंतु शेवंताबाईची माणसं आम्हाला मारायची. 'साली दोनो भाग जाती है। अरे तुमको बीस लाख में खरीदा है। पैसा वापस दो बाद में भाग जाओ।' असे म्हणून ती लोक आम्हाला कोंडून ठेवायची. आता आमचे हेच जीवन आहे. कोणीच काही करू शकत नाही. ही लोकं फार क्रूर आहेत'' असे म्हणून त्या दोघींनी माझा हात हातात घेतला. तेव्हा त्यांची झालेली दशा बघून मला गदगदून आले. माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. परंतु मी काहीच करू शकत नव्हते. जणू रडून रडून त्यांच्या डोळ्यांतील अश्रू सुकून गेले होते. भावना मरून गेल्या होत्या. समोर आलेल्या जीवनाच्या सत्याला त्यांनी स्वीकारले होते. त्यांनी जाणले होते की आपल्याला आता समाजाचे दरवाजे बंद झालेले आहेत. आपली दुनिया वेगळी आहे. जरी पळून त्या समाजात गेलो तरी पक्ष्याच्या पिल्लाप्रमाणे आपलीच लोक आपल्याला जगू देणार नाही. म्हणून आम्हाला इथेच राहणे भाग आहे. त्या दोघींनी माझा हातात हात घेतलेला सोडला. मनात आले की त्या चिमुरड्या मुलींना परिस्थितीने किती समजदार बनविले होते, किती प्रौढ बनविले होते. माझे पाय जमिनीला खिळूनच गेले. इन्स्पेक्टरशी बोलून तर बघू या म्हणून मी इन्स्पेक्टरच्या टेबलजवळ गेले. तेव्हा एक जबरदस्त आडदांड असा काळ्या वर्णाचा रागीट

माणूस आला आणि त्याने नोटांचे पुडकं इन्स्पेक्टरच्या हातात दिले. रजिस्टरवर सही करून कोणाची तरी वाट पाहात उभा राहीला. लगेच एका पोलिसाने तुरुंगाच्या गेटचे कुलूप काढून त्यामधील सर्व मुलींना बाहेर काढले. त्या सर्व मुली त्या आडदांड माणसाबरोबर बाहेर उभ्या असलेल्या गाडीत जाऊन बसल्या. त्यात संध्या व समिधा सुद्धा होत्या. त्या एकटक माझ्याकडे बघत होत्या. त्यांची ती केविलवाणी नजर बघून वाटले की धावत जाऊन दोघींना अडवावे आणि कुशीत घेऊन घट्ट मिठी मारावी. मी चार पावले धावत गेलेसुद्धा परंतु तेवढ्यात तो आडदांड माणूस समोर आला. त्याच्या भीतीने संध्या व समिधा घाबरून चूप बसल्या होत्या. परंतु त्यांच्या डोळ्याने त्या मला खूप काही सांगत होत्या. गीता आणि तिच्या मुलींसाठी मी काहीच करू शकले नाही या गोष्टीची मनाला खंत वाटत होती. गाडी निघून गेली होती. मी जड पावलाने तिथून घरी जाण्यास निघाले. दिनेश सुद्धा कुठे गेला समजले नाही. आता त्याचा शोध कुठे घ्यायचा? या विचारातच घरी आले. मन शांत नव्हते. जीवनात घडलेल्या एक-एक घटनेने विचारांचे काहूर माजत होते.

दीपा कॉलेजमधून घरी आलेली होती. कानाला इयरफोन लाऊन गाणी ऐकत बसली होती. मला बघून तिने लगेच आवाज दिला ''आई, एवढा वेळ कुठे गेली होतीस? मला खूप भूक लागली आहे, लवकर जेवण दे.'' मी लगेच हात-पाय धुऊन दीपाला जेवायला वाढले. मला जेवायची इच्छाच नव्हती. संध्या आणि समिधा यांची झालेली दशा बघून त्या लहानपणीच्या निरागस मुली डोळ्यासमोर येत होत्या. त्यांची आई गेल्यावर बिचाऱ्या अनाथ होऊन उघड्यावर पडल्या. ''खरंच, आई हे असे दैवत आहे की तिन्ही लोकांचा स्वामी असूनही माणूस भिकारी बनतो. माझी सुद्धा काय गत झाली? दिनेशही आपल्या आईविना एकटा पडला. त्याचे भविष्यच भरकटले गेले. आईच्या मातृत्वाची सावली, मातृत्वाचे संगोपन, मातृत्वाचे प्रेम, मातृत्वाची ममता मग ती सरोगेट मातेची असो वा स्वतःच्या गर्भातून बाळाला जन्म दिलेल्या मातेची असो त्यांच्या भावनात अंतर पडत नाही.

▲▲▲

# प्रकरण २१

मी रामूला फोन केला आणि दिनेशविषयी चौकशी केली तेव्हा समजले की साहेबांनी त्याला घरात घेतले नाही. पोलिसांकडून त्याची कारस्थाने साहेबांना समजली होती. दिनेश आऊटलाईनला गेल्यापासून साहेब जरा नरम पडले होते. अधून मधून 'हाय बी.पी.' च्या त्रासाने हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागत होते. दिनेशची त्यांना काळजीही वाटत होती. त्याचबरोबर त्याची वागणूक बघून रागही येत होता. या मुलाचं काय होणार? या चिंतेतच ते व्यस्त राहू लागले होते. वंशाचा दिवा म्हणून दिनेशचे फार लाड पुरवले गेले होते. तेच लाड त्यांना महागात पडले होते. त्याची आई म्हणजे भारतीताई, अपघाती निधन झाल्याने दिनेश एकटा पडला होता. ना त्याला ममतेची सावली मिळाली ना प्रेम मिळाले. म्हणून त्याला कसलीही उणीव भासू नये या अर्थाने त्याचे सर्व लाड पुरवले गेले. मित्रांच्या संगतीने तो चुकीच्या मार्गाने जाऊ लागला. प्रसिद्ध गायकाचा मुलगा टपोरी बनल्याने घराण्याची गायकी संपुष्टात येत होती. दिनेशला लाईनवर कसे आणावे हेच त्यांना समजत नव्हते. या मंदिराचाच काटा मार्गातून काढून टाकायला हवा, म्हणजे दिनेश लाईनवर येईल असा विचार करून पबच्या शेठला फोन केला. ''तुमच्या पबमधील मंदिरा नावाच्या डान्सर मुलीला काढून दूरवरच्या पबमध्ये पाठवून द्या. त्याची मी कितीही किंमत द्यायला तयार आहे.''

''माफ करा साहेब, ही मुलगी आहे म्हणून माझे हॉटेल आहे आणि ही मंदिरा माझ्या हॉटेलची शान आहे. माझी एक नाही तर चार हॉटेलस् आहेत. ती चारी हॉटेलस् तिच्यामुळे चालतात. आमच्या हॉटेलचा ती सेक्स-बॉम्ब आहे. तुम्ही तुमच्या मुलाला सांभाळा.'' असे म्हणून पबच्या शेठने साहेबांना

निरुत्तर केले. दिनेशला घरातून काढून टाकल्याने साहेबही एकटे पडले होते. त्यांना त्यांच्या केलेल्या कर्माची जाणीव होऊ लागली होती. म्हणूनच दिनेश परत येईल या आशेवर त्यांनी दिनेशची आठ दिवस वाट बघितली. तो आला नाही तेव्हा त्याला फोन करून बोलवून घेतले. दिनेश घरी आला. परंतु तो कोणाशीही बोलत नव्हता. दोन टाईम खायचं-प्यायचं आणि बापाच्या पैशावर ऐश करायची हाच त्याच दिनक्रम होता.

दिपाचे कॉलेज पूर्ण होऊन गाण्याचे क्लासेस चालू होते. रोज सकाळी उठून रियाज चालू होता. दीपा एक जबाबदार मुलगी होती. तिचे आता एक स्वप्न होते. रियालिटी शोमध्ये गाण्याचा चान्स मिळविण्यासाठी मेहनत घेत होती. सदाभाऊ सुद्धा तिला उत्तम ट्रेनिंग मिळण्यासाठी संगितकारांकडे धडपड करत होते. त्याचवेळी एकाने धीरज वाडकर यांचे नाव सुचविले. सदाभाऊ समजून होते की दीपा त्यांचीच मुलगी आहे. दीपा एक स्त्री आहे म्हणूनच त्यांनी तिला दूर केले होते. तिला आपली मुलगी म्हणून स्वीकारायला तयार नव्हते. स्त्री म्हणजे धोका देणारी असते, हे त्यांच्या मनातून गेले नव्हते. म्हणूनच दीपाला त्यांच्याकडे पाठवायचे नव्हते. म्हणून ओळख काढून संगितकार अमनजी यांच्याकडे पाठवू लागले. तशी त्यांची फीही परवडण्यासारखी होती. त्यांच्याकडे दीपाने दोन-चार वर्षे ट्रेनिंग घेतले. त्यांच्यामुळे दीपाला गाण्याचे अनेक प्रोग्राम्स मिळू लागले. दीपा दिवसेंदिवस लोकप्रिय होऊ लागली. अमनजींच्या पाठिंब्यामुळेच दीपाला रियालिटी शो मध्ये चान्स मिळाला. दीपाला घ्यायला गाडी आली होती आणि दीपा निघूनही गेली. भारतीताईंना मी दिलेले वचन पूर्ण होण्यास आले. मी भारतीताई आणि साहेबांच्या फोटोकडे एकटक बघत होते. माझ्या जीवनाचा सारा इतिहास माझ्या डोळ्यासमोरून क्षणात सरकून गेला. मी अशी फोटोकडे बघत किती वेळ उभी राहिले माझे मलाच भान राहिले नाही. एवढ्यात सदाभाऊंनी मला हाक मारली ''अगं अनू, कसला एवढा विचार करतेस की फोटोकडे किती वेळ बघत असली आहेस.''

''भारतीताईंचे स्वप्न होते की दीपाला सुप्रसिद्ध गायिका बनवायचे. ते

मी पूर्ण करण्याच्या पहिल्या टप्प्यावर आले आहे. ज्यांनी दीपाला धुत्कारले त्यांना समजायला हवे की मुलगाच वंशाचा दिवा बनत नाही तर मुली सुद्धा वंशाची परंपरा चालू ठेवू शकतात. आजसुद्धा समाजात स्त्रीभ्रूण हत्या होत आहेत. मुलींचे गर्भ पाडून चोरी चोरी लपून छपून बेकायदा जमिनीत गाडले जात आहेत. या गर्भातूनच लता मंगेशकर, आशा भोसले अशा मान्यवर गायिकांसारख्या गायिका निर्माण होतील. अनेक पी.टी.उषा, कल्पना चावला, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्री फुले, निरजा यासारख्या कर्तबगार कर्तृत्वशाली स्त्रीया जन्म घेतील. परंतु मागासलेल्या विचारांनी भरलेल्या बुद्धीला कसे आणि कधी कळणार? मी लगेच भानावर येऊन तो फोटो पुन्हा बॅगेत ठेवला. हा फोटो दीपापासून लपवून ठेवला होता. तीचे खरे आई-बाबा कोण आहेत हे दीपापासून लपवून ठेवले होते. मीच तीची खरी आई आहे हेच तीच्या बुद्धीला पटले होते. मी सरोगेट आई असले तरी मी तिची आई आहे. तिला मी जन्मही दिला आणि तिचे संगोपनही मीच केले. हे मी विसरू शकत नाही परंतु योग्य वेळ आल्यावर मी दीपाला सर्व सांगेनच. आता माझे एकच लक्ष्य आहे ते म्हणजे दीपाला या रियालीटी शो मध्ये गाण्याचा चान्स मिळो. माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहात होते. माझी दोन जुळी मुलं एकमेकांच्या विरूद्ध टोकाला होती. माझ्या मुलाचे आयुष्य साहेबांच्या अहंकारात उद्ध्वस्त होत होते. दिनेश माझ्याकडे राहिला असता तर तो सुद्धा एक गायक बनला असता. आपल्या आई-वडिलांच्या गायकीचा वारसा चालत आला असता. परंतु साहेबांना प्रॉपर्टीला वारस हवा होता तो मिळाला. त्याच्यावर योग्य ते संस्कार घडविले नाही. मुलगा असो किंवा मुलगी असो त्यांची पात्रता त्यांच्या संस्कारानुसारच ठरत असते.

दीपाला मुंबईला जाऊन बरेच दिवस झाले. तिची फार आठवण येत होती म्हणून तिच्या फोटोचा अल्बम काढून बघू लागले. दीपाच्या बारशाचे फोटो-भारतीताईंचे फोटो-दिनेशचे फोटो बघून खूप बरं वाटत होतं. फोटो बघता बघता उषाताईंच्या अल्बमची आठवण झाली. त्यांचाही अल्बम उघडला आणि एक एक फोटो उलटत गेले. उषाताईंना बघून आश्चर्य वाटले.

त्या तरुणपणी किती सुंदर दिसत होत्या इतक्या की ओळखायला सुद्धा येत नव्हत्या. म्हणूनच साहेब त्यांच्यावर फिदा झाले होते. परंतु ताईंचे मिस्टर गाडीच्या अपघातात लग्नाच्या एक महिन्यातच निधन पावले. उषाताई एकट्या पडल्या. तेव्हा त्या सर्वांपासून वेगळ्या झाल्या आणि आपला स्वतंत्र बंगला घेऊन राहू लागल्या. तेव्हा त्यांनी राजची म्हणजे धीरज वाडकर यांच्याशी भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने त्यांची भेट होऊ शकली नाही. त्या वेळी उषाताईंना हिम्मत देणाऱ्या भारतीताईच एखाद्या बहिणीप्रमाणे पाठीशी उभ्या होत्या. म्हणूनच भारतीताईंच्या लग्नात उषाताईंनीच पुढाकार घेतला होता. भारतीताईंचे यजमान राजला बघून उषाताई हादरल्याच तरी त्यांनी स्वत:ला सावरलं. त्यांनी कधीच दाखवले नाही की मी राजवर प्रेम करते. लग्नानंतर त्या कधीच राजसमोर आल्या नाहीत किंवा राजही त्यांच्यासमोर आले नाही. या सर्व गोष्टी मला त्यांच्या खाजगी डायरीतून समजल्या. ते ताईंच्या समोर आले ते त्यांच्या अंत्यविधीसमयी. त्यावेळी त्यांच्या डोळ्यांत पाणीसुद्धा आले होते. तेवढ्यात दारावरच्या बेलने मी गोड आठवणीतून जागी झाले. 'सदाभाऊ आश्रमातून आले वाटतं?' असे म्हणत मी दरवाजा उघडला. सदाभाऊ आत आले आणि आरामखुर्चीत बसले.

''अनू, नाशिकवरून मुंबईला जाऊन दीपाला भेटून आलो. दीपाचे सिलेक्शन झाले ही मोठी आनंदाची बातमी तुला सांगायला मी अगदी आतूर झालो होतो. किती वेळ फोन करत होतो तर फोनही लागत नव्हता.''

''चला तर आता बघू आमची दीपा कितपत टिकते?'' मी म्हणाले.

''अगं, ती फर्स्ट येईल. ती कोणाची मुलगी आहे, हे तू विसरतेस. सुप्रसिद्ध गायक-गायिका श्री/श्रीमती वाडकर यांची मुलगी आहे. आपल्या आई-वडिलांच्या वळणावर गेली आहे.'' सदाभाऊ आपली छाती फुलवून अभिमानाने बोलत होते. सदाभाऊ दीपासाठी खूप मेहनत घेत होते. तिला वोटस् मिळण्यासाठी जाहिराती, प्रचार चालू होते. त्यांच्या वयाच्या मानाने ते खूपच मेहनत करत होते. मी मार्केटला गेले तरी सर्वांच्या नजरा दीपा वाडकरच्या आई म्हणून मला न्याहळत असत. दीपामुळे लोकांचा आमच्या

प्रती सन्मान वाढत होता. तर दुसरीकडे दिनेशमुळे आपली मान खाली घालावी लागत होती.

▲▲▲

# प्रकरण २२

दिनेश आता सुधारण्याच्या मार्गावर नव्हता. एक दिवस त्याने घरातील आपल्या आईचेच दागिने चोरून विकले आणि आलेल्या पैशातून मंदिराला सोडविले. दोघांनी पळून जाऊन लग्नही केले. मंदिराला आपल्या घरी आणले. आपल्या बाबांच्या पाया पडला. मनात नसतानाही साहेबांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्यांना हे लग्न बिलकूल पसंत नव्हते. निदान त्याच्या मनासारखे झाल्याने दिनेश सुधारेल या विचाराने साहेब काहीच बोलले नाही. परंतु त्यांना एक भीती होती की ते कितीही पैसे देण्याची तयारी दाखवूनही हॉटेलच्या शेठने मंदिराला दूर केले नाही. परंतु दिनेशने पैसे देऊन मंदिराला सोडवले. यामध्ये दिनेशच्या जिवाला धोका आहे हे ते समजून होते. लग्नानंतर दिनेश हळू हळू कामकाज करू लागला. त्याच्या वागण्यात खूप फरक पडला. एक दिवस मी सुद्धा त्या दोघांना जेवायला बोलावले. मलाही मंदिराला बघण्याची उत्सुकता होती. दिनेशला कोणीही सुधारू शकले नाही परंतु मंदिरा आल्यापासून दिनेशच्या वागण्यात बराच बदलाव आला होता. मी मंदिरासाठी एक शालू आणि दिनेशसाठी सूट खरेदी केला. ते जेवायला येणार त्या दिवशी दिनेशच्या आवडीचे जेवण बनविले. सदाभाऊ नाराज होते. एक पबमधील मुलीबरोबर लग्न केले हे त्यांना सुद्धा आवडले नव्हते. साहेबांची आणि भारतीताईंची इज्जत पार धुळीला मिळविली म्हणून दिनेशला घरी जेवायला बोलावले हे त्यांना आवडले नव्हते. परंतु मी त्याची आई त्याला दूर कसे करणार? असे समजून ते काहीच बोलत नव्हते. आम्ही दोघंही दिनेश आणि मंदिराची वाट पाहात होतो. जेवणाची वेळ निघून गेली तरी त्या दोघांचा पत्ता नव्हता. त्यांचा काही फोनही आला नाही किंवा त्यांचा फोनही लागत नव्हता. म्हणून मी रामूला

फोन लावला. ''रामू, दिनेश कुठे आहे?'' तेव्हा रामू धाप लागल्या आवाजात बोलत होता की ''ताई, तुम्ही गुरुदेव हॉस्पिटलमध्ये लवकर निघून या. दिनेशला कोणीतरी खूप मारले आहे आणि मंदिरा बेपत्ता झाली आहे.''

''हो, हो, मी येतेच. शेवटी व्हायचं तेच झालं.'' मी लगेच सदाभाऊंना घेऊन रिक्षाने हॉस्पिटलला गेले. बघते तर दिनेशच्या संपूर्ण अंगाला मार लागला होता. डोक्याला बँडेज बांधलेले होते. खूप रक्त गेल्याने काही सांगता येत नाही असे डॉक़्टरांनी सांगून टाकले होते. साहेब दिनेशच्या डोक्याशी खाली मान घालून बसले होते. मला बघताच त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. कदाचित यावेळी त्यांना भारतीताईंची आठवण आली असावी. रामू आणि गणुकाका सुद्धा त्यांना धीर देण्याचा प्रयत्न करत होते. परंतु काही वेळाने दिनेशच्या नाकातून रक्त वाहू लागले. लगेच डॉक्टर व नर्स धावून आले. परंतु जे व्हायचे तेच झाले. मंदिरा-मंदिरा बोलून दिनेशने मान टाकली. ते बघताच मला राहवले नाही. ''दिनेशऽऽऽ'' म्हणून मी हंबरडाच फोडला. त्याला मिठी मारून ओक्साबोक्सी रडू लागले. सदाभाऊंनी मला सावरून बाजूला केले. दिनेशचा वियोग मी सहन करू शकत नव्हते.

दिनेशच्या कार्याला मी व सदाभाऊ गेलो होतो. बाहेर गाड्यांची लाईन लागली होती. बाहेरचा हॉल फिल्म इंडस्ट्रीजनेच भरला होता. मोठमोठे गायक-गायिका, संगितकार, दिग्दर्शक वगैरे लोकं आली होती. शांतिपाठ चालू होता. मी व सदाभाऊ त्या बैठकीमध्ये जाऊन बसलो. दिवसकार्याचे विधी संपल्यावर सर्वांची जेवणं झाली. जाताना सर्वजण साहेबांना हात मिळवून सांत्वन करत होते. हळूहळू गर्दी ओसरू लागली. दिनेशच्या फोटोसमोर साहेब शांतपणे बसून राहिले तसे मी व सदाभाऊ आम्ही दोघंही त्यांच्या बाजूला जाऊन बसलो. सदाभाऊंनी हलकेच आपला हात साहेबांच्या खांद्यावर ठेवून त्यांना धीर दिला. दिनेशच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी आम्ही प्रार्थना केली आणि घरी येण्यास निघालो. रामूला साहेबांची काळजी घेण्यास सांगितले आणि बाहेर पडणार तोच माझी नजर टेबलवर ठेवलेल्या फोटोकडे गेली. मला तर तो फोटो बघून आश्चर्यच वाटले. तो फोटो दिनेश

आणि मंदिराचा लग्नाचा फोटो होता. ती मंदिरा दुसरी तिसरी कोणी नसून ती गीताची मुलगी समिधा होती. जिला मी तुरुंगात असताना बघितले होते. या गोष्टीवर माझा विश्वासच बसत नव्हता. म्हणजे शेवंताबाईच्या माणसांनीच दिनेशला मारले असावे आणि मंदिराला पळवून घेऊन गेले असावे. मंदिराच्या प्रेमात पडून दिनेशने स्वत:नेच स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारुन घेतली होती. यामध्ये पबच्या लोकांनी दिनेशचा जीवही घेतला आणि पैसेही लुटले. परंतु जे झाले ते फार वाईट झाले. आता ही लोकं मंदिराला सुद्धा काय करतील सांगता येत नाही.

दिनेशला जाऊन महिना झाला. साहेब अगदी एकटे पडले होते म्हणून दिवसभर गाण्याच्या रेकॉर्डिंगसाठी ते दिवसभर बाहेरच राहू लागले होते. दिनेशच्या आठवणीने ते नेहमी अस्वस्थ असायचे. दिनेशच्या निधनामुळे मला दीपाला भेटता आले नव्हते. सदाभाऊच तिचे सर्व सांभाळत होते. त्यांना मात्र आठवणीने माझी विचारपूस करत असे. ''आई का येत नाही?'' असे सारखे सारखे विचारत असे. दीपा प्रत्येक एपिसोड मध्ये वन्समोऽर मिळवत होती. टॉप फायमधून टॉप वन ला येण्याची तिची खूप धडपड चालू होती. ''माझ्या फायनलच्यावेळी मात्र आईला घेऊन या'' असे वारंवार आपल्या काकांना विनवीत असे. साहेबांनी सुद्धा दीपाचे कौतुक करावे, तिला जवळ घ्यावे असे मला नेहमी वाटत असे. परंतु दीपाचे नाव त्यांच्यापुढे काढायला भीती वाटत असे. दीपा दिवस रात्र एक करून मेहनत घेत होती. त्यामुळे सेमी फायनलच्या वेळी तिची तब्येत थोडी खराब होती. त्यामुळे फार चिंता वाटत होती. म्हणून सेमी फायनलच्या वेळी मी मुद्दाम समोरच बसले. मला बघून दीपा खुशीत होती तरीपण तिचा आवाज बसल्याने तिला गाताना त्रास होत होता. म्हणून पाच नंबरमधून ती चौथी आली होती. त्यामुळे ती नाराज झाली. कार्यक्रम संपल्यावर ती माझ्या कुशीत शिरून रडू लागली. परंतु सर्वांनी तिची समजूत घालून तिला शांत केले. मी सुद्धा तिला समजावून 'ग्रँड फिनालेमध्ये तू फर्स्ट येणारच दीपा. अशी हिम्मत हरवून बसू नकोस. आता हस बघू' असे म्हणून दीपाची समजूत काढली.

पंधरा दिवसांनी ग्रँड फिनाले होती. सर्व मुलांची जोरात प्रॅक्टिस चालू होती. प्रत्येकाला आपलं स्वप्न साकार करण्याची संधी मिळाली होती. प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न करण्यासाठी दिवस-रात्र एक केले होते. जोरदार प्रचारही चालू होता. हा...हा म्हणता ग्रँड फिनालेचा दिवस उजाडला. प्रोग्रामला प्रमुख पाहुणे धीरज वाडकर यांचे नाव ऐकताच मला खूप आनंद झाला. दीपा आपल्या प्रसिद्ध गायक धीरज वाडकर यांच्या हस्ते पारितोषिक घेणार नव्हती तर तिच्या स्वत:च्या वडिलांकडून सन्मानीत होणार होती. प्रोग्राम वेळेवर चालू झाला होता. दोन अडीच तास गाणी-नृत्य यांची मैफील रंगली होती. सगळ्यांचे लक्ष निकालावर होते. संचालकांच्या हातात निकाल होता. त्याने निकाल ताणून धरला होता. सर्वांचे परफॉर्मन्स झाल्यावर चारी स्पर्धकांना रंगमंचावर बोलवण्यात आले. प्रथम चौथ्या क्रमांकावरचे नाव घेतले गेले. नंतर तिसरा, दुसरा क्रमांक शेवटी माझी दीपा राहिली. त्याबरोबर सर्वांच्या टाळ्या वाजू लागल्या. पुष्पवृष्टी होऊ लागली. चारी स्पर्धकांना उचलून सन्मानित केलं. त्याचबरोबर धीरज वाडकर यांच्या हस्ते विजेत्यांना चेक्स् व ट्रॉफी देण्यात आली. ज्यावेळी दीपा वाडकर नाव घेतलं गेलं तेव्हा दीपा साहेबांसमोर जाऊन ट्राफी व चेक आणि होंडा गाडीची चावी घेण्यास गेली तेव्हा साहेबांनी तिला पूर्ण नाव विचारले. तितक्यात मी सुद्धा स्टेजवर गेले. आणि ही तुमची मुलगी दीपिका धीरज वाडकर असे म्हणून मी दीपाला आपल्या वडिलांची ओळख करून दिली. साहेबांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. त्यांनी आनंदाने दीपाला जवळ घेतले. त्या बाप-बेटीचे मीलन बघून माझेही डोळे भरून आले. त्याचवेळी मला दीपाविषयी दोन शब्द बोलण्याची संधी मिळाली. या सोनेरी क्षणाचीच मी एवढी वर्षे वाट पाहात होते. मी सर्वांसमोर अभिमानाने सांगितले की दीपिका वाडकर म्हणजे आजचे आपले प्रमुख पाहुणे धीरज वाडकर यांची ही मुलगी आहे. हिच्या यशाचा पूर्ण वाटा तिचे काका सदाशिव आपटे यांना जातो. त्यांच्या परिश्रमाने दीपाला हे यश प्राप्त झाले आहे. आज वीस वर्षे दीपा माझ्याकडे होती. मी तिची सरोगेट आई आहे. तिचा मी सांभाळ केला. सुप्रसिद्ध गायिका भारतीताई आज या

दुनियेत नाहीत. त्याच दीपाची खरी आई आहेत. त्यांना दिलेल्या वचनाप्रमाणे मी दीपाला गायत्रीचा बहुमान मिळवून दिला... आज वीस वर्षांची अमानत म्हणजे दीपाला मी धीरजजींच्या हातात सोपविते. दीपाने माझे नाव उज्ज्वल केले या विचाराने त्यांनी दीपाला पुन्हा जवळ घेऊन आशीर्वाद दिला.

▲▲▲

# प्रकरण २३

कार्यक्रम संपल्यावर साहेबांनी गाडी गेटवरच उभी केली होती. ती गाडी दीपाला पारितोषिकामध्ये मिळालेली होती. साहेबांनी आपली गाडी त्यांच्या ड्रायव्हर बरोबर पाठवून दिली आणि आपण स्वत: दीपाच्या हातात चावी देऊन गाडीचा दरवाजा उघडायला सांगितले. गाडीत पहिले पाऊल दीपाला ठेवायला सांगितले. गाडीच्या चारी बाजूने मिडियावाले, फोटोग्राफर यांनी वेढा घातला होता. वातावरण अगदी दुमदुमुन गेले होते. साहेबांच्या चेहेऱ्यावरही खूप आनंद दिसत होता. मिडियावाले दीपाची गाडी थांबवून मुलाखत घेत होते. मी व सदाभाऊ पाठीमागे बसलो होतो. दीपाबरोबर आमचेही फोटोवर फोटो काढत होते. त्यांच्यातून कसेबसे वाट काढत साहेबांनी गाडी रस्त्याला वळविली. जसे घर जवळ येऊ लागले तसे फटाक्यांचे आवाज घुमू लागले. गाडी त्यांच्या बंगल्याकडे वळत होती हे बघून मला आश्चर्य वाटले. ''साहेब, गाडी आमच्या बंगल्याकडे घ्या...'' मी म्हणाले. ''नाही..., आता आपण सर्व आमच्या बंगल्यातच राहणार...'' साहेब आनंदाने बोलत होते. साहेबांनी आता दीपाला मनापासून स्वीकारले होते. गाडी बंगल्यावर येताच दीपा खाली उतरली. पुन्हा दीपाला मिडियावाल्यांनी घेराव घातला. काही जणांनी दीपाच्या गळ्यात फुलांचे हार घातले. दारातच रामू आरतीचे ताट घेऊन उभा होता. साहेबांनी माझ्याकडे इशारा करून दीपाला ओवाळण्याचा सन्मान दिला. ''आजपासून या घराची, माझ्या दीपाची जबाबदारी तुझ्यावर सोपवत आहे. माझ्या मनात बसलेली स्त्रीविषयीची घृणेने माझ्या दिनेशच्या बाबतीत मी जी चूक केली ती चूक पुन्हा होऊ नये. माझा दिनेश माझ्यामुळेच चुकीच्या मार्गाला गेला. त्याला जर तुझ्याकडे दिले असते तर आज दीपाप्रमाणे तोही एक गायक बनला असता...'' असे सांगून साहेबांनी डोळ्यात आलेले पाणी

पुसले. मलाही भारतीताईंची आज खूप आठवण येऊ लागली. मी दीपाला ओवाळून, नारळ फोडून तिला घरात घेतले. दीपाला भारतीताईंच्या फोटोसमोर नमस्कार करायला सांगून, 'ही तुझी खरी आई आहे' हे सांगून सत्य समोर उघड केले. नंतर तिने आपले बाबा आणि सदाभाऊ काकांना नमस्कार केला. दीपा क्षणभर गोंधळून गेली होती. हे बघून साहेबांनी तिला जवळ घेतले आणि म्हणाले, ''दीपा, अशी गोंधळून जाऊ नकोस... परंतु हे सत्य याआधी तुला सांगितले असते तर ते तू समजू शकली नसती. आता तुला समज आली आहे. या तुझ्या बापाला तू समजून क्षमा करू शकतेस... मी तुझ्यासाठी काहीच केले नाही. जे काही केले ते या तुझ्या अनुआईने केले. मुलगी म्हणून तिरस्काराने मी तुला माझ्यापासून दूर ठेवले... तर दिनेशला जवळ केले. शेवटी परिणाम काय झाला?... तुझा जुळा भाऊ हा दिनेश मला, आपल्याला कायमचा सोडून गेला. त्याला सुद्धा मीच कारणीभूत आहे. मला आज समजले की मुलगा आणि मुलीमध्ये फरक नाही तर त्यांना दिल्या जाणाऱ्या संस्कारांमध्ये फरक आहे...'' दीपाचेही डोळे पाण्याने भरून आले. तरीसुद्धा तिला मिळालेले घवघवीत यश आणि तिला तिचे मिळालेले हक्काचे बाबा यामुळे तिचा आनंद द्विगुणित झाला होता.

मी दुपारचे गोड जेवण केले. जेवण झाल्यावर सदाभाऊ जाण्यास निघाले. ''काका, तुम्ही कोठे चाललात? तुम्हीसुद्धा आमच्याबरोबर राहायचे...'' दीपा सदाभाऊंना अडवत म्हणाली. ''नाही बेटा, मला जायलाच हवे... आमचा बंगला कोण बघणार? आमचा आश्रम कोण बघणार? दीपा नाराज होऊ नकोस... तू कधीही तिकडे सुद्धा येऊ शकतेस. अनू आणि तुला सहारा मिळाला. आता माझी चिंता मिटली. सुखी रहा बेटा...'' असे म्हणून सदाभाऊ निघून गेले.

मला सर्वकाही मिळाले परंतु एका गोष्टीचीच मनाला खंत वाटत राहिली. गीतासाठी मी काहीही करू शकले नाही. तिच्या मुलींना मी आधार देऊ शकले नाही. त्या एजंटने दोघींना वेश्याबाजारात विकून त्यांचे जीवन उद्ध्वस्त केले. गीताचा आत्मा तडफडत असेल. मी स्वत:ला कधीच माफ

करू शकणार नाही. गीताने आपले गर्भाशय भाड्याने देऊन दुसऱ्याची कूस उजवली. परंतु तिच्या स्वतःच्या मुलींना दत्तक म्हणून घ्यायला कोणीही पुढे आले नाही... कां... तर त्या मुली आहेत. आपल्या कुळाला वंशाचा दिवा हवा, यासारख्या कमकुवत विचाराने कित्येक जण सरोगसी करून झालेल्या मुलीही अव्हेरतात. बाळामध्ये काही व्यंग निघाले तरी ते त्या बाळाचा स्वीकार करत नाहीत. अशावेळी ती सरोगेट आई काय करणार?... तिची ही एक मोठी शोकांतिका आहे. तिच्या मातृत्वाच्या भावनांची कदर होत नाही. तो एक निव्वळ व्यवहार होतो. सरोगसी या प्रक्रियेत बीजाचं फलनीकरण करताना जुळं किंवा तिळं बाळ जन्माला येण्याची शक्यता सर्वाधिक असते. दोन वा तीन बाळांचा जन्म झालाच तर त्या सरोगेट आईला पैसे मात्र एकाच बाळाच्या प्रसूतीचे मिळतात. तिचा वापर झाला की तिला पैसे देऊन फेकून देण्यासाठी ही बाजारपेठ तयार आहेच. माणूस म्हणून तिच्या शरीर, मन, कुटूंब, आर्थिक, भावनिक, मानसिक गरजांचा विचार कोण करणार?... शिक्षण, आत्मभान नसलेल्या कुटुंबातून आलेल्या या महिलांना पैसा संपल्यानंतर हे मूल वाढवल्याबद्दल या बाईच्याच कुटुंबाकडूनही तिचं अनेकदा मानसिक शोषण केलं जातं... आर्थिक चणचण असलेल्या या महिला परिस्थितीनं खंगलेल्या असतात. स्वतःची तीन-चार मुलं पदरात असतात. डॉक्टरांच्या पर्यंत नेणारा दलाल मधल्यामधे टक्केवारी वाढवून तिला मिळालेल्या पैशातील हिस्सा घेतो. प्रसूती झाल्यावर हाती आलेले पैसे शरीरावर उमटलेले साईड इफेक्टस् बरे करण्यात जातात. वजन वाढतं, मासिक पाळीचे दिवस चुकतात, रक्तस्राव होतो, हातापायांतून मुंग्या येतात. थायरॉईडसारख्या व्याधी मागे लागतात. मानसिक स्वास्थ्य बिघडते. अशाप्रकारे शारीरिक-मानसिक तक्रारींच्या फेऱ्यांस सरोगेट आई अडकते. तेव्हा तिच्याकडे पाहायला ना डॉक्टर असतात ना हाती पैसा उरतो... काही महिन्यांच्या अंतराने पुन्हा नव्याने सरोगसी करून घेण्यासाठी ती बाई तयार होते...

▲ ▲ ▲

# प्रकरण २४

दिनेशला जाऊन एक वर्ष झाले. वर्षश्राद्धाच्या दुसऱ्या दिवशीच कम्पाऊंडच्या गेटवर वॉचमनला एक लहान बाळ रडत असताना दिसले. वॉचमनने ते बाळ आत आणून माझ्याकडे दिले. हे कोणाचे बाळ असावे असा विचार करून ही गोष्ट साहेबांच्या कानावर घातली. साहेबांनी बघितले तर त्याच्या दुपट्यात एक चिठ्ठी होती. ती चिठ्ठी साहेबांनी वाचून माझ्याकडे दिली. ती चिठ्ठी मी वाचू लागले....

पप्पा नमस्कार...

मी समिधा अर्थात मंदिरा, तुमची दुर्दैवी सून... तसं पाहिलं तर मला तुमची सून म्हणवून घेण्याचा अधिकार नाही. हे बाळ माझं आणि दिनेशचं आहे. ही आमची प्रेमाची निशाणी आहे तर तुमचा मुलगा दिनेशची शेवटची आठवण आहे. कालच दिनेशला जाऊन एक वर्ष झाले. त्यालाही जबाबदार मी आहे... तरी या दिनेशच्या अंकुराला तुमचा दिनेश समजून त्याचा स्वीकार करा... या बाळात तुमच्या दिनेशचे रक्त आहे. हे बाळ तुमच्या वंशाचा दीपक आहे... ही दिनेशची अमानत आहे... तिला वाऱ्यावर सोडू नका. या बाळाला प्रेम द्या... संस्कार द्या... माझा राग या बाळावर काढू नका... मी एक पबमध्ये गाणारी, नाचणारी मंदिरा असले तरी मी एक समिधा होते. मातृत्वाची सावली गेल्यावर जबरदस्तीने मला समिधाची मंदिरा बनवलं गेलं. या बाळाला सुद्धा दूर करताना मला किती यातना होत असतील हे फक्त एक मातृत्वाची ममताच समजू शकते... हे बाळ जेव्हा तुमच्या हातात असेल तेव्हा मी व माझी छोटी बहीण संध्या दोघीही तुमच्यापासून खूप दूर गेलेल्या असतील... अशा जागी की आम्हाला कोणीच ओळखू शकणार नाही.

एक दुर्दैवी आई (सून)
समिधा

ती चिठ्ठी वाचून माझे डोळे भरून आले. गीताच्या मुलींची गत बघून गीताचा आत्मा किती तडफडत असेल?... या कल्पनेने मला रडू आवरत नसव्हते. परंतु साहेबांच्या पुढे मी कोणताच निर्णय घेऊ शकत नव्हते. साहेब काय करतात हे मी बघत राहिले. त्या बाळाला त्यांनी हलकेच माझ्या हातात दिले आणि त्यांचाच दिनेश आहे असे समजून त्याला गोंजारले. हे बघून मला समाधान वाटले. एक दिनेश गेला पण त्याचाच असलेला अंशने दुसरा दिनेश बनून या घरात प्रवेश केला. साहेबांनी दिनेशच्या फोटोकडे बघून स्मितहास्य केले आणि म्हणाले की, ''माझ्या दिनेशने पुनर्जन्म घेऊन पुन्हा तो माझ्याजवळ आला आहे... अनू, आधी मी जी चूक केली ती चूक पुन्हा होऊ नये म्हणून सांगतो की या दिनेशला तुझ्या मातृत्वाच्या छायेत वाढव... त्याला प्रेम दे, संस्कार घडव आणि आमच्या दीपाप्रमाणे एक गायक बनव...'' साहेबांचे हे शब्द ऐकून त्यांच्या चेहेऱ्यावर पश्चात्तापाची रेखा दिसत होती. मीसुद्धा माझा दिनेश समजून बाळाला जवळ घेतले आणि मातृत्वाच्या ममतापूर्ण स्पर्शाने बाळाच्या मस्तकाचे चुंबन घेतले. दिनेशच्या येण्याने घरातले वातावरण बदलून गेले. हळूहळू साहेबही आमला मुलगा गेल्याचे दु:ख विसरू लागले. रेकॉर्डींग करून लवकर घरी येत असत आणि दिनेशबरोबर खेळत असत. मी गीतासाठी काही करू शकले नाही किंवा तिच्या मुलींसाठी सुद्धा काही केले नाही. निदान समिधाच्या मुलासाठीतरी मी करायला हवे. कसंही करून माझ्या दिनेशचाच मुलगा आहे म्हणजे माझा नातू आहे. म्हणजे मी आजी झाले... या कल्पनेने माझे मलाच हसू आले.

दीपाला आता आपल्या बाबांचा सहयोग मिळत होता. रोज सकाळी दीपाचा रियाज ते करून घेत होते. शिवाय त्यांच्या ओळखीने दीपाला गाण्याच्या ऑफर्स येत होत्या. हळू हळू दीपासुद्धा आपल्या बाबांबरोबर गाण्याचे प्रोग्रॅम करून प्रसिद्धी मिळवत होती. पिक्चर्सच्या गाण्यांतील कोरसमध्ये तिला चान्स मिळू लागला. या पाऊलवाटेवर चालत चालत दीपा पुढे पुढे जात होती.

▲ ▲ ▲

# प्रकरण २५

दिनेश हळू हळू मोठा होत होता. त्याबरोबर त्याची गाण्यातील ओढ स्पष्ट होत होती. दीपा जशी सकाळी लवकर उठून रियाज करत असे तसे दिनेश झोपेतून खडबडून उठून दीपाच्या बाजूला जाऊन बसत असे. दीपा गायला लागली की चूपचाप बसून कान देऊन ऐकत असे. त्यावेळी साहेबांना त्याचे मोठे कौतुक वाटत असे. असेच दिवस जात होते. परंतु साहेबांची प्रकृती दिवसेंदिवस नाजूक होत चालली होती. आपले आता खरे नाही असे समजून त्यांनी आपल्या प्रॉपर्टीचे वसीयत पत्र तयार केले. त्याचवेळी मला व दीपाला जवळ बोलावून त्या विषयीच्या संदर्भात आम्हाला स्पष्टपणे वाचून दाखविले होते. त्याचवेळी दीपा रडू लागली होती. ''पप्पा, आम्हाला तुम्ही हवे आहात... तुम्ही लवकर बरे होणार... हे असलं काही बोलत जाऊ नका. असे म्हणून दीपा आपल्या पप्पांना बिलगली. साहेबांनीसुद्धा तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला. त्यांच्या मुलांची मी सरोगसी आई असूनही त्यांनी मला दूर केले नव्हते. यातच मला समाधान वाटत होते. साहेब आता बाहेर कुठेच जात नव्हते. घरातच झोपून असायचे. अचानक एक दिवस त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांच्या त्यांच्या डाव्याबाजूला मुंग्या आल्यासारखे वाटू लागले. डॉक्टरांना बोलावले. त्यांनी हॉस्पिटलमध्ये भरती करायला सांगितले. रामू आणि गणुकाकांच्या साहाय्याने साहेबांना हॉस्पिटलमध्ये भरती केले. साहेबांना पॅरालिसीसचा सौम्य झटका आलेला होता. काही दिवस त्यांना हॉस्पिटलमध्येच ठेवणं गरजेचं होतं. शेवटी त्यांच्या तोंडून हेच शब्द निघत होते की. ''मी जे पाप केले आहे त्याची शिक्षा मला भोगावी लागत आहे अनू... मला क्षमा कर.'' त्यावर मी काहीच बोलू शकत

नव्हते. पंधरा दिवसांनी त्यांना घरी आणले. साहेबांचे सर्व बेडवरच होते. रामू, गणुकाका आणि मी त्यांची सेवा करत होते. ते किती दिवस काढतील याविषयी शंकाच वाटत होती. त्यांचे आपल्या नातवावर खूप प्रेम होते कारण त्याने आपल्या वडिलांचे चेहेरा घेतला होता, म्हणून आपला दिनेश समजूनच त्याला जवळ घेत असत. ते मला अडखळत अडखळत बोलून सांगायचे, ''अनू, आता तुलाच हे घर सांभाळायचे आहे. दीपा आणि दिनेशची जबाबदारी तुझ्यावर सोपवतो. माझा नातू माझ्या दिनेशप्रमाणे व्हायला नको. त्याच्यावर लक्ष ठेव... आता तूच त्याची आई आहेस आणि बाबा सुद्धा तूच आहेत. मातृत्व अशी भावना आहे की आपल्या जीवनाला सावली देणारं एक छप्पर आहे. जेव्हा ते उडून जातं ना तेव्हा परिस्थितीच्या ऊन, वारा, पाऊस यांपासून आपलं संरक्षण करण्यास कठीण जातं... आपण निराधार होऊन जातो. वादळी वाऱ्याने आपण अयोग्य दिशेला फरफटत खेचले जातो... आपलं पाऊल सरळ आहे की वाकडं आहे हे सांगायला त्यावेळी आईशिवाय आपल्या जवळचं कोणी कोणी नसतं... परिस्थितीरूपी उन्हाचे चटके सोसत सोसत मनुष्य वाटचाल करत असतो. चालता चालता अनेक खाचखळगे येतात त्यांना पार करणं कठीण होतं. त्यावेळी सावरायला कोण असतं? असते ती फक्त आई... तिची ममता... तिचे वात्सल्य... तिचे प्रेम... स्नेह. त्या आधारे ती आपला ढळणारा तोल सावरते. एक दिशा दाखवते... मानसिक बळ देते. माझ्या दिनेशचे काय झाले? माझ्या अहंकाराने मी दिनेशला तुझ्या मातृत्वापासून दूर ठेवले... या माझ्या चुकीनेच त्याचे जीवन कुस्करून गेले. परंतु या माझ्या स्वभावाला उषा कारणीभूत होती. तिने मला धोका दिला नसता तर मी स्त्री जातीचा तिरस्कार केला नसता... उषावर मी खूप प्रेम करत होतो. आम्ही पळून जाऊन लग्न करणार होतो. परंतु तिने मला साथ न देता दुसऱ्याशी लग्न केले. तेव्हापासून मला स्त्री जातीचा तिरस्कार निर्माण झाला. मी प्रत्येक स्त्रीची घृणा करू लागलो. मग ती मुलगी असो वा बायको असो... माझ्या मनातून स्त्री पार उतरून गेली...'' त्यांचे हे बोलणे ऐकून मला राहावले नाही. त्यांचे समाधान करण्यासाठी मी उषाताईंची सत्य परिस्थिती त्यांना

सांगितली. ते ऐकून साहेबांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. त्या अश्रुंबरोबर त्यांच्या मनात घर करून बसलेला तिरस्कार धुवून जात होता. दोषी उषा नसून स्वत: आपण आहोत हे कळल्यावर साहेब म्हणाले की, ''आता मला लवकरच उषाकडे जाऊन क्षमा मागायला हवी. या जन्मी नाही तर निदान पुढच्या जन्मी तरी उषा माझी होईल. ती जरूर माझा स्वीकार करेल...'' एवढं सगळं बोलून त्यांना दम लागला होता. परंतु त्यांचे मन हलके झाल्यासारखे वाटत होते. ती प्रसन्नता त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत होती. मी त्यांना औषध पाजले. त्या औषधाच्या ग्लानीत त्यांना झोपही लागली. परंतु प्रथमच त्यांच्या चेहेऱ्यावरचे नैराश्याचे भाव विरून गेलेले दिसत होते.

गाडीच्या हॉर्नचा आवाज आला. 'दीपा रेकॉर्डिंग करून आली वाटतं?...' असं म्हणून मी बाहेर डोकावले तर दीपा आणि तिच्याबरोबर कोणी एक मुलगा दिसत होता. मी बघतच राहिले. तेवढ्यात दीपा म्हणाली, ''आई हे मिस्टर सुमित, म्युझिक डायरेक्टर आहेत.'' असे म्हणून दीपाने सुमितला बसायला सांगितले. तेवढ्यात दिनेश हॉलमध्ये आला आणि सुमितबरोबर खेळू लागला. ''काका, मी तुम्हाला गाणं म्हणून दाखवू कां?''

''हो, हो, म्हण नां...''

दिनेश गाऊ लागला. गाणं संपल्यावर सुमितने दिनेशचे खूप कौतुक केले आणि विचारले, ''तुला कोणी शिकवले? दीपाने की दादाजींनी?''

''माझ्या दीपा आत्याने शिकवले... माझे दादाजी सुद्धा मला शिकवायचे पण आता ते आजारी आहेत नां...'' असे म्हणून लगेच सुमितचा हात पकडून त्याला दादाजींच्या रूममध्ये घेऊन गेला. दादाजी झोपलेले होते. परंतु त्यांच्याविषयी दीपाने त्याला सर्व सांगितले. सुमित नाष्टा करून जाण्यास निघाला तेव्हा दीपाही त्याला सोडायला गेली. त्या दोघांना बघून मला वाटले की दोघांची जोडी किती छान दिसते... दीपा आल्यावर तिला विचारायला हवे... तेवढ्यात दीपा आली. तिची मी जरा मस्करीच केली. ''काय मग, काय विचार आहे?... सुमित मात्र छान आहे हं... तुला आवडतो कां गं?...'' तेव्हा दीपाने लाजून पदरात तोंड लपवले. तेव्हा मी समजून गेले. तसे

सुमितही आता वरचेवर येत जात होता. ही गोष्ट मी साहेबांच्या कानावर घातली. तेव्हा त्यांनाही खूप आनंद झाला. दोघं एकत्र फिरताना लोकांना उगाच चर्चेला विषय नको म्हणून मी त्यांचा साखरपुडा करण्याचे ठरविले.

▲▲▲

# प्रकरण २६

साहेबांना जाऊन पंधरा वर्ष कशी गेली समजलंच नाही. दिनेशही आता प्लेबॅक सिंगर झाला होता. अशाच एका नृत्य-संगीत कार्यक्रमासाठी त्याला पाहुणेकलाकार म्हणून निमंत्रित केले होते. त्यासाठीच तो इंग्लंडला गेला होता. दीपासुद्धा सुमित बरोबर आपल्या सासरी गेली होती. माझेही वय झाल्याने काम होईनासे झाले होते. जीवनाचा एवढा मोठा पल्ला खेचत खेचत कुठून कुठल्या टोकावर आले समजलेच नाही. खरंच जीवन म्हणजे एक कोडं आहे. ते कोडं सोडवता सोडवता मनुष्य त्यात किती गुरफटला जातो?... जेव्हा कोड्याच्या शेवटच्या टोकावर येतो तेव्हा तो पाठी वळून बघतो तेव्हा त्याला समजत नाही की आपण कुठे होतो?... एखाद्या भुलभुलैय्या खेळाप्रमाणे आपला पाठचा रस्ता विसरून जातो... माझेही तसेच झाले. आता मी शेवटच्या टोकावर आले. परंतु माझ्या जीवनाच्या एवढ्या गुंतागुंतीत सुरुवातीचे टोक सापडत नाही... मी कुठून आले याचे उत्तर सापडत नाही... आता घरात मी एकटी पडले. रामू सुद्धा वयोमानाने आजारी असतो. कधी काम करतो तर कधी करत नाही. गणुकाका तर एकदमच थकून गेले आहेत. तरी बिचारे येऊन हळू हळू का होईना झाडांची देखभाल करतात. झाडांना सकाळ-संध्याकाळ पाणी घालतात. दिनेश आता दोन दिवसाने येईल. तोपर्यंत हे घर खायला उठतं... मग काय? खाली दिमाग शैतानका घर अशी परिस्थिती होते. मनात समिधा आणि संध्याविषयी असंख्य विचार येतात. त्या आता कुठे असतील? पुन्हा त्या त्याच कुंटणखान्यात गेल्या तर नसतील? की आणि कुठे गेल्या असतील? समिधाला आपल्या मुलाची आठवण तर येत नसेल? ती सुद्धा जन्म दिलेल्या एका मुलाची आई आहे. तिलाही भावना

आहेत. आपल्या मुलाच्या आठवणीने बिचारी आतल्या आत झुरत असेल. तिला माहीतही नसेल की तिचा मुलगा दिनेश प्लेबॅक सिंगर बनला आहे. हे बघून तिला किती आनंदच होईल... माझी हीच इच्छा आहे की या आई-मुलाची भेट घडून यावी. मी सुद्धा आता किती वर्ष जगणार? दिनेशला बघायला आता कोण आहे? तसे त्याचे लग्नाचेही वय झाले नाही. तेवढ्यात फोनची बेल वाजली आणि त्या आवाजाने मी भानावर आले. हा दिनेशचा फोन असणार... असे म्हणून लगेच उठून मी फोन घेतला. ''हं दिनेश, बोल... नीट पोचलास नां?''

''हो हो मी सुखरूप पोचलो. दोन दिवसांत येतोच परत. तू सांभाळून राहा... काळजी करू नकोस...'' असे म्हणून त्याने फोन ठेवला.

हा नृत्य-संगीत कार्यक्रम म्हणजे मुंबईतील एका मोठ्या संगीत कला-निकेतनचा कार्यक्रम होता. त्यात नृत्य-गायनाचे कार्यक्रम खास भारतीयांसाठी होणार होते.  यामध्ये पुरस्कारही मिळणार होते. त्यासाठीच काही संगीतकारांना निमंत्रित केले होते. कार्यक्रम चालू होऊन तीन तास होऊन गेले. सगळ्यांचे चांगले परफॉर्मन्स झाले होते. त्यामुळे निकाल काढण्यात संगीतकारांना फार मुश्कील झाले. प्रथम तिसरा नंबर, नंतर दुसरा नंबर आणि शेवटी पहिला नंबरचे नाव घोषित करण्यात आले. या तिघांना पुरस्कार देण्यासाठी दिनेशला सुचित करण्यात आले. दिनेशने पहिले नाव समिधा दिनेश वाडकर म्हणून घोषित केले. सर्वश्रेष्ठ नर्तिका म्हणून समिधाला पुस्कार प्राप्त झाला होता. समिधा आनंदाने स्टेजवर आली. दिनेशने पुरस्कार समिधाच्या हातात देत हसत हसत अभिनंदन म्हणून हातात हात मिळवला. तेव्हा समिधा त्याच्याकडे एकटक पाहातच राहिली. तेच डोळे... तेच नाक.. तोच गोरा वर्ण. जणू काही तिचा दिनेशच समोर उभा आहे. दिनेशच्या आठवणीने समिधा चक्कर येऊन खाली पडणार होती. परंतु दिनेशने तिला सावरले आणि तोंडावर लगेच पाणी शिंपडून समिधाला शुद्धीवर आणले आणि एका बाजूला खुर्चीवर बसवले. आपल्या मुलाला बघण्यासाठी समिधाचा जीव तडफडत होता. तोच मुलगा समोर आल्यावर स्वत:ला सावरणे तिला अनावर झाले.

कार्यक्रम संपला तशी समिधा उठून लगेच दिनेशसमोर गेली. तिने त्याला ''आपले नाव काय?'' असे विचारले.

दिनेशने नाव सांगताच समिधाची खात्री झाली की हा माझाच मुलगा आहे. म्हणून तिने त्याच्याकडे व्हिजीटींग कार्ड मागितले. दिनेश लगेच खिशातून एक कार्ड काढून समिधाच्या हातात देत म्हणाला, ''आता तुमची तब्बेत कशी आहे? डान्स प्रॅक्टिस जास्त केली होती वाटतं? तुमचं नृत्य खूप छान झालं.''

फ्लाईट पकडण्यासाठी दिनेश लगेच निघाला. समिधा त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे एक टक बघतच राहिली. अगदी आपल्या बाबांची कॉपी आहे. काही फरक नाही. समिधाला आपल्या मुलामध्ये तिच्या दिनेशची आठवण ताजी होऊ लागली. दिनेशची ही एकच आठवण परंतु ती सुद्धा समिधापासून दूर होती. दिनेशला पाहिल्यावर आनंदाने डोळ्यांत पाणी उभे राहिले. जन्मल्याबरोबर त्याला समिधाने आपल्यापासून दूर केले होते. आता वीस वर्षांनी बघते तर एक प्ले-बॅक सिंगर म्हणून तिच्यासमोर आला होता... तेवढ्यात 'संगीत-कलानिकेतन'च्या डायरेक्टरने समिधाला हाक मारली आणि त्यांनी तिचे अभिनंदन केले.

''आता आपल्याला कधी निघायचे आहे?'' समिधाने विचारले.

''पहाटे सहा वाजताची फ्लाईट आहे. सगळ्यांनी पहाटे चार वाजता तयार होऊन रहा...'' असे म्हणून डायरेक्टर निघून गेले. समिधा खूश होती. तिने आपल्या मुलाच्या हातून पुरस्कार स्वीकार केला होता.

▲ ▲ ▲

# प्रकरण २७

समिधा मुंबईला आली. पण तिचे मन स्थिर राहात नव्हते. सारखा सारखा दिनेशचा चेहेरा तिच्या डोळ्यासमोर येत होता. आपल्या मुलाला भेटण्याची ओढ लागली होती. परंतु तिने पप्पांना वचन दिले होते की मी माझ्या बाळापासून दूर निघून जाईन... तरीसुद्धा दिनेशला भेटायला गेले तर दिनेश माझा आई म्हणून स्वीकार करेल का?... पप्पा मला सून म्हणून घरात घेतील कां?... या भीतीने समिधाला दिनेशला भेटायला यायची हिम्मत होत नव्हती. निदान आपण फोन करून पप्पांचा आवाज तरी ऐकूया... तरी मनाला समाधान होईल... या विचाराने समिधाने लगेच उठून पर्समधून दिनेशने दिलेले कार्ड काढून बघितले आणि फोन लावला. परंतु फोनवर पप्पांचा आवाज नव्हता किंवा दिनेशचाही आवाज नव्हता. कोणी बाईंचा आवाज होता. ही बाई कोण असावी? या विचाराने समिधाने फोन ठेवून दिला. रात्री फोन केला तर कदाचित पप्पा भेटतील आणि दिनेशही भेटेल असा विचार करून समिधाने रात्री फोन केला. ''हॅलो, कोण आहे?'' मी संगीत कलानिकेतन मधून बोलत आहे. जरा दिनेशजी असतील तर त्यांना फोन देता कां?'' समिधा म्हणाली. मी दिनेशला फोन दिला.

''हॅलो, कोण?'' दिनेश म्हणाला.

''मी संगीत कलानिकेतन मधून बोलते...'' समिधा म्हणाली.

''म्हणजे तुम्ही समिधा वाडकर... बरोबर नां?'' दिनेश म्हणाला.

''हो, हो.'' समिधा.

''काय काम होतं?''

दिनेशच्या तोंडून समिधा वाडकर नाव ऐकताच मी दिनेशच्या हातातून

फोन हिसकावून घेतला.

''समिधा तू कशी आहेस? कुठे आहेस? मी तुझी रजनी मावशी बोलत आहे. तू इकडे ये नाहीतर मी तुझ्याकडे येते... अगं हा दिनेश तुझा मुलगा आहे. बघ किती मोठा झाला आहे... एक प्लेबॅक सिंगर आहे...''

मी खूश होऊन बोलत होते. दिनेश समोरच आहे याचे मला भानच राहिले नाही. मी लगेच चूप झाले परंतु दिनेश माझ्याकडे बघतच राहिला होता. तेवढ्यात समिधा तिकडून बोलू लागली.

''हॅलो, हॅलो... मावशी तू इथे कशी? तुला मी पोलीस स्टेशनला बघितले होते. तेव्हा मी तुझ्याशी बोलू शकले नाही... आता मी मुंबईला आहे. मी उद्याच तुला व दिनेशला भेटायला येते...'' असे म्हणून समिधाने फोन ठेवून दिला. मी काही न बोलता तिथून निसटण्याचा प्रयत्न करत होते. परंतु दिनेशने मला रोखून बसायला सांगितले. मी जे बोलू नये ते बोलून गेले होते. त्याच्यापासून वीस वर्षे जे सत्य मी लपवून ठेवले होते ते उघड झाले होते.

''आजपर्यंत मी तुलाच आई समजत आलो आणि आजीही समजत आलो. परंतु ही समिधा माझी आई कशी होऊ शकेल? समिधाचा चेहेरा आणि माझ्या आई-बाबांच्या फोटोतील आईचा चेहेरा यामध्ये किती फरक आहे... आई, ही कोणी बनावट बाई असेल... सावध रहा... उगाच कोणालाही इथे बोलवून माझी आई बनवू नकोस... मी तिचा आई म्हणून स्वीकार करणार नाही...'' दिनेश रागाने बोलत होता. त्याचे बोलणं ऐकून मलाही संभ्रम पडला. दिनेश काय बोलतो याबद्दल मला काहीच समजले नाही. मी फोनवर जिच्याशी बोलत होते ती समिधाच होती. मग इंग्लंडला झालेल्या प्रोग्रॅममधली ती समिधा वाडकर दिसायला वेगळी कशी असू शकेल?... कदाचित सारख्या नावाची सारख्या आवाजाची दुसरी बाई सुद्धा असू शकेल. प्रॉपर्टीवर आपला हक्क मिळवण्यासाठी सुद्धा कोणी दिनेशची आई म्हणून येत असावी... काही कळत नव्हते... तरी दिनेश आपल्या आईविषयी जाणण्यास उत्सुक होता. म्हणून मी सुद्धा समिधाविषयी तसेच

माझ्याविषयी सुद्धा सर्व काही सांगितले. समिधाच्या लहानपणापासून ते दिनेशला जन्म देण्याइतपर्यंत म्हणजे समिधाची मंदिरा होण्यास कोणकोणती परिस्थिती तिला कारणीभूत ठरली याविषयी सर्व समजून सांगितले. तर मी रजनीपासून अनू बनण्याचे माझे अतीत सांगून टाकले. परंतु रजनी पूर्वीचे जीवन अजूनपर्यंत मला आठवलेच नाही. हा इतिहास ऐकून दिनेशच्या डोळ्यांत पाणी आले... आजीनेसुद्धा माझ्यासाठी आणि या घरासाठी आपले स्वत:चे जीवन समर्पित केले. सरोगसी आई का होईना परंतु तिने आपल्या ममतेने माझ्या दीपाआत्याला सांभाळले. तिचे जीवन सावरले. आज मलाही सांभाळते... माझी आई नव्हती तरी तिने माझ्या जीवनाला दिशा दिली... समाजात मला एक श्रेष्ठ स्थान दिले... हेच जर माझ्या आईला मातृत्व लाभलं असतं तर ती कधीच मंदिरा बनली नसती... या मातृत्वाच्या सावलीत ही छोटी रोपटी किती सुरक्षित राहातात... परंतु ही सावली निघून जाते तर तीच रोपटी उन्हामध्ये जळून भस्म होतात. जसे माझ्या आई-बाबांचे झाले... आज मला जाणवते की मातृत्वाचं काय मोल आहे... मी आईला कधीच दोष देणार नाही...'' दिनेशला आपल्या आईविषयी करुणा वाटू लागली. परंतु समिधा वाडकर हीच माझी आई हे सिद्ध व्हायला हवे. मी जरूर तिचा स्वीकार करीन...'' दिनेश आपल्या भावना माझ्यासमोर व्यक्त करत होता.

▲ ▲ ▲

# प्रकरण २८

दुसऱ्या दिवशीच समिधा आपल्या मुलाला भेटायला पुण्याला निघाली. परंतु मनात एक भीतीही होती. पप्पा मला घरात घेतील का?... ते माझ्याशी बोलतील कां?... जड मनानेच समिधा बंगल्याच्या गेटपर्यंत आली. लगेच वॉचमनने विचारले, ''तुम्ही कोण?... तुमचं नाव काय?... छोटे साहेबांना तुमचे काय नाव सांगू?...'' समिधाला प्रश्न पडला. समिधा नाव सांगितले तर पप्पा ओळखणार नाही. त्यांच्यासमोर तर मी मंदिरा होते. परंतु मंदिरा नावाने मला आत प्रवेश मिळायचा नाही. म्हणून समिधा नाव सांगणे योग्य ठरेल. तिने लगेच 'समिधा' नाव सांगितले. वॉचमनने फोन करून ''समिधा नावाची कोणी बाई आली आहे...'' असे सांगितले. मी लगेच ''आत पाठव'' म्हणून सांगितले. दार उघडून तिला आत घेतले. बघते तर ती समिधा नव्हती. समिधा नावाची कोणी दुसरीच बाई होती. तिला सोफ्यावर बसवून दिनेशला हाक मारली. दिनेश आला आणि दोघांनी एकमेकांना बघून हात जोडून नमस्कार केला. समिधा कावऱ्याबावऱ्या नजरेने इकडे-तिकडे बघू लागली. तेवढ्यात मी म्हणाले, ''काय घेणार? चहा बनवू की कोल्ड ड्रिंक आणू?''

''नको रजनी मावशी, आधी मला सांग की तू इथे कशी काय? जेव्हा मी दिनेशबरोबर लग्न करून आले तेव्हा तर तू इथे नव्हती. त्यापूर्वी मी तुला पोलीस स्टेशनला बघितले होते. परंतु त्या वेळी मी काही बोलू शकले नाही.'' समिधाच्या बोलण्यावरून ही समिधाच असल्याचे वाटत होते. परंतु हिचा चेहेरा वेगळा कसा? हे गूढ उकलत नव्हते. तेवढ्यात समिधाच म्हणाली की माझा चेहेरा बघून तुम्हाला शंका येत असेल नं? ही एक मोठी कहाणी आहे. तरी माझा आणि संध्याचा फोटो माझ्याकडे आहे, त्यावरून तुमची खात्री

होईल की मी समिधाच आहे'' असे म्हणून समिधाने पर्समधून फोटो काढून आम्हाला दाखवला तेव्हा आमची खात्री झाली की ही समिधाच आहे. समिधा पुढे बोलत होती.

''मावशी, ज्यावेळी मी दिनेशला गेटवर सोडून गेले तेव्हा कुठे जायचे काहीच समजत नव्हते. ज्यावेळी हॉटेलमधून पळ काढला त्यावेळी तिथल्याच एका मुसलमान मुलीने आम्हाला मदत केली. तिने आपले काळे दोन बुरखे आम्हाला दिले. तेच बुरखे घालून आम्ही तिथून पळ काढला. कारण माझ्या मुलाला ही लोक काय करतील सांगता येत नव्हतं. तसेच माझ्या मुलाचे भवितव्य चांगले घडावे या हेतूने आम्ही दोघी निघालो. प्रथम माझ्या बाळाला तुमच्या गेटजवळ एक चिठ्ठी लिहून ठेवून दिले. तिथून मुंबईची गाडी पकडून मुंबईला गेलो. हातात फक्त दोन हजार रुपये होते, तेच पुरवून खर्च करायचे होते. मुंबईला राहाण्याची सोय नव्हती. त्यामुळे मी व संध्या असेच भटकत राहिलो. खूप भूक लागली होती म्हणून आम्ही एका झाडाखाली बसलो. संध्या वडापाव आणण्यासाठी गाडीवर गेली. मी निवांत बसून विचार करत होते की यापुढे काय करायचे? काही झालं तरी पुन्हा त्या घाणेरड्या जागी जायचे नाही. कडक उन्हामुळे आणि त्या काळ्या बुरख्यामुळे खूप गरम होत होते म्हणून मी थोडा वेळ बुरखा मागे केला. जरा हवा लागली तेव्हा बरे वाटले. संध्या वडापाव घेऊन आली. आम्ही दोघी वडापाव खाऊन उठणार तोच एक काळा राकट माणूस माझ्या दिशेने आला आणि माझ्या तोंडावर काहीतरी फेकले. त्याबरोबर चेहेऱ्याची आग होऊ लागली. मी बेशुद्ध झाले. जेव्हा मी शुद्धीवर आले तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये होते. संध्या आणि दोन इन्स्पेक्टर माझ्या बाजूलाच बसलेले होते. इन्स्पेक्टरने माझ्याकडून चौकशी करून सर्व माहिती लिहून घेतली. माझ्या चेहेऱ्यावर ॲसिड टाकले होते. मी पबमधून पळाले म्हणून त्यांनी माझा चेहेराच विद्रूप करून टाकला होता. चेहेऱ्याची एक बाजू पूर्ण जळाली होती. एक महिना मी हॉस्पिटलमध्ये होते. जेव्हा डिस्चार्ज मिळाला तेव्हा इन्स्पेक्टरनेच माणुसकीच्या नात्याने आपल्या बंद फ्लॅटमध्ये आमची राहाण्याची व्यवस्था केली. माझ्या चेहेऱ्यावर ॲसिड

उडविणाऱ्या माणसालाही त्याने पकडले होते. त्या माणसाकडून पुण्याच्या पबविषयी सर्व माहिती मिळाली, तेव्हा त्या पबला सील करून बऱ्याच मुलींची सुटका झाली. त्या इन्स्पेक्टरने आम्हाला खूप मदत केली. मला सरकारकडून मदतही मिळवून दिली. त्या पैशातून मी चेहेऱ्याची प्लॅस्टीक सर्जरी करून घेतली. त्यात माझी आणि संध्याची सोन्याची साखळी विकावी लागली. थोडे कर्ज घेऊन मी माझा चेहेरा नीट करून घेतला. नाहीतर मला कोणी कामच दिले नसते. मी मंदिराची पुन्हा समिधा झाले. मंदिराची ओळख पूर्णत: मिटून गेली होती. मी एका नव्या ओळखीने नव्या जीवनाला सुरुवात केली. काम शोधू लागले तेव्हा या संगीत कलानिकेतन वर नजर पडली. तिथे जाऊन चौकशी केली. माझे नृत्य बघून माझी निवड झाली. तिथे मला सहा महिने आणखी ट्रेनिंग देऊन तयार केले. अनेक ठिकाणी माझे प्रोग्राम्स होऊ लागले. माझे नाव झाले. नंतर परदेशातही आमच्या संगीत कलानिकेतनला चान्स मिळू लागला. एकीकडे संध्या आणि इन्स्पेक्टर विपुल हे दोघे एकमेकांजवळ येऊ लागले होते. दोघांचे प्रेम बघून मी स्वत: पुढाकार घेऊन त्यांचे लग्न लावून दिले. संध्याला आता एक मुलगी आहे. ती सुद्धा फार उशिरा झाली. तिचे नाव स्मृती ठेवले आहे. संध्या आता सुरतला राहाते. म्हणजे विपुलची जशी बदली होते तसे त्यांना त्या ठिकाणी जाऊन राहावे लागते. परंतु संध्या आता निर्धास्त आहे कारण नवराच इन्स्पेक्टर आहे मग तिच्या वाटेला जाण्याची कोणाची हिम्मत होणार?

''समिधा तू खूप सोसलेस गं? आता सर्व सोडून तू इथे ये. आपल्या हक्काच्या घरी राहा.'' मी तिला जवळ घेत म्हणाले.

''मावशी, पप्पांना आवडेल कां?... त्यांचा मुलगा माझ्यामुळे गेला म्हणून त्यांना माझ्यावर राग आहे नां?'' समिधा डोळ्यांतील पाणी पुसत पुसत म्हणाली.

''नाही गं. पप्पांना पॅरालेसिसचा झटका आल्यापासून त्यांची तब्बेत अगदी नाजूक झाली होती. त्यातच ते आम्हाला सोडून गेले. परंतु जाता जाता त्यांनी सर्वांची आठवण काढली. शेवटी शेवटी त्यांच्या स्वभावात खूप बदल

झाला होता. आत्ता ते असते तरी त्यांनी तुला क्षमा केली असती... दिनेश गेल्यापासून ते मनाने हळवे झाले होते. तसेच त्यांच्या मनात ज्या ज्या शंका होत्या त्या मी सोडवून त्यांच्या मनाला मोकळे केले होते. तुझ्या बाबतीत सुद्धा समिधाची मंदिरा कशी झाली हे मी त्यांना पटवून दिले असते.'' दिनेशलाही आपल्या आईची अवस्था बघवत नव्हती. त्याने आईला जवळ घेऊन तिचे समाधान केले. समिधाने सुद्धा दिनेशला आपल्या छातीशी घेऊन कवटाळले. वीस वर्षांनंतर आई-मुलाचे मीलन बघून माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. वीस वर्षे दाबून ठेवलेला मातृत्वाचा उमाळा आज बाहेर पडला होता. समिधाच्या डोळ्यातील पाण्याच्या धारा थांबत नव्हत्या. मला गीताची आठवण झाली. निदान आता तरी तिच्या आत्म्याला शांती मिळाली असावी...

▲▲▲

# प्रकरण २९

समिधा फोनवर संध्याशी बोलत होती. समिधा इथला सारा वृत्तांत संध्याला सांगत होती. त्यावेळी तिच्या चेहेऱ्यावर प्रसन्नतेचे पडसाद स्पष्ट दिसत होते. संध्याचे नाव ऐकताच मी फोन हिसकावून घेतला. ''संध्या, कशी आहेस गं? आता तुम्ही तिघे जण इकडे आठ दिवस राहायला या...''

''हो, हो मावशी, आम्ही आता तुमच्याकडे नक्कीच येऊ. तू आणि दिनेश कसे आहात? समिधाच्या दिनेशला बघायची मला खूप इच्छा आहे. समिधाकडून पप्पांविषयी समजले. फार वाईट वाटले. आता आपण प्रत्यक्ष भेटूनच बोलू...'' असे म्हणून संध्याने फोन ठेवला.

समिधा अधून-मधून नृत्याचे प्रोग्राम करत होती. मी तिची सासूही होते तर मावशीही होते. परंतु गीताची मुलगी म्हणून संध्या व समिधा मला माझ्या मुलीच होत्या... परिवार पुन्हा वाढत होता. सदाभाऊ सुद्धा वयोमानाने थकले होते. त्यांनी नाशिकचे मंदिर दुसऱ्या पंडिताला चालवायला दिले होते. उषाताईंचा बंगला भाड्याने दिला होता. अनाथाश्रम पुण्यातच असल्याने ते स्वत:च येऊनच जाऊन त्याची व्यवस्था पाहात होते. ते सुद्धा आमच्याकडे राहात होते. घर पुन्हा भरल्यासारखे झाले म्हणून मनाला प्रसन्न वाटत होते. अचानक संध्याचा पुन्हा फोन आला.

''हं बोल संध्या.''

''मावशी तुला सांगायचच राहून गेलं. पाच सप्टेंबरला माझ्या स्मृतीचा पाचवा वाढदिवस आहे. तरी तुम्ही सर्वांनी आमच्या घरी यायचे आहे. माझे सासरे सुद्धा येणार आहेत. मावशी येणार नां? माझ्याकडून तुमच्याशिवाय कोणीच नाही...''

''हो, हो, नक्की येणार. आणि असं स्वत:ला कधी एकटी समजू नकोस. आम्ही तुझीच माणसं आहोत नं... ठीक आहे.'' असे म्हणून मी फोन ठेवला. लगेच ही बातमी समिधाला सांगून संध्याकडे जाण्याचे नक्की केले. तसे दिनेशलाही आधीच सांगून ठेवायला हवे. नाहीतर तो नेहमी त्याच्या रेकॉर्डिंगमध्ये व्यस्त असतो.

सुरतला संध्याकडे जाण्यासाठी आमची तयारी सुरू झाली. स्मृतीसाठी एक सोन्याची चेन केली. तसेच तीन-चार ड्रेस घेतले. चार सप्टेंबरला सकाळीच आम्ही सर्व आमच्या गाडीने निघालो. आमच्या बरोबर दीपा आणि तिचा नवरा सुमित या दोघांनाही मी घेतले होते. आमचा एक नवीन परिवार झाला होता. सुरतला जाईपर्यंत रात्र झाली होती. संध्या आमची वाटच बघत होती. त्यावेळची छोटीशी संध्या कानावर दोन घट्ट वेण्या घातलेली. चुरु-चुरु बोलणारी अशी संध्या, आज एक मुलीची जबाबदार आई तर विपुलची पत्नी झाली होती. तिच्याकडे बघून मला तिचे फार कौतुक वाटले. मला बघताच संध्या व विपुल असे जोडीने नमस्कार केला. मी संध्याला जवळ घेऊन मिठी मारली. तेव्हा आमचे दोघींचे डोळे पाण्याने भरून आले. संध्याने आपल्या परिवाराला एकमेकांची ओळख करून दिली. तेवढ्यात माझी नजर आरामखुर्चीकडे गेली. हे बघून संध्याने लगेच खुर्चीत बसलेल्या सासऱ्यांची ओळख करून दिली. तसे मी त्यांना हात जोडून नमस्कार केला. तसेच तिच्या सासऱ्यांनीही नमस्कार केला आणि ते माझ्याकडे बघतच राहिले. लगेच म्हणाले, ''अगं तू राधिका आहेस ना? मी तुझा मामेभाऊ विनय विसरलीस का?...'' विनय बोलत होता. लहानपणीच्या आठवणी सांगून मला ओळख देत होता. परंतु मला काही आठवत नव्हते. मी आठवण्याचा प्रयत्न करत होते. विनय आपल्या आईने किती त्रास दिला. तसेच मामांचा माझ्यावर किती जीव होता... या सर्व आठवणी सांगून मला आठवण्याचा प्रयत्न करीत होता. माझ्या सासरी माझ्या नवऱ्याने आणि सासूने कसा छळ केला, हळू हळू मला पुसटशा आठवणी होऊ लागल्या. दोन दिवसांनी मी विनयला ओळखले. आपली आई चार-पाच वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाल्याचे सांगितले. जवळ-

जवळ पंचावन्न वर्षांनी विनयची आणि माझी भेट बघून सगळ्यांनाच आनंद झाला. आनंदाने सगळ्यांचे डोळे पाण्याने भरून आले. नशिबाचा कसा आहे हा योगायोग? संध्या माझ्या भावाची सून झाली होती. विपुल हा विनयचा मुलगा म्हणजे माझा भाचा परंतु विनयची बायको दोन वर्षांपूर्वी हार्टअॅटॅकने विनय आणि विपुलला सोडून गेली. विनयने आपली जीवन कहाणी सांगितल्यावर विनयच्या डोळ्यांतून पाणी आले. मला राधिकाची पूर्ण ओळख पटली होती. राधिकापासून अनुपर्यंतचा एवढा मोठा पल्ला मला आठवू लागला होता. माझ्या जीवनाचा पूर्ण इतिहास मी माझ्या पूर्ण परिवारासमोर विनयला सांगितला. आज माझा पूर्ण परिवार माझ्या सोबत असलेला बघून मला समाधान वाटत होते. एक सरोगसी आई होऊनही माझी गीतासारखी गत झाली नाही. असे प्रत्येक सरोगसी आईला कुटुंबाकडून सहयोग मिळून तिला पैशाऐवजी तिच्या जीवनातील अडचणींना साहाय्य केले तर तिला तिच्या गर्भाशयाचे भाडे मिळाल्यासारखेच आहे. तिला तिच्या मातृत्वाचे मोल दिल्यासारखे आहे... तेव्हा या सरोगसी प्रक्रियेकडे व्यापक आणि सकारात्मक दृष्टिकोनातून बघितले जाईल. एक निव्वळ व्यवहार व्हायला नको. या व्यवहारात तिच्या भावना, तिचे मातृत्व दुखावले जाते...

स्मृतीच्या वाढदिवसाबरोबर आमच्या नवीन परिवाराच्या मीलनाचाही सुखद क्षण साजरा होत होता. मला माझ्या या परिवाराकडून माझ्या मातृत्वाचे मोल मिळाले होते...

▲▲▲